# माणूस



मार्च १९६२

५० न.पै.

# माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
**श्री. ग. माजगांवकर**

● ● ●

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

संपादक, व्यवस्थापक
'**माणूस**', मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

★ ★ ★

**वार्षिक वर्गणी : पांच रुपये**
**किरकोळ अंक : पन्नास नये पैसे**

● ● ●



— *सूचना* —

१ ) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

२ ) पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

३ ) या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांची अधिकृत मतें असतातच असें नाहीं


**वर्ष पहिलें : अंक दहावा**
**मार्च १९६२**

## स्वरूपदर्शन


**सामाजिक अंतरंग**

| | |
|---|---|
| निवडणुका व आचारसंहिता | पन्नालाल सुराणा |

**साहित्य व कथा**

| | |
|---|---|
| मला दिसलेले लेखक : | ना. सी. फडके–' मी ' |
| अशीही मतं फुटतात : | सौ. निर्मला कुलकर्णी |
| शंभर रुपये : | रामचंद्र हिंगणे |

**कृषि विभाग**

| | |
|---|---|
| सहकारी शेती अनिवार्य कां ? : | विलास पाटील |
| आपलें एंजिन : | जयाजी आबाजी वाघ |

**रंगभूमी–क्रिडा–चित्रपट**

| | |
|---|---|
| मराठी नाटचसृष्टीचे मानकरी १९६२ : | प्रतिनिधीकडून |
| मराठी चित्रपट सृष्टी : सहामाहीची वाटचाल : | पंडित मांडके |
| वेस्ट इंडीजचा बलाढ्य संघ : | विद्याधर |

**मुखपृष्ठ**

| | |
|---|---|
| आमचा मतदार : | छाया–मा. द. शिंदे, पुणें. |

अ भि रा ष्ट्रे ण व र्ध ता म्




# स्पर्धेसाठी स्पर्धा नको

आर्थिक क्षेत्रांत बेलगाम स्पर्धा नसावी, त्यामुळे देशाच्या साधनसामुग्रीची बेसुमार नासाडी होते, एकीकडे समाजाच्या प्राथमिक गरजा पूर्णपणें भागविल्या जात नाहीत तर दुसरीकडे गरज नसणाऱ्या वस्तूंचें टनावारी उत्पादन होत रहातें, त्यामुळे आर्थिक क्षेत्रांत विषमता व बेकारी यांची सतत वाढ होते—हा विचार अनेकांना आज मान्य झालेला आहे.

पण राजकीय क्षेत्रालाहि हाच न्याय लागू पडतो हें तितकेंसे ध्यानांत घेतलें जात नाही. भांडवलशाही देशांतील राजकीय पक्ष हे मूलतः सत्तास्पर्धेवर अवलंबून असतात. जोंपर्यंत सामाजिक व राजकीय जागृतीचीं क्षितिजें विस्तृत करावयचीं असतात तोंपर्यंत विविध राजकीय पक्षांच्या स्पर्धा समाजाला हितकारक ठरतात. पण अनेकदा ‘ स्पर्धेसाठी स्पर्धा ’ हें राजकीय पक्षांचें ध्येय बनतें आणि स्पर्धेच्या या उन्मादांत प्रामाणिक लोकमताची गळचेपी केली जाते.

पुण्यांतील ‘ शिवाजीनगर मतदार संघ ’ हें एकच उदाहरण घेऊं. हा मतदारसंघ प्रामुख्याने सुशिक्षितांचा. बहुसंख्य मतदार अपक्ष वृत्तीचे. लायक व प्रामाणिक उमेदवार—मग तो कोणत्याहि पक्षाचा कां असेना—निवडून यावा अशी मतदारांची प्रामाणिक इच्छा. या मतदारसंघांत उभे असलेले काँग्रेसचे श्री. बर्वे व जनसंघाचे श्री. म्हाळगी या दोघांबद्दलहि मतदारांना सहानुभूती होती. महाराष्ट्राच्या आजच्या विशिष्ट परिस्थितींत दोन्हीहि उमेदवार विधान सभेंत जाणें आवश्यक आहेत हा सर्वसामान्य मतदारांचा कौल होता.

पण मतदाराच्या या प्रामाणिक भावनेची कदर राजकीय पक्षांनी बाळगली का ? काँग्रेस हा देशांतील प्रमुख पक्ष. राजकीय क्षेत्रांत लोकशाहीला हितकारक ठरतील असे अनेक पायंडे व संकेत घालून देण्याचें कार्य वास्तविक याच पक्षाकडून प्रथम व्हावयास हवें. वडीलकीच्या नात्याने काँग्रेसने असा कांही निर्णय घेतला नाही की, ‘ जनसंघाच्या विधानसभानेत्यासाठी आपण एक जागा मोकळी सोडूं ’ प्रजासमाजवादी श्री. एस्. एम्. जोशी विधानसभेंत विरोधी उमेदवार म्हणून निवडून यावेत म्हणून काँग्रेसनेते आपला पक्षीय स्वार्थ तेवढ्यापुरता दूर करण्यास तयार झाले होते ना ? मग तोच मनाचा मोठेपणा त्यांनी येथे जनसंघाच्या बाबतींत कां दाखवूं नये ?

याउलट महाराष्ट्राच्या आजच्या विशिष्ट आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर श्री. बर्वे यांची उमेदवारी न पहातां ‘ पक्षीय सैद्धांतिक ’ भूमिकेवरून तिला विरोध करण्याचा जनसंघाचा निर्णयहि तितकाच अदूरदर्शी व अनाठायी होता. निदान महाराष्ट्रांत तरी आज ‘ काय करावें ’ या प्रश्नापेक्षा ‘ कसें करावें ’ हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. नवमहाराष्ट्राच्या पुनर्रचनेबाबत तात्त्विक संघर्षाला आज फारसा अर्थ नाही. या आर्थिक व सामाजिक पुनर्रचना-कार्यात श्री. बर्वे एक विशिष्ट कर्तृत्व गाजवूं शकतील असा सर्वसामान्य सुशिक्षित मतदाराचा विश्वास होता. जनसंघनेत्यांनी मतदारांच्या या विश्वासाची कदर बाळगून श्री. म्हाळगींसाठी दुसरा एखादा मतदारसंघ निवडला असता तर ‘ सामाजिक औचित्य ’ व ‘ पक्षीय स्वार्थ ’ या दोहोंचाहि मेळ ते घालूं शकलें असतें असें वाटतें.

अर्थात् हे निर्णय एकेकट्या पक्षाने अलग सलग घेऊन चालत नसतात. सर्व पक्षप्रमुखांनी एकत्र येऊन लोकशाहीच्या दृष्टीने कोणत्या किमान व्यक्ति विधानसभेंत यावयास हव्यात यासंबंधीं निश्चित धोरण आखलें पाहिजे व तें कार्यवाहींत कसें येईल हें पाहिलें पाहिजे. या समंजस लोकशाहीचा विवेक आम्ही करणार नसूं तर नफ्याच्या अनिवार लालसेने चालू असणारी दोन भांडवलदारांमधील स्पर्धा आणि राजसत्ता हस्तगत करण्यासाठी कार्यप्रवण झालेल्या पक्षांची अनिर्बंध स्पर्धा यांत फरक तो कोणता ? जितकी एक अनिष्ट व सामाजिक हिताला मारक तितकीच दुसरीहि. किंबहुना दोन्हीहि एकाच नाण्याच्या दोन बाजू. आर्थिक क्षेत्रांतील स्पर्धा नियमित करण्यास निघालेला समाज राजकीय स्पर्धाहि नियमित करण्याविषयीं उदासीन राहून कसे चालेल ?


—संपादक

**शेतकरी बंधूंनो—**


कणाची हेळसांड झाली की, मणाची नासाडी व्हायला वेळ लागत नाही. शेतीव्यवसाय व्यवस्थित होण्यासाठी रोजच्या खर्चात क्रूड ऑईल इंजिन्सच्या बाबतीत काटकसर व्हावी म्हणून सतत ३८ वर्षे संशोधन करणाऱ्या तज्ञाची कृति म्हणजेच.......

# ★ इमली ★

इंजिन्स



५ हॉ. पॉ. चार चाकी ट्रॉली कपल्ड सट.



१० व १३ हॉर्स पॉवर.

★

—उत्पादक—

## मे. कुल्को इंजिनियरिंग वर्क्स लि. इचलकरंजी

—एकमेव वितरक—

## मे. विशाल महाराष्ट्र सेल सिंडिकेट, इचलकरंजी

★ एजन्टस् ★

**मे. दि युनिव्हर्सल एजन्सी,** १४–१५ मोरारजी पेठ, सोलापूर : सोलापूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड व परभणी जिल्हयांसाठी.

**मे. पाटील ब्रदर्स आणि कं,** गणपती गल्ली, सांगली : सातारा व पुणें जिल्हयांकरिता.

**मे. पाटील आणि कंपनी,** मालेगांव : नासिक, यवतमाळ, अकोला व वर्धा या जिल्हयांसाठी.

**मे. प्रदीप एजन्सी,** २९९ नवी पेठ, जळगांव : जळगांव, बुलढाणा व अमरावती या जिल्हयांकरिता.

**मे. श्रीकृष्ण एजन्सी,** संगमनेर : अहमदनगर जिल्हयाकरिता.

**मे. देशपांडे बन्धु;** आग्रा रोड, धुळें : धुळें जिल्हयासाठी.

**मे. युनिक एजन्सी,** राम लेन, रत्नागिरी, : रत्नागिरी जिल्हयाकरिता.

**⊛ भारतांतील सर्व प्रांत सरकारांनी ही इंजिन्स तगईकरिता मंजूर केली आहेत ⊛**




सरकारने प्रा. ना. सी. फडके यांना पद्मभूषण पदवी देऊन गौरवलें हें यथोचित झाले यांत संशय नाही.

दौलत आणि जादूगार यासारख्या कादंबऱ्यांतून फडक्यांनी मराठींत खरोखरच नवी दौलत आणि नवी जादू आणली. त्या काळच्या उठल्या सुटल्या ध्येयवाद सांगणाऱ्या कर्मठ वाङ्‌मयापासून त्यांनी वाचकांची सुटका केली. रोजच्या लहानसहान गोष्टींना त्यांनी स्वास्थ्य आणलें. भरगच्च नाट्यमय नकली प्रसंगांनीं भरलेल्या कादंबऱ्यांहूनहि मनाच्या वागण्याच्या लहानसहान शक्कलाहि रंजन करूं शकतात हें त्यांनी दाखवलें. भाषेचीहि त्यांनी करामत केली. साधी ओघवती भाषा त्यांनीच पुढच्या पिढीला दिली. दृष्टान्त, उपमा, संस्कृतप्रचुर जड रचना यांच्या संभाराखालीं वाकलेली मराठी त्यांनी मोकळी केली.

# मला दिसलेले लेखक

१

फडक्यांनी आणखी एक धडा घेण्याजोगी गोष्ट नव्या पिढींतल्या लेखकांना दिली आहे. सतत रोज कांहीतरी हातून लिहून झालेच पाहिजे हा नियम त्यांनी कांटेकोर पाळला आहे. लिखाण हें सर्वस्वी प्रतिभेच्या आहारीं त्यांनी ठेवलं नाही. लिखणासाठी सतत कष्ट घेण्याची त्यांची वृत्ती कोणत्याहि पिढींतल्या लेखकांनी अनुसरावी अशीच आहे.

फडक्यांनी केलेलें हें वाङ्मयाचें कार्य व त्यांचें गुण मान्य करायलाच हवेत. त्यासाठीच सरकारनें त्यांना 'पद्भूषण' पदवीने गौरवले हें उचित झालें, असें म्हणतां येईल.

मात्र साहित्यपरिषदेंतील (पुणें) सत्कार-प्रसंगीं फडक्यांनी भाषण केलें तें अत्यंत अनुचित वाटलें. आपलें वाङ्मय समाजाला अनीतीकारक आहे हा न्यूनगंड त्यांच्या मनांत दडलेला दिसतो. नाहीतर त्या बाबतींत सरकारचा निर्वाळा त्यांनी दिलाच नसता. सरकारने 'पद्मभूषण' पदवी दिल्याने सरकार त्यांच्या कादंबऱ्यांना संपूर्ण नैतिक मानते असा अर्थ होऊं शकत नाही. सरकारने केलेल्या गौरवाचा फडक्यांनी सोईस्कर फायदा घेण्याचा यत्न केला इतकेच.

खरे पाहिलें असतां आजच्या कांही वर्षांतल्या कित्येक वाङ्मयापुढे फडक्यांचें वाङ्मय हें सोवळेंच म्हणावें लागेल असें आहे. परंतु तरीसुद्धां आपल्या वाङ्मयांतील अनैतिकतेचा उल्लेख फडक्यांना करावासा वाटला यांतच स्वतःच्या वाङ्मयाचा गागोवा त्यानाच स्वतःला घेतां आला नाही हें लक्षांत येतें. त्यांच्या पहिल्या दोन तीन कादंबऱ्यांच्या लोकप्रियतेनंतर म्हणून त्यांनीं जो एक फॉर्म्युला काढला तिथेच ते हुकले. तात्कालिक एखाद्या मोठ्या घटनेची पार्श्वभूमि—प्रणयाची कांही वर्णनें—सुंदर स्त्री पुरूष—इत्यादि सवंग गोष्टी त्यांनी कथानकाचा गाभा केल्या आणि आपणच ठरवलेल्या फॉर्म्युल्याच्या चौकटींत ते अडकून बसले. एकदां सांचा बनवल्यावर पंधरा वर्षांनंतर तसेच गणपती कारखानदारानं काढीत बसावे तसे वर्षावर वर्षें गेलीं आणि त्यांची कादंबरी वाईट अर्थानं सांचेबंद बनली. वयाबरोबर येणारे अनुभवहि फडके कधीं आपल्या कादंबरींत घालूं शकले नाहीत. त्यांची कादंबरी तरुण राहिली पण शिंप्याच्या दुकानांत शालूची तरुणबाई जशी तरुण राहते, तशी तरुण राहिली.

आपल्या स्वतःच्या वाङ्मयाच्या चिकित्सेच्या बाबतींत त्यांचा स्वभाव ताठ आणि अभिमानी राहिला. त्यांचा स्वभाव नम्र आणि निरहंकारी स्वभाव जर त्या चिकित्सेच्या-वेळीं उपयोगी आला असता तर मराठी वाङमयाचें खात्रीने कल्याण झालें असतें. आपल्या पहिल्या गाजलेल्या कादंबऱ्यांतलें मर्म त्यांनी नीट ओळखलें असतें तर आजच्या आपल्या कादंबऱ्यांतून ताजे ताजे प्रणयप्रसंग घालून त्या तरुण ठेवण्याची खोटी धडपड त्यांनी केलीच नसती. वयाबरोबर आयुष्याचा येणारा समज आणि त्याबरोबर येणारे तत्त्वज्ञान याचा अविष्कार त्या त्या वेळच्या कादंबरींत देण्यानेच कादंबरी खरी तरुण राहते. ती विसरली जात नाही.

साहित्यपरिषदेच्या सत्कारप्रसंगीं त्यामुळेच फडक्यांनी भाषण केलेलें अत्यंत अनुचित असें वाटलें. फडक्यांच्या वाङमयांत मौलिक गुण म्हणून सरकारनें त्यांना गौरविले व साहित्यिकांनी त्यांचा सत्कार केला. पण त्याचा वेगळा अर्थ लावून फडक्यांनी आपली नि इतरांची जी दिशाभूल करण्याचा यत्न 'त्या' भाषणांत केला तो त्यांनी करायला नको होता.

सॉमरसेट मॉम या लेखकानें आपण एकहि भव्य कलाकृति निर्माण करूं शकलों नाही हे शेवटी कबूल केलें. फडके हा कबुली जबाब देतील की नाही कुणास ठाऊक ! पण मॉमने स्वतःबद्दल जे म्हटलें तें फडक्यांच्य बाबतींतहि खरें आहे. त्यांच्या कलेंत श्रेष्ठ कलाकृतीमागे लागणाऱ्या 'सर्वाभूतीं दयेचा (Catholic sympathy) अभाव आहे.

तरीसुद्धा एखादा कलावंत किंवा एखादी व्यक्ती अमुक एक झाली नाही म्हणून चिरफाड करणं निष्ठुरपणाचं ठरेल. म्हणूनच फडक्यांच्या दोषांकडे सहानुभूतीनं पहायला लागले की, कोणत्या तरी कठोर विचारसरणीनं त्यांच्या मनाची पक्कड घेतली असावी अशी विचारसरणी अनुसरण्यांत त्यांचीं स्वतःचीं कांही योग्य कारणं असतील. ही विचारसरणी कोणती याचा अंदाज घेऊं लागलें की फडक्यांचीच कुठेतरी चौकटींत टाकलेलीं वाक्यं आठवतात. त्यांच सारांश असा—

**" जगांत आपणास मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीला भारंभार किंमत द्यावी लागते."**

व्यवहाराचा असा तराजू घेऊन बसलेल्या माणसाला जितपत यश मिळतं तितकंच यश आपलं हें फडकेहि जाणतील.

**—'मी'**

# निवडणुका व आचारसंहिता

निवडणुका संपल्या. या लोकशाही युद्धांत कोणाची हारजित झाली हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी हें लोकशाही युद्ध आम्ही कशाप्रकारें खेळलों हें त्याहून अधिक महत्त्वाचें आहे. कारण कौरव पांडवांचें घनघोर महायुद्धहि धर्मयुद्धाचे नियम पाळूनच खेळणारीं आम्ही भारतीय माणसें आहोंत. या लोकशाही युद्धाच्या संहिता तयार करणाऱ्या समाज प्रबोधन संस्थेच्या चिटणीसांचा हा लेख म्हणूनच येथे सादर केला आहे.

—पन्नालाल सुराणा

भाटघरचा परिसंवाद १९६१ सालच्या मे महिन्यांत झाला. महाराष्ट्रांतील विविध पक्षांच्या नेत्यांनी व कांही विचारवंतांनी मिळून एक आचारसंहिता बनविली. आपलें राजकीय जीवन जास्तजास्त शुद्ध ठेवण्यासाठी प्रत्येक पक्षाने कांही किमान बंधनें पाळण्याची गरज आहे. याबद्दलचे संकेत सर्व संमतीने ठरले तर तें पाळण्याची प्रत्येकावर विशेष जबाबदारी राहील. ही आचारसंहितेच्या कल्पनेमागील मुख्य भुमिका आहे.

भाटघर परिसंवादानंतर नऊ महिन्यांनी सार्वत्रिक निवडणुका झाल्या. निवडणुकांची तयारी चारपांच महिने आधीपासून होत असते. आणि अखेरचे दोन महिने निवडणूक मोहीम तीव्रतेनें चालत असते. नुकत्याच झालेल्या निवडणुकींचा विचार आचारसंहितेच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

समाज प्रबोधन संस्थेने सप्टेंबर १९६१ पासून अचारसंहितेच्या कल्पनेचा प्रचार करण्यासाठी कांही प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यांत सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांची एक सभा घ्यावी व तेथे आचारसंहितेचें पालन कसें करता येईल याचा विचार व्हावा असा कार्यक्रम आखण्यांत आला. वेगवेगळया व्यक्ती व संस्था यांच्या मदतीनें अहमदनगर, नासिक, रत्नागिरी, जळगांव, नागपूर, सांगली, पुणें व मुंबईशहर इतक्या ठिकाणी अशा प्रकारच्या सभा झाल्या. पण त्यांतल्या कांही नाममात्रच झाल्या. त्या त्या भागांतले कार्यकर्ते पुरेशा संख्येने एकत्र आले नाहीत. आणि चर्चेचा सूरहि साधारणपणें असा राहिला की, आम्हाला आमच्या पक्षाकडून याबाबत कांही आदेश आलेला नाही.

वास्तविक भाटघर परिसंवादांत मान्य झालेली आचारसंहिता पाळली जावी अशी सर्वांचीच इच्छा होती. तेव्हा तसा विचार भाटघर परिसंवादांत उपस्थित असलेल्या राजकीय नेत्यांनी आपापल्या पक्षासमोर मांडायला हवा होता. पक्षाचें त्याबाबत अधिकृत धोरणहि ठरवून घ्यायला पाहिजे होतें. स. प्र. संस्थेतर्फे वेगवेगळ्या पक्षांना तशी विनंति करणारीं पत्रकें पाठविण्यांत आलेलीं होतीं. व त्याबाबत तीनचार वेळा स्मरणहि करून देण्यांत आलें. त्यावर पक्षांतर्गत चर्चा झाल्याहि असतील. पण कुठल्याहि पक्षाने याबाबत आपल्या कार्यकर्त्यांने अधिकृतपणें व जाहीरपणें व आदेश दिलेला दिसत नाही.

तरी पण कांही पक्षप्रमुखांनी आपल्या जाहीर भाषणांत किंवा मुलाखतींत आचारसंहितेचें पालन व्हावे अशी आपली इच्छा बोलून दाखवली होती. जिल्हा पुढेपुढे याचा उल्लेख होऊं लागला, व सभांत पक्षाचा अधिकृत आदेश नसल्याची तक्रार फारशी झाली नाही.

## पुण्यांतील प्रयोगक्षेत्र

पुणें शहरांत या दृष्टीनें जास्त प्रयत्न करावेत असें स. प्र संस्थेच्या कार्यकर्त्यांना वाटलें. आणि तिथल्या सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनींहि सुरुवातीला सर्व प्रकारें सहकार्य केले. त्यामुळ पक्षकार्यकर्त्यांच्या तीनचार बैठका झाल्या. आचारसंहितेचें पालन होते आहे की, नाही हें पाहण्यासाठी महाराष्ट्र राज्य पातळीवरच एखादी यंत्रणा निर्माण झाली असती तर बरें झालें असतें. पण आहे या परिस्थितींत निदान पुणें शहरांत तरी आचारसंहितेचें कसोशीनें पालन करावें असें सर्वसंमतीने ठरविण्यांत आलें. भाटघर आचारसंहितेंतील पहिलीं तीन कलमें पाळण्याबाबत विशेष कटाक्ष ठेवण्यांत यावा असें मान्य झालें.

तसेंच कांही कार्यक्रमहि ठरविण्यांत आले. सुरुवातीला असा प्रयत्न झाला प्रचारात्मक मजकूर लिहिण्यासाठी भिंतींचा वापर करण्यात येऊं नये. शहरांतील खाजगी व सार्वजनिक भिंती खराब होतात, व आधी लिहिलेल्या मजकुरांत नंतर कोणीतरी अश्लाध्य बदल करताना व तें लिखाण बीभत्स किंवा विकृत बनतें. हे प्रकार थांबावेत असें सर्वांना वाटत असले तरी भिंतीवर लिहिणें हें प्रचाराचें सोपें व स्वस्त माध्यम असल्यानें त्याबाबतचें बंधन स्वीकारण्याला सुरुवातीला कांही पक्षांचा विरोध होता. पण बऱ्याच विचारविनिमयानंतर असें ठरलें की, सर्व पक्षांचे प्रचार फलक लावण्यासाठी शहरांच्या वेगवेगळया भागांत कांही जागा जर स. प्र. संस्थेनें मिळविल्या तर भिंतींवर लिहूं नये. स. प्र. संस्थेनें त्याप्रमाणे प्रयत्न केला. अपेक्षे इतक्या नाही तरी बऱ्याच जागा व त्याहि मोक्याच्या, मिळाल्या. पण कांही पक्षांच्या कार्यकर्त्यांनीं या बाबतचा अंतिम निर्णय होण्यापूर्वीच

भिंतींवर परत लिहिण्यास सुरुवात केली. याबाबत असें दिसलें की, सर्व पक्षांच्या बैठकींत आपल्या पक्षाच्या प्रतिनिधीने जो निर्णय मान्य केला तो त्या पक्षाच्या सर्वच कार्यकर्त्यांना आवडला असें नाही आणि आपल्या प्रतिनिधीने स्वीकारलेलें बंधन पाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असेंहि कांही कार्यकर्त्यांना वाटलें नाही.

तरी पण या सर्व खटाटोपाचा परिणाम असा झाला की, भिंतींवर *मागल्या वेळेपेक्षा फार कमी लिहिलें गेलें; व तें विद्रूप* विकृत करण्याचे प्रकार तर जवळ जवळ झालेच नाहीत.

भिंतीवर न लिहिण्याबाबत जेव्हा विचार चालला होता तेव्हा या कल्पनेला सर्वसाधारण नागरिकांचा पाठिंबा मिळेल असें वाटलें होतें. पण स्थानिक वृत्तपत्रांच्या वाचकांच्या पत्रव्यवहारांत तसें एकहि पत्र आलें नाही. उलट या प्रयत्नांना विरोध दर्शविणारें मात्र एक पत्र आलें.

## प्रचारफलकांवर भर

भिंतींबाबत हा संयम बाळगला जाण्याचें एक कारण असें दिसतें की, यावेळीं पक्षाचा किंवा उमेदवारांचा भर प्रचारफलकांवर जास्त होता. त्याबाबत मात्र कांही तक्रारी जाहीरपणें करण्यांत आल्या. हे प्रचारफलक घाण करणें, फाडले जाणें, काढून टाकणें, किंवा एका पक्षाचा फलक लावला म्हणून त्या जागेच्या मालकाला दम देणें असे प्रकार झाले. याबाबत पक्षकार्यकर्ते कितपत दोषी आहेत व समाजद्रोही मंडळी कितपत जबाबदार आहेत हें ठरविणें कठीण आहे. एक दोन ठिकाणीं तर असे प्रकार झाले की, एक पक्ष सोडून बाकी सर्वांचे प्रचारफलक रात्रीं काढून टाकण्यांत आले. यामागे पक्षकार्यकर्त्यांचा किंवा उमेदवाराचा हात होताच असें म्हणतां आलें नाही तरी त्यांनी जरा जास्त कटाक्ष ठेवला असता तर असे प्रकार झाले नसते असें वाटतें:

याउलट एके ठिकाणीं मात्र एका पक्षाच्या मंडळींनी पुढाकार घेऊन सर्व पक्षांचे प्रचारफलक एका जागीं लावले.

सर्व पक्षांनी मिळून ठरविलेला दुसरा कार्यक्रम म्हणजे सर्वपक्षीय प्रचारसभांचा. याबाबत असा अनुभव आला की, ठरल्याप्रमाणे फक्त एका पक्षाने चारहि सभांना आपले त्या त्या भागांतले उमेदवार पाठविले. उलट दुसऱ्या एका पक्षाची मात्र याबद्दल बरीच अनास्था दिसून आली.

तिसरा कार्यक्रम असा ठरला होता की, प्रत्येक पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांच्या सभेंत आचारसंहिता समजावून सांगायची व त्यासाठी स. प्र. संस्थेच्या प्रतिनिधीला बोलवायचें. पण फक्त दोन पक्षींनीं अगदी तत्परतेने हा कार्यक्रम पार पाडला. इतर पक्षांना सात आठ वेळा सूचना करण्यांत येऊनहि त्याचा कांही उपयोग झाला नाही

चौथा कार्यक्रम तक्रारींबाबतचा जर एखाद्या पक्षाच्या हातून आचारसंहितेचा भंग होतो आहे असें दुसऱ्या पक्षाला वाटलें तर त्यान तशी स. प्र. संस्थेकडे तक्रार नोंदवावी व स. प्र संस्थेनें त्याबाबत ज्या पक्षाविरुद्ध तक्रार असेल त्या पक्षाकडे चौकशी करावी असें ठरलें होतें स. प्र. संस्थेकडे अशा प्रकारच्या एकूण पांच तक्रारी नोंदविल्या गेल्या. *त्यांच्या चौकशीबाबत एका पक्षानें चांगलें सहकार्य केलें;* पण इतरांनीं संपूर्ण अनास्था दाखवली. तक्रारी सुरुवाती सुरुवातीला नोंदविल्या गेल्या. पण त्यांची चौकशी नीट होत नाही असें दिसलें तेव्हा तक्रारी येण्याचें बंद झालें.

## यंत्रणेचा विचार

या छोटयाशा अनुभवावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली. भाटघर परिसंवादावर टीका करतांना अनेकांनी असें म्हटलें की, आचारसंहितेचें पालन करण्यासाठी एखादी यंत्रणा उभी करणें आवश्यक आहे. ही गोष्ट सर्वसाधारणपणें सर्वांना मान्यहि आहे. पण जर खरोखर अशी कांही व्यवस्था करायची असली तर तो एका मोठा व्याप होऊन बसेल. *त्या यंत्रणेचे अधिकार सर्वांनीं मान्य करणें ही पहिली गोष्ट* झाली. तसेंच चौकशी करण्यासाठी इतर साधनसामुग्रीचीहि बरीच व्यवस्था करावी लागेल. त्यासाठी आवश्यक असणारा पैसा कोठून व कसा उभा करतां येईल. हा मोठाच प्रश्न आहे. सरकारची मदत घेणें हा एक मार्ग संभवतो. नाहीं तर मग कांही समाजहितैशी दानशूरांनी पुढे यावयास हवें.

ही अर्थात् एका अर्थानें दुय्यम अडचण आहे. सर्व पक्ष अशा प्रकारच्या यंत्रणेला कितपत मान्यता देतील, व तिचा अधिकार किती काळ मान्य करतील हाच खरा प्रश्न आहे. प्रत्येकाला वाटते की, दुसऱ्याची चूक दाखवून त्याचा कोणीतरी त्रयस्क व्यक्तीनें निषेध करावा; पण तोच प्रसंग आपल्यावर आला की, तीं प्रत्यक्ष व्यक्ति पक्षपाती आहे असा आरोप चटकन केला जातो. ही मनोवृत्ति कितपत बदलेल यावरच अशा यंत्रणेचें भवितव्य अवलंबून राहील.

पुण्याच्या सर्वपक्षीय बैठकांनी वृत्तपत्रांना दोन बाबतींत आवाहन केलें होतें. रिपब्लिकन पक्षाचें पुण्यांत एकहि वृत्तपत्र नाही, व तो तसा उपेक्षित पक्ष आहे. म्हणून त्या पक्षाच्या लोकांना वृत्तपत्रांनी जास्तीतजास्त सहकार्य द्यावें अशी एक विनंति करण्यांत आली होती दुसरा ठराव असा होता की, पुण्यांत सर्व पक्षांनी आचारसंहितापालनाचा जो प्रयत्न चालविला आहे त्याला उपयुक्त असें धोरण ठेवून सर्व वृत्तपत्रांनी सर्वतोपरी मदत करावी.

या दृष्टीनें स. प्र. संस्थेने पुण्यांतल्या वृत्तपत्रसंपादकांची एक सभा घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यासाठी फक्त एक वृत्तपत्राचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. ज्याचें स्वतःचें वृत्तपत्र नाहीं अशा एका पक्षाने याबाबत एक पत्रक काढलें. तें फक्त एका दैनिकानें प्रसिद्ध केलें. शेवटी त्या पक्षाला तें पत्रक जाहिरातीच्या स्वरूपांत प्रसिद्ध करावें लागलें. स. प्र. संस्थेनें याबाबत काढलेल्या कांही पत्रकांना प्रसिद्धी द्यायला दैनिकांनी नकार दिला.

## अनिष्ट पायंडे

पुण्याच्या निवडणूक प्रचारांत आणखी दोनतीन गोष्टीं विशेषत्वान जाणवल्या. प्रचारसभांत पक्षकार्यक्रमांवर भर देण्याऐवजी वैयक्तिक चेष्टा टवाळी जास्त चालत होती. असत्य आणि विपर्यास प्रचारहि खूप झाला. **विशेष खेदकारक घटना अशी की, विशिष्ट प्रकारच्या प्रचाराला प्रोत्साहन तर द्यायचें, पण त्याची जबाबदारी मात्र घ्यायची नाही.** एखाद्या वक्त्याचे वृत्तपत्रांत भाषण छापून आलें की, लगेच तो वृत्तांत चुकीचा असल्याचा खुलासा करण्यांत येतो. तसेंच लहानलहान मुलांना अभद्र घोषणा शिकवायच्या व त्यांना खाऊ देऊन मिरवणुका काढायला लावायचें; पण त्या घोषणा आम्ही शिकविल्या नाहीत असें सांगून मोकळें व्हायचें. कांही वेळां तर हीं मुलें एका पक्षाचा ध्वज घेऊन मिरवणूक काढीत व अभद्र, अश्लील

Statement about ownership and other particulars about MANUS MONTHLY, as required under Rule 8 of tehe Registalion of Newspapers (Central) Rules, 1956.

*Form No. IV (see Rvle No. 8)*

1. *Palce of Publication* :–**Poona**

2. *Periodicity of its Publication* :–**Monthly**.

3. *Printer's Narue* :–**S. G. Mazagaonkar.**

*Nationality* :–**Indian**.

*Address* :–**419, Narayan peth, Poona 2.**

4. *Publisher's Name* :– 
*Nationality* :– 
*Address* :– } **As above**

–: WONERS :–

**Rajhansa Prakashan,**
1015, *Sadashive peth, POONA* 2.

1) S. G. Mazagaonakar.
2) B. M. Purandare.

*I, S. G. Mazagaonkar, horo by,declare that the particulars given above are true, to the best of my knowledge.*

*S. G. Mazagaonkar*

Dated 1-8-1962 Publisher

घोषणा देत असत. ही मिरवणूक तास-दीड तास चालेल. तरीपण तिची जबाबदारी तो पक्ष किंवा उमेदवार घेत नसे. **या मागची बुटप्पी व भ्याड वृत्ति आपल्या लोकशाहीला अतिशय विघातक ठरणारी आहे.**

## जातीय द्वेषाचें प्रमाण कमी

जातीजातींत किंवा धर्माधर्मांत द्वेष पसरविण्याचे प्रकार दोनतीन अपवाद सोडल्यास जाहिरपणें झाले नाहीत. एका वक्त्यांनी एका विशिष्ट जातीला जाहीरपणें शिव्या दिल्याचें जाहीर झालें, पण मी 'तसें बोललों नाहीं' असा इन्कार करण्यांत आला. दुसरे एक वक्ते वेगवेगळ्या जातीच्या लोकांची त्यांचे पोषाख व आचार यांच्यावरून जाहीरपणें टिंगल करीत होते. पण वेगवेगळ्या धर्मांत कलह निर्माण करण्याचा प्रयत्न झाला नाही हें मात्र मान्य केलें पाहिजे.

मात्र दुसरीहि एक गोष्ट नमूद करून ठेवायला हवी. एका विशिष्ट अल्पसंख्य जातीची सभा घ्यायची, आणि त्या जातीचा आपल्या पक्षाला पाठिंबा मिळावयाचा असे कांही प्रकार झाले. व याबाबत अमुक पक्ष दोषी आहे असें नाही.


सभा–मिरवणुकांत व्यत्यय आणण्याचे कांही तुरळक प्रकार झाले असले तरी त्याचें प्रमाण फारच कमी होतें असें म्हणायाला हरकत नाही. सभा अजिबात बंद पडली असा तर एकहि प्रकर झाला नाही,

या वेळच्या निवडणूक–मोहिमेंत दोन गोष्टींचें प्रमाण वाढलेलें दिसलें. एक म्हणजे शिवराळ भाषा. अन्यपक्षाची निवडणूक खूण, किंवा एखाद्या उमेदवाराचें एखादें स्वभाववैशिष्ट्य यावर वाटेल तसल्या कोट्या करायचें प्रमाण फार होतें. नागडीउघडी शिविगाळहि मोठ्या प्रमाणावर झाली. आणि याला जबाबदार मोजक्या व्यक्तीच आहेत हेंहि सर्वांना माहीत आहे.

## पैशाचा वाढता वापर

दुसरी गोष्ट म्हणजे पैशाचा वापर. प्रचारफलक व तत्सम गोष्टींवर तर अफाट खर्च झाला. एका मतदारसंघांत अशा बाबींवर कोण जास्त खर्च करतो अशी स्पर्धाच लागली होती. अर्थात् हा खर्च उघडपणें व प्रचारसाधनांवर होत असल्याने एक वेळ तो क्षम्य मानता येईल. पण प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर भाडोत्री माणसें ठेवणें, गल्लींतल्या दादांना पोसणें, गटांना पैसे देणें व मतदारांनाहि वाटणें हे प्रकार या वेळीं फारच वाढलेलें दिसलें.

पुण्यांतील निवडणुकींचा आचारसंहितेच्या दृष्टीने असा आढावा आहे. त्यामुळे लोकशाही बळकट कितपत झाली व क्षीण किती झाली याचें मूल्यमापन ज्याचें त्यानें करावयाचें आहे. वरील निवेदन मीं व्यक्तिशः केलेलें आहे, समाज प्रबोधन संस्थेचा चिटणीस या नात्याने नव्हे हें मुद्दाम नमूद करून ठेवायला हवें. तसेंच पक्षांचीं किंवा व्यक्तींचीं नांवें न घेण्यांत जबाबदारी टाळणें हा उद्देश नाही कोण करतो यापेक्षा काय करतो व काय घडतें आहे हें जाणून घेणें महत्त्वाचें आहे. नांवनिशीवार निवेदन करणें कठीण आहे असें नाही; पण तसे पुरावे व आधार मिळवायला वेळ लागेल एवढेंच. मात्र कांही व्यक्ति किंवा पक्ष यांना झोडण्यापेक्षा अनिष्ट प्रकार व प्रवृत्ति कोणत्या आहेत हें जाणून घेणें प्रथम आवश्यक आहे असें मला वाटतें. मगच त्याच्याशी झगडण्यासाठी कोणत्या व्यक्ति–पक्षांचा निषेध केला पाहिजे हें पाहतां येईल.



# अशीही मतं फुटलात

लेखिका
**सौ. निर्मला कुलकर्णी**

संध्याकाळची वेळ होती. सूर्य अस्ताचलाला नेहमीसारखाच चालला होता. त्याचा भडकाहि उडाला नव्हता की अंधारून आलेल्या उरानं धरित्री निःश्वासहि सोडत नव्हती. त्या लहानशा टेकाडाच्या अंगावर १५-२० खोपटं, मोडकेल्या अंगानं, कुब्जेसारखीं अठरा ठिकाणीं वाकलेल्या अवस्थेंत उभीं होतीं. कुडाच्या भिंती शेणानं सारवलेल्या होत्या आणि पोरंसोरं दारांत वाट बघत बसलीं होतीं आईबापांची.

कावळे करकरत बसले होते आणि बगळ्यांची माळ उडत लांब चालली होती. एवढ्यांत रामदानं हाळी घातली.

'अरे ये पांडा, धोंड्या, गोंद्याला घिऊन ये हतं.' पांडाच्या हातची तमाखूची चिमट घाईघाईनं धोंड्यानं ओढून तोंडांत टाकली ती पांडाच्या लक्षांतच आली नाही. अर्धा फडका गुंडाळलेला पांडा पळतपळत रामदाकडे गेला.

'काय वो दादानु, आज कसे काय हकडं आलाव् ?'

'आरं पोरानु आज सभा भरवायची हाय म्हनं.'

'आँ ! तिच्या मारी-सबा भरवाया ह्ये काय शेर हाय काय ?'

पांडाच्या दरिद्री डोक्यांत बसलेली ही कल्पना जणू हुसकून काढण्यासाठी रामदानं त्याच्या डोक्यावर थापटी मारत म्हटलं, 'त्येका उगच काडलींस पंचवीस वर्स. जल्माला येऊन फुकाट'

'आतां काय म्हनतांव् ! जल्माला आलों. परपंच करतुया न्हवं का ! बायको हाय, पोरगं हाय,' पांडानं आपला 'पाईंट' पुढं ढकलला.

'त्येका, अरं परपंच तर सान्यांनींच क्येलाय. तो तू यकटा कसला करतुयास ! तुझी बायकुबी करतीया न्हवं परपंच.'

'अरं, तसं न्हाई...म्हनलं.'

'आतां काय म्हनू नगो. आतां सबा भरवायची त्येला मुकाट सान्या वस्तीवरल्या गड्यास्नी बोलवूनशान् आन.'

पांडानं धुळीनं भरलेलं डोस्कं कराकरा खाजवलं अन् सगळ्या वस्तीवर फिरायला लागला. आमचे चिपळूणच्या आजूबाजूचे हे लोक उत्साही फारच ! त्यांत चिक्कू तर पहिल्या नंबरचे. परिस्थितीनं आलेला दोष आहे तो, पण उत्साह दाखवण्याबाबतहि चिक्कूपणा. पांडाला प्रत्येकानं डोस्क्यापास्नं पायापर्यंत न्याहाळलं आणि विचारलं,' पांडवा ही काय बिलामत काडलियास् ?'

'अरं गड्यानु सबा भरवायची हाय म्हनं.' सभा शब्द ऐकतांच जो तो गडी गप खोप्यांत शिरला. पांडा तसाच परत फिरला.

'रामदा, कोन यिना सबेला. म्यांबी जातों.'

'आर कुटं जातो मुड्द्या ! चल माज्यासंगट कसं न्हाय् येत कोन त्यें बघतु.' रामजी आणि पांडा तरातरा निघाले.

रामजी जरा हुशी आणि चळवळ्याढवळ्या प्राणी होता चिपळूणच्या बाजाराला रोजला बैलगाडी घेऊन जाणारा असल्यानं 'शेरचीं थेरं' त्याला जरा कळत होतीं. आज त्याला बाजारांत भटला होता म्हामूद. कधी नव्हे तें त्याला बोलावून तांबडा भडक गुळाचा कोपभर च्या पाजला होता 'इक्बाल' हाटेलांत. म्हामूद म्हणाला,' रामज्या, त्येका काम कर माजं. बिलेक्शन आलंया. आमचा हुसनमिया उबा हाय.'

'आरं तिच्या आन् कुटं हाय त्यो ?' रामज्यानं तोंडाचा आ वासला.

'आरं हाय तकडं म्हमईला. त्येला मत्त द्येयाचीं.'

'म्हमइला मत्त द्याया कोन जानार ? मला खर्च द्येलास तर जायान्. अन् जराशी जिवाची म्हमइबी करून येन.' रामजीनं जिभल्या चाटत म्हटलं.

'आरं तसं न्हाय्. म्हमइला न्हाय् जायाचं हतंच मत्त द्येयाचं.'

'पण कसं द्येयाचं ?'

'सांगतु, हतं पेटी ठयेवत्यात मुंशीपालटींत. ततं कागुद टाकायचा" आणि मग म्हामूदनं पुन्हां पुन्हां त्याला मतं द्यायची रीत समजावून सांगितली, पण स्वतः म्हामूदला एवढंच माहीत होतं की, पेटींत कागद टाकायचा. तेव्हां त्यानं तेंच वाक्य परत परत सांगितलं. रामज्याला बाकीचा कांही उमज पटला नाही. फक्त एवढंच कळलं की, हुसनमिया वस्तीवर यायचा होता आणि संध्याकाळीं सभा भरवायची होती. हुसनमिया निवडून आला तर रामजीला तो आपल्या मालाची नेआण खाडीवर करायला कायमचं काम देणार होता.

रामजीनं हातांपायां पडून सान्यांना बोलावलं. सभा भरली. हुसेनमिया गोंडेदार टोपी हलवत उभा राहिला.

'गड्यानु, म्यां उबा न्हायलोंय्.'

'त्ये दिसतंया पर खाली बसा.' एक आवाज.

'म्हाय् मी विलेक्शणांत उबा हाय्. मला मत्त द्येया पायजे.'

'आमाला काय द्येणार बद्दल?' एव्हाना रामज्याला काय मिळणार होतं त्याची बित्तं-बातमी लागली होती साऱ्यांना. म्हणूनच धोंडानं कावेबाजपणें डोळे बारीक करत विचारलं.

'तुमाला? निवडून द्येलांव तर तुमाला शिक्षान् द्येन. तुमच्या पोराबालान्ला लिवाया वाचाया शिकवेन्' चेहऱ्यावर औदार्याचा भाव आणून हुसनमिया म्हणाला.

धोंडानं, पांडाकडे आणि पांडानं रामजी-कडे पाहूचलं.

'शिक्षान् नको पोरांला. शिकून काय भात न्हाइ लावनार की शेत न्हाइ नांगरनार.'

'मंग काय पायजे त्ये मागा. निवडून द्येलांव तर सरकारला सांगून आमच्या लोकांला पायजे त्ये द्येऊन टाका म्हणून.'

धोंडाचं जरासं समाधान झाल्यागत दिसलं, पण रामजीसारखा हा दृश्यफायदा नव्हता. त्याला मळमळत होतं, पण बोलतां येईना. शेवट सगळे चूपचाप बसल्यावर हुसेन-मियाला वाटलं, 'झाला आपला प्रचार. द्यावी सोडून सभा.' सभा पांगली. कोणी कांही बोललं नाही. हुसेन दुसऱ्या दिवशीं मुंबईला निघून गेला. मनांतल्या मनांत त्यानं दोनशे मतांची पक्की खात्री धरली होती.

त्याच दिवशीं संध्याकाळीं धोंडानं पुन्हां पांडाला हाळी मारली.

'पांडा, लेका आज सबा बोलवायची.'

'आँ आतां कंची सबा?'

'आरं काल झाली हुसनमियाची. आज आपल्या त्या साठ्याबद्दल बोलवायची.'

'कोनचा साठे काडलायास?'

'अरं, साठे हाय तकडं रत्नांगिरीचा. त्यो उबा न्हायलाय्.'

'च्या मारी अरं दोगं दोगं हुबं राहूचलेत तर आपुन मत्त कुनाला द्येयाचं?'

'सारं आपुन द्येयाचं साठ्याला. त्ये आज येनार हायती. लई राजा मानूस हाय.'

पांडा तसा अक्कलवान् नव्हता. त्यानं नुस्तंच डोस्कं खाजवलं आणि पुन्हा साऱ्या वस्तीला आवतण देऊन आला. धोंडा पान चघळत बसला होता. पांडानं हळूच विचारलं, 'धोंडा, साठ्यांना मत्त द्यायचं म्हन्तूस त्ये मत्त तरी कशापायी व?'

तोंडांतली पानाची पिचकारी पार आठ हातांपर्यंत थुंकत धोंडानं एक थापटी मारली पांडाच्या डोस्क्यांत...

'पांडा रं पांडा, डोकं हाय् का मडकं? अरं फुकाट जन्माला आलास. साठे निवडून आले तर बघ तर खरां काय हुईल त्ये."

'अरं मर्दा, पर काय म्हून मत्त द्येयाचं?'

'पांडा, आरं आपुन गरीब मानसं. तकडं सरकार आपल्यासाठी कायनुबायनु करतं त आपल्यास्नी म्हायती न्हाय होत. लोक म्हनत्यात शिक्षान् फुकाट, खाया फुकाट, सगलं फुकाट द्येयाचा इचार हाय् सरकारचा. पर परतेक्ष आपल्याला कायबी मिळत न्हाय्. हये साठे जाऊन इचारनार हाईत सरकारला, 'अरं मुड्द्या, त्या पाकिस्तानला समदं द्येतूस, आमच्या या धोंडापांडाला कां न्हाई द्येत?'

'आँ काय म्हनतूस? आरं तुजंमाजं नांव घेनार म्हनं?"

'आरं घेनार काय? घ्येनारच.' धोंडा हरखला होता. पांडाला वाटलं आपलं नांव त्या पोस्टमनलासुद्धा माहीत नाही. त्या दिवशीं पोराचा कागद तर पोस्टमन साऱ्या वस्तीभर हिंडून विचारत बसला. आता घे म्हणावं. तुला माहीत नाही तें नांव सरकारला माहीत होणार. पांडानं आनं-दाच्या भरांत तंबाकू काढली आणि ती तो जोरजोरानं मळूं लागला.

धोंडाच्या मनांत विचार येत होता, 'बरी जिरली रामजीची. हुसेनमियाकडून मालाची ने-आण करायचं कॉंट्रॅक्ट घेतोस. मला तर साठे आपली शेती देणार आहेत खंडानं. आणि त्या शेतीचीं स्वप्नं बघतां बघतां नेहमीसारखाच त्याचा हात वळवळूं लागला.

एवढ्यांत पांडा म्हणाला, 'धोंड्या, साठे तकडं रत्नागिरीला आन् मत्त हितं कसं द्येयाचं?'

पांडाच्या हातची तंबाकूची चिमट आयती उचलून तोंडांत टाकत धोंडा म्हणाला. "अश्शीं मत्तं द्येयाचीं." आणि पटकूर झट कून धोंडा बोलबोल म्हणतां निघून गेला. त्याच्याकडे आ वासून बघणाऱ्या पांडाच्या डोक्यांत एक टपली बसली. वळून पहातो तों गोंदा मागं उभा.

'अरं बघतुस काय येरबाडल्यागत?' गोविंदानं पांडाशेजारी बैठक मारली.

'म्हाय् म्या म्हन्तू गोईंदा, हुसनमिया हुबा न्हानार आन् साटंबी उबा न्हानार. मंग मत्त कोनाला द्येयाचं?'

'हात् तुझी. आरं मत्त द्येयाचं त्या चित्राला.'

'चित्र? ह्यें चित्र कुटलं काडलंस बाबा?'

'पांडबा, तुला अक्कल न्हाई. ह्ये समदं लोक म्हणत्यात, पन म्यांबी त्येच म्हंतोंय् आज.'

'आरं पर का?'

'का म्हंजी काय? अरं म्हजी चित्र न्हवं-चित्रं ह्यें नांव हाय्.'

'आँ काय तरी-येकेक, नांव म्हने चित्र-चित्रावानीच जनू.'

'तुजं पांडा नांव म्हजी इटोबावानी वाटत असंल.' गोविंदा फुस्कारला.

'आरं पर द्येवाचं हाय् नांव.'

'पर त्या मूरतीच्या काळ्याढोण रंगा-खिरीज दुसरं काय् नाय् तुज्यांत. हां आन् दगडोबा तर हायस् म्हनं.'

'आरं पन तूं का रागाला येतूयास?'

'पांडा, रागाला नको येऊं तर काय करूं? आरं तो चित्र क्येवढा मानूस, नुसता बोलाया लागला तर भाताच्या लाह्या फुटल्यागत आवाज येतो. आन् बोलतो काय म्हाईत हाय?'

एकाद्या देवाबद्दल बोलावं त्या आवेशांत गोविंदा बोलूं लागला. पांडाच्या चेहऱ्यावर नुसतंच प्रश्नचिन्ह उमटलं.

'चित्र म्हनतात, गोविंदा! अरं सरकार म्हंजी कोन? आँ? सरकार म्हजी ह्ये


भारत सरकारकडून रजिस्टर केलेले

**पांढरे डाग**

१९३६ पासून प्रसिद्ध व हजारोंनी प्रशंसापत्रें पाठविलेलें शरीरावरील पांढऱ्या कोडाचें अजब गुणकारी औषध.

किमत ५ रु. पो. ख. १। रु.

**माहितीपत्रक मोफत मागवा**

**दमा, श्वास** रोगावर अनुभविक

गुणकारी औषध किं. ५ रु. पो. ख. १। रु

कोणत्याहि रोग्याचें प्रकृतीमान कळविल्यास त्यावर गुणकारी औषधें पाठवूं.

सूचना :- निंदक व धोकेबाजापासून सावध रहावें.

वैद्य :- के. आर. बोरकर, आयुर्वेद भवन

मु.पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

सावकार अन् येपारी. तूं आन् मी सरकार बनूं तवाच खरं राज ऱ्हईल बाबा.' पांडाच्या चेहऱ्यावर एक आणखी प्रश्नचिन्ह उमटलं. गोविंदा आणि चित्रे—

'छ्यः छ्यः गोविंदा, आरं कायच्या बाईच म्हन्तोस. आरं तूं जर सरकार झालास त निसता बसूनशान् ऱ्हाशील आन् मंग ही रस्त्याची झाडझूड कुनी करायची? छ्यॅ....' पांडाला ती कल्पना कशीशीच वाटली.

'आरं तूं असाच दरिद्री ऱ्येका. आज वग तरी चित्र कसं बोलतील त्ये.'

पांडाची तिसऱ्या दिवशींची संध्याकाळसुद्धा हाका मारण्यांत गेली. चित्रे आले आणि अर्धा तास जोरजोरानं आदळआपट करून गेले. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ इतर कुणाला कळला नसला तरी गोविंदाला मात्र एकच अर्थ कळला होता. तो म्हणजे चित्रे निवडून आले असते तर त्यांनी कबूल केल्याप्रमाणे गोविंदाला म्हमईच्या गिरणीत मुकादमाची नोकरी मिळणार होती.

आणि कशी कोण जाणे नंतर त्या वस्तीवर माणसांची रीघ लागूं लागली. रोज कुणी ना कुणी येऊं लागलं आणि त्या वस्तीचं भाग्य उजळलं. तिथं रस्ता तयार करण्याची योजना सुरू झाली. इतके दिवस इकडे तिकडे उनाडणाऱ्या पोरांना शाळेचे भावी आधारस्तंभ हें नवं नांव मिळालं. कुणीतरी यायचं, रस्त्याचीं मापं घ्यायचं आणि हजारो रुपयांच्या गोष्टी करून जायचं. दुसरे कुणी पांढरे शुभ्र कपडे करून यायचे आणि शाळेची इमारत कुठे बांधायची याचा खल करायचे. गावकऱ्यांना वाटलं आपणहि कुणीतरी आहोंत.

होतां होतां निवडणुकीचा दिवस उजाडला. त्या उपेक्षित वार्डाकडे कधी न येणारे लोक घिरट्या घालूं लागले. रामजी, धोंडा, गोविंदा सगळेजण मारे जोरजोरानं आपल्या पुढाऱ्यांचीं नांवं घेऊन ओरडूं लागले.

रामजीच्या हुसेनमियाला धोंडानं साठ्यांचा शह सुरू केला तर दोघांच्याहि ओरडण्याला गोविंदा चित्र्यांचा काटशह देऊं लागला. एवढ्यांत भराभर गाड्या आल्या आणि मग मात्र हलकल्लोळ उडाला. ज्याचे त्याचे मतदार ओढून न्यायला सुरुवात झाली. या गडबडींत कोण कुणाच्या गाडींत बसले हेंहि सांगतां आलं नाही. वस्तीवरची लहानसान पोरंसुद्धा गाडींत बसायची मजा म्हणून गाडींत बसलीं आणि ही हुल्लड निवडणुकीच्या मतदान-केंद्रावर पोचली. जाता जातां एकमेकांवर राळ उडवली जात होतीच आणि अखेर हें सारं लटांबर निवडणूक केंद्रावर पोचलं. एकेकाचा नंबर लागेपर्यंत सगळेजण झाडाच्या सावलींत नुसतीच आरडाओरड करत बसले होते.

निवडणुकीच्या प्रत्यक्ष जागेवर जाणारा माणूस पांडा हेरून काढत होता आणि त्याला मार्गदर्शन करत होता. प्रत्येकाशीं कांहीतरी कुजबुजत होता. आणि अखेर सगळं मतदान झालं.

संध्याकाळीं पुन्हा सभा भरली नाही. सगळेजण आपापल्या सुखस्वप्नांत दंग होते. गोविंदा मिशांवर ताव देत पांडाला म्हणाला, 'बघ तूं पांडा, आपलीं सगळीं मतं चित्राला ग्येलीं.'

पांडानं मान हालवली. रामजीनं पटाक्याचा सोगा नीट बांधत म्हटलं, 'पांडा माझ्या मालाच्या ऱ्येआण करायच्या कामावर तुलाच म्यानेजर करतों बघ.' तरीहि पांडानं मान हालवली.

आणि धोंडानं पांडाच्या डोक्यावर टपली देत म्हटलं, 'अरं सारेजण मांडे खातायत् पर आमचं साटं येणार निवडून. अरं दोन शंभर मत्त मिळालीं ऱ्हवं त्याला.'

'खरं म्हतां?' पांडानं आ वासला.

कधी नव्हे ती तंबाकूची चिमट पांडाच्या वासलेल्या तोंडात टाकत धोंडा म्हणाला, 'पांड्या, ल्येका खरं काय इचारतोस हा मामला हाय मोटा तुला काय कळतंय् येड्याला, तूं आपला निसता हूं म्हनलं की सबा बोलव. तुझ्या ध्येनांत कायबी येयाचं नाय्' आणि धोंडा गालातल्या गालांत हसत तिथून निघून गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पांडा मुंडी हालवत बघत बसला होता. इतक्यांत त्याच्या मागे गंधे मास्तर येऊन उभे राहिले. त्यांनी विचारलं, 'पांडा तूं कुणाला मत दिलंस?'

'त्या गोपाळरावांना.'

'असं, तूंच तेवढा एकटा डोक्याचा आहेस. साऱ्यांनी उगाच फसल्यातरी नादानं डोकीं फिरवून भांडणं केलीं आणि आपलीं सोन्यासारखीं मतं फुकट दवडलीं. गोपाळराव आले निवडून तर कांहीतरी करतील वस्तीसाठी.'

'व्हय् मास्तर. आन् गोपाळरावबी येयाला मिवडून. वस्तीचीं सारीं मतं त्येनाच मिळालींत!' पांडानं डोळे बारीक करत म्हटलं.

'कशावरनं म्हणतोस पांड्या?' मास्तर चकित झाले. पांडबाच्या बावळटपणाचं त्यांना हसूं आलं.

'त्येचं असं झालं मास्तर. आता सांगूं नका तुमी कुणाला. पर जवां म्या तिथं उबा व्हतों, तवा एका एकाला इचारत व्हतों 'बाबा, कुनाला मत द्येयाचं?' तो कोन म्हन साठ्यांना. म्यां म्हनलों, 'तसं म्हनायचं न्हाय्. तो अफिसर वरडतो आन् हाकलून द्येतो. तुमी म्हना भाताची लोंबीची खून हाय् त्येला द्येयाचं मत्त. कोन म्हनतं हुसनमियाला द्येयाचं की, मीं सांगितलं, हुसनमियाची खूण हाय् भाताची लोंबी. त्यांतल्या कुनी इचारलं आर होडी व्हती खूण. म्या म्हनलं, 'अरं हितल्या आफिसरनं सांगितलंया की होडी न्हाइ करायची. हयें आपलं भाताचं आगर. भाताचीच खूण करायची' मग त्यान भाताच्या लोंबीला मत द्येयाच. कोणी चित्राला सांगितल तर म्हनलं, 'अर येड्या, चित्र उबा हाय. त्यानं सांगितलं माज्या मतदारांनी मला म्हजी भाताच्या लोंबीलाच मत द्येयाचं. हपिसर म्हनला न्हायी द्येऊं देनार. चित्र म्हनला काय करशील त्यें करू घेन. मग हपिसरान् ठरवलंय् की मतदारांना खोटं सांगायचं की चित्र्यांची खूण हाय् कंदिलाची. तवां ध्येनांत ठेवा. काय बोलूं नगा. मुकाट्यान भाताच्या लोंबीची खूण हाय तत मत्ताचा कागुद टाका.'

मास्तर शांतपणें ऐकत होते. इतके दिवस ज्याला मूर्ख म्हटलं जात होतं त्या पांडाचं अजब डोकं पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. हसत हसत ते म्हणाले, 'पांडा, तुझ्या हिकमतीचं कौतुक वाटतंय् पण गोपाळरावांकडनं तुला काय मिळायचं नाहो.'


'मला नग कायबी मास्तर. फकस्त शाळा बांधून घ्या त्यवढी. म्हजीं पोरं तरी काय शिकतील आमची' आणि पांडा समाधानानं हसला.

★

## ' मी सारें कांही कबूल करतों,
## पण प्रथम या कुत्र्याला आवरा '

*गुन्हेगारांना एवढी जबरदस्त दहशत बसविणारा*

# इटलीचा प्रख्यात डिटेक्टिव्ह कुत्रा ' डॉक्स् '



**बा. द. राजे**

इटलीमध्ये ख्यातनाम कुत्रा कोणता असेल तर तो ' डॉक्स् ' होय. डॉक्स् हा पोलिस कुत्रा आहे. गेल्याच वर्षी त्याच्या १३ व्या वाढदिवसानिमित्त त्याला आवडणारे पदार्थ त्याने रोममधील कुठल्याहि प्रख्यात रेस्टॉरंटमधून खावेत अशी त्याला मुभा देण्यांत आली होती आणि म्हणूनच आपला मालक सार्जंट गिव्होव्हेनी मैमोने याला घेऊन डॉक्स्, रोममधील प्रत्येक रेस्टॉरंट आपल्या तीक्ष्ण नाकाने वास घेत धुंडाळीत चालला होता. शेवटीं तो अगदी एका सामान्य प्रतीच्या रेस्टॉरंटच्या दाराशीं थांबला व त्याने दरवाजावर धडाधड धडका द्यायला सुरुवात केली. हॉटेलमालकाने दरवाजा उघडल्याबरोबर तो बंदुकींतून सुटणाऱ्या गोळीप्रमाणे झेप टाकीत तेथेच आंत जेवत असणाऱ्या व्यक्तीच्या रोखाने धावला. जेवणारी व्यक्ति ६ वर्षांपूर्वी टयूरीन येथे डॉक्स्च्या तावडींत सांपडलेला एक गुन्हेगार होता. ६ वर्षांनंतरहि डॉक्स्ने त्याला तावडतोब ओळखून काढलें होतें.

रोमच्या प्रख्यात ' फिरत्या पोलिस दलांत ' सामील झाल्यापासून आतापर्यंत डॉक्स्ने जवळजवळ ४०० गुन्हेगारांना छापा घालून हुडकून काढलें आहेत. जगांतील 'सर्वश्रेष्ठ पोलीस कुत्रा' असा त्याचा लौकिक आहे. बहादुरीबद्दल त्याने आतापर्यंत २७ रौप्यपदकें व ४ सुवर्णपदकें मिळविलीं आहेत. १९५३ सालीं सर्व युरोपमधील कुत्र्यांच्या वार्षिक चढाओढींत जेव्हा त्याने प्रथमच ' सर्वश्रेष्ठ कुत्रा ' म्हणून मानाचं पान मिळविलं तेव्हापासून आजतागायत दुसऱ्या कोणत्याहि कुत्र्याला हा मान त्याने मिळूं दिलाच नाही. या वार्षिक चढाओढींत, स्कॉटलंड यार्ड पोलिसांचा ' रेक्स ' व पॅरिसच्या पोलिस केंद्राचा ' झोरो ' हे दोन विख्यात कुत्रेहि भाग घेतात. ही गोष्ट ध्यानांत आणली तर आपल्याला डॉक्स्चा मोठेपणा चटकन् लक्षांत येईल. अर्थात् या मोठेपणासाठी डॉक्सने किंमतहि तशीच जबर दिली आहे. त्याच्या केसाळ कातडयाच्या मऊ मऊ लोकरीखाली, बंदुकीच्या सात गोळ्यांच्या खुणा आपल्याला स्पष्टपणें दिसून येतील. आणि या खुणा १६० गुन्ह्यांत पोलिसांबरोबर आपलें कर्तव्य करतांना डॉक्स्ला गुन्हेगारांकडून मिळालेला प्रसाद होय.

कायदेशीरपणेंच बोलायचें झालें तर १९४६ मध्ये जन्मलेला डॉक्स खरं म्हणजे आता पेन्शनी आयुष्य उपभोगण्यास मुक्त आहे, कारण जर मानवांच्या आयुष्याचीं सात वर्षं हीं कुत्र्याच्या एका वर्षाच्या आयुष्याप्रमाणे धरलीं तर डॉक्स्चें हल्लीचें वय जवळजवळ ९८ वर्षांचें आहे, परंतु असें असूनहि अजूनहि छाती हवकवून टाकणारे श्रम तो दिवसभर करीतच असतो. जरी थातुर-मातुर गुन्ह्यांसाठी लहान कुत्र्यांचा उपयोग करतात, तरी ज्या गुन्ह्यांमध्ये गुंतागुंत फार आहे अशा वेळेला डॉक्स्ला पाचारण केलें जातें आणि अजूनपर्यंत तरी डॉक्स्ने आपली निवड खोटी ठरविलेली नाही.

डॉक्सबद्दल रोमच्या पोलिस डिपार्टमेंटचा प्रमुख डॉक्टर कार्मेल मार्झिनो म्हणतो की, ' डॉक्स् जरी कुत्र्याच्या जातीला जन्माला आला असला, तरी त्याच्यामध्ये कुत्र्यापेक्षा कांहीतरी आगळें वैशिष्टय आहे. आणि आतापर्यंत कोणत्याहि गुप्त हेरांपेक्षा त्यानेच जास्त गुन्ह्यांचा छडा लावलेला आहे. आम्ही त्याला आमच्या अत्यंत हुशार माणसांपैकीच एक समजतों.' डॉक्स्चें घ्राणेंद्रिय इतकें तीक्ष्ण आहे की, गजबजलेल्या शहरांत, जेथे अगणित पादचाऱ्यांच्या रहदारीमुळे व कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या वेगवेगळ्या वायूमुळे विशिष्ट प्रकारचा वास हुडकून काढणें कठीण होतें, तेथेहि डॉक्स १२–१२ मैलांपर्यंत वासावर माग काढूं शकतो, परंतु तीक्ष्ण घ्राणेंद्रिय हेंच डॉक्स्चें हुकुमाचें पान नाही; तर तो गुन्हा शोधून काढतांना आपल्या बुद्धीचा उपयोग मोठ्या कुशलतेने करतो, हें त्याचें खास वैशिष्टय आहे.

याबाबतची एक वैशिष्टयपूर्ण घटना म्हणजे " हरवलेल्या बटनाची केस " होय. एका रात्रीं एक लुटारू रोमच्या प्रसिद्ध सिनेमा थिएटरमध्येंच लपून राहिला व त्या थिएटरच्या भिंतीला भोक पाडून पलीकडच्या जवाहिऱ्याच्या दुकानांत त्याने प्रवेश केला. परंतु ही गोष्ट रात्रपाळीच्या पहारेकऱ्याच्या लक्षांत येतांच त्याने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. थोडीशी झटापट होऊन तो चोर पळून गेला. तावडतोब त्या घटनास्थळीं डॉक्स्ला पाचारण करण्यांत आलें. त्या पहारेकऱ्याच्या कपडयांना लागलेल्या त्या चोराच्या कपडयाचा वास हुडकून

काढून त्याला चोराचा तपास लावण्यास सांगितलें. डॉक्सने वासावरून माग काढीत काढीत पोलिसांना शहराच्या दुसऱ्या टोकाला नेलें व तेथील एका खोलींत झोपलेल्या माणसावर त्याने झडप घातली. ज्या व्यक्तीला डॉक्सने धरलें होतें त्याच्याबाबत पूर्वीचें गुन्ह्याचें रेकॉर्ड होतें, पण तरीहि या घरफोडीच्या गुन्ह्याशीं आपला कांहीहि संबंध नाही असें तो खात्रीपूर्वक सांगू लागला. शिवाय रात्रपाळीच्या पहारेकऱ्यानें पण म्हटलें की 'हा तो चोर नव्हे.' त्यामुळें डॉक्सच्या निश्चयाबद्दल त्याचा मालक मैमोने याच्या मनांतहि शंका आली. त्याने त्याला जास्त काळजीपूर्वक निर्णय देण्यास खुणावलें. यावर डॉक्स त्याच्याकडे पाहून एकदा भुंकला व पुन्हा त्याने पोलिसांना त्या जवाहिऱ्याच्या दुकानांत आणलें. तेथे आदल्या रात्रीं चोराची व पहारेकऱ्याची झटापट झाली होती, त्या जागीं पडलेलें एक बटन उचलून मैमोनेच्या हातांत ठेवलें, पुन्हा भुंकून आपल्या मालकाकडे पाहिलें व परत तो पहिल्या घराकडे आला. त्या घराच्या एका खोलींत असलेलें कपाट त्याने पंजाने उघडलें व कपाटांतील हँगरवर असलेला त्या संशयिताचा रेनकोट दाताने ओढून काढून मैमोनेच्या हातांत ठेवला. त्या कोटाचें एक बटन गहाळ झालें होतें, ती जागा हुंगून दाखविली. त्या जागेचें बटन ज्या धाग्याने शिवलें होतें तो धागा थोडासा लोंबत होता. मैमोनेने आपल्या हातांतील बटनाच्या धाग्याकडे पाहिलें. दोन्ही धागे एकाच प्रकारचे होते. शेवटीं त्या गुन्हेगाराने आपला गुन्हा कबूल केला.

मैमोनेने डॉक्ससंबंधीचे सर्व प्रसंग एकत्र लिहून ठेवले आहेत. त्याचा एक भलामोठा ग्रंथच झाला आहे. त्यांतल्या वर्णनावरून कित्येक प्रसंगांमध्ये डॉक्सचें प्रसंगावधान किती उच्च प्रतीचें होतें हें दिसून येतें. एका प्रसंगीं, एका भरधाव मोटारीखाली एक लहान मुलगी चिरडून मरण्याची वेळ आली होती. डॉक्सने हें पाहिलें मात्र, त्याने तीरासारखें धावत त्या मुलीकडे झेप घेतली व तिच्या फ्राकची कॉलर आपल्या तोंडांत धरून तिला खेचीत नेलें. एका सेकंदाचा उशीर झाला असता तर मुलीच्या चिंधड्या उडाल्या असत्या. दुसऱ्या एका प्रसंगीं तर लुटारूने झाडलेल्या गोळीमुळें एक पाय रक्तबंबाळ झाला असतांनाहि तीन पायांनी पळत जाऊन डॉक्सने ५ मैलांपर्यंत त्याचा पाठलाग केला आणि शेवटीं त्याला पकडलेंच.

एकदा तर हिमवर्षावांत सुविआको पर्वतांत बर्फावरून घसरगुंडी करणारा एक इसम बेपत्ता झाला होता. त्याला शोधण्यासाठी पोलिस पथकाने आपल्या कुत्र्यांसह जंग जंग पछाडले व पत्ता लागत नाही असें पाहून त्याची आशाहि सोडून दिली, परंतु डॉक्सने मात्र त्याचा तलास लावून दाखविला. दुसऱ्या एका प्रसंगीं, आपल्या मालकाला मदत बोलविण्यासाठी टेलिफोन करायला वेळ मिळावा म्हणून डॉक्सने १२ संशयितांना एका ओळींत उभें करून ठेविलें होतें.

डॉक्सचें कौशल्य पाहून त्याला पाहाणारे सर्वजण चकित होतात. भरलेल्या पिस्तुलांतील एकहि गोळी न झाडतां तें पिस्तुल रिकामें करून दाखविण्याचें कसब जगांतील फक्त एकाच कुत्र्याच्या अंगांत आहे व तो कुत्रा म्हणजे डॉक्स होय. हें कौशल्य आत्मसात् करायला ८ वर्षे मेहनत करावी लागली. त्याचप्रमाणे खुर्चीला कितीहि अवघड रीतीने बांधून ठेवलेल्या माणसाला तो कांही मिनिटांतच मुक्त करूं शकतो. शिकारी कुत्र्याचें कौशल्य त्याच्या धैर्यांत व बुद्धींत एकवटलेलें असतें असें म्हणतात, तें डॉक्सच्या बाबतींत तंतोतंत खरें आहे. गेल्याच वर्षी डॉक्स व त्याचा मालक मैमोने रोमच्या गलिच्छ वस्तींतून फेरफटका मारीत असतांना, मोटारसायकलवर बसलेल्या दोन इसमांनी डॉक्सला पाहिल्याबरोबर मोटरसायकल तिथेच टाकून पोबारा केला. त्यांच्या या वर्तनाचा संशय आल्यामुळे मैमोनेने डॉक्सला मोकळा सोडला. डॉक्सने मोटरसायकलच्या सीटचा वास घेतला व आपल्या कामास सुरुवात केली. अंधाऱ्या, वेड्यावाकड्या बोळकंडांतून, जीर्ण, पडक्या वाड्यांतून मार्ग काढत काढत, शेवटीं त्याने मैमोनेला एका इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर नेलें. त्या ठिकाणीं राहात असणाऱ्या बाईने त्या दोन माणसांना पाहिलें नसल्याचा निर्वाळा दिला, परंतु त्या खोलींत असलेल्या एका सोफ्याकडे पाहून डॉक्स मोठमोठ्याने भुंकूं लागला. तेव्हा मैमोनेने त्या सोफ्याकडे पिस्तुल रोखून म्हटलें "कोण लपून बसला असेल त्याने उभे राहावें. प्रथम हात वर करा." त्याबरोबर दमलाभागलेला एकजण हात वर करून गुडघ्यावर उभा राहिला. परंतु त्याच वेळेला मैमोनेच्या पाठीमागे फडताळांत उभा असलेला दुसरा इसम हातांत सुरा घेऊन, लपतछपत, त्याच्यावर वार करण्यासाठी त्याच्या रोखाने येत होता. मैमोनेला याची दादच नव्हती, परंतु तो मैमोनेच्या जवळ येण्यापूर्वीच डॉक्सने त्याच्यावर झेप घेतली व


## समाज प्रबोधन संस्था

१२४२ सदाशिव पेठ पुणें २

| | | |
|---|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न | दे अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार | सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना | ना. वा कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र | पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय | उषा मोहनी | २·६० |
| राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता (संकलित निबंध) | | २·०० |
| भारतीय शेती : आर्थिक बाजू | स. ह. देशपांडे | २–६० |
| वैज्ञानिक विचार–पद्धति | अ. भि. शहा | |
| स्वतंत्र भारतांतील लोकशाही वाटचाल | चिकित्सक | |
| व्यक्तिमत्वाची आधुनिक कल्पना | ग. वि. अकोलकर | |



त्याला खाली पाडून जबडा वासून तो त्याच्या छातीवर उभा राहिला. या दोघांनी जवळजवळ तेवीस हजार रुपयांची चोरी केली होती व ते कित्येक महिने पोलिसांना सापडत नव्हते.

डॉक्सने मैमोनेचे प्राण एकदा फार मोठया प्रसंगांतून वांचवले होते. त्याचें असें झालें की, १९४० मध्ये कुप्रसिद्ध दरवडेखोर सॉल्व्हेटोर गुलियानो सिसिलिच्या पर्वतमय प्रदेशांत धुमाकूळ घालीत होता. त्या वेळेला मैमोने क्युरिन प्रांतांत स्पेशल ऑफिसर म्हणून काम करीत होता. अशाच एका प्रसंगीं मैमोनेने १४ स्टोन वजन असलेल्या आपल्या एका ऑफिसरला एका हातानें ऊंच डोक्यावर उचलून धरलें. त्यामुळे "भीमकाय पोलिस अंमलदार" अशी सगळीकडे त्याची ख्याति झाली. त्यावेळेला एकाने मैमोनेला सुचविलें की, त्याने गुलियानोला ठार मारून दाखवावें. मैमोनेने त्याला संमति दिली व खास रजा घेऊन तो सिसिली पर्वताकडे गेला. बरोबर त्या वेळीं अगदी लहान असलेला डॉक्सहि होताच, परंतु मैमोनेची गुलियानोशीं गाठच पडली नाही, कारण गुलियानो ज्या गुहेंत लपून बसला होता त्या गुहेजवळून जात असतांना त्याने मैमोनेच्या रोखाने पिस्तुलाच्या सहा गोळया झाडल्या. त्यांपैकी चार गोळया मैमोनेच्या पोटांत व दोन खांद्यांत घुसल्या. मैमोने बेशुद्ध होऊन रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळला. अशा वेळेला डॉक्सने विलक्षण प्रसंगावधान दाखविलें. त्याने संशयिताचा पाठलाग न करतां मैमोनेसाठी वैद्यकीय मदत आणण्याची व्यवस्था केली व वेळींच वैद्यकीय मदत मिळाल्यामुळे मैमोनेचे प्राण वांचू शकले.

डॉक्सचा जन्म जर्मनीत झाला, पण तो ४० दिवसांचा असतांनाच मैमोनेने त्याला विकत घेतलें व शिकवायला सुरवात केली. तेव्हापासून आजपर्यंत मालक आणि त्याचा हा कुत्रा ही जोडी अगदी अभेद्य आहे. ते त्यांच्या विभागांतील एका शेवटच्या मजल्यावर एकाच खोलींत झोपतात, एकत्र जेवतात. डॉक्सला महिन्याला २७० रु. पगार मिळतो, पण त्याचा हा सर्वच्या सर्व पगार दर महिन्याला बँकेंत पडतो व त्याचा हा बँकेचा अकौंटहि, त्याला मिळणाऱ्या निरनिराळया रोख बक्षिसांमुळे दिवसेंदिवस वाढत चालला आहे.


डॉक्सला सर्वांत मोठें बक्षीस इटलीच्या परराष्ट्र खात्याचे अंडर सेक्रटरी कॅरेमाइन डी मार्टिनो यांनी दिलें आहे. त्यांच्याकडे एकदा धमकी देऊन पैशांची मागणी करण्यांत आली होती. एक दिवस सकाळच्या डाकेने त्यांना एक पत्र आलें. त्यांत लिहीलें होतें की, 'जर तुम्हांला तुमचा व तुमच्या मुलांचा जीव प्यार असेल, तर या पत्रांत सांगितलेल्या ठिकाणीं ३५००० रु. पोहोचविण्याची व्यवस्था करावी. हे पैसे नोटांच्या स्वरूपांत असावेत व एका पुडक्यांत बांधून शुक्रवारी ता. २८ ऑगस्टला तें पुडकें खालील ठिकाणीं ठेवावें. ही गोष्ट पोलिसांना अगर वर्तमानपत्रांना कळविलीत तर याचा परिणाम फार घातक होईल. तुम्हांला कल्पना नसतांनाच तुमचें घर

(पान १६ वर)


शेतकऱ्यांच्या आनंदाचें रहस्य ! चांगला पाणी पुरवठा आणि भरघोस पिकें ! भारतांत अगणित ठिकाणीं आपली श्रेष्ठता जराहि कमी होऊं न देतां अहर्निश झटणारीं व सर्व ठिकाणीं तगईवर मिळणारीं ........

★ पॅको इंजिनें ★

सदैव वापरा



● ५ ते २२ हॉर्स पॉवरपर्यंत ● स्लो स्पीड ● कोल्ड स्टार्ट

● उत्कृष्ट कारागिरी व दणकट बांधणी ● अत्यंत कमी तेल खर्चात चालणारीं

सुटे भाग केव्हाहि हजर स्टॉकमधून सहजतेने मिळूं शकतील.

उत्पादक

पॅको इंजिनियरिंग प्रायव्हेट लिमिटेड

तार : पॅको ] शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर–२ [ फोन १८६




—त्याला वाटत होतं: आज आपल्य ला शंभर फुकट मिळाले.
—आणि विधाता हांसून म्हणत होता, 'वेडया तलाठयाला दिलेले शंभर रुपये तुला आज परत मिळाले आहेत—'

*लेखक—रामचंद्र हिंगणे*

म्हाताऱ्याला काळजींत पाहून मुलाच्या पोटांत गलबलून आलं. तंबाखू खाण्यासाठी आलेलीं माणसं हळूहळू उठून गेलीं तशी शिवरामनं दबल्या आवाजांत वडिलांना विचारलं, 'काय झालं तरी काय कोर्टीत् ?'

डोक्यावरचं पागूटं खालीं काढून ठेवीत म्हातारा म्हणाला, 'कोर्टीत उद्यांच्या उद्यां सातबाराचा उतारा हजर करायला सांगितलाय्. नाहीतर जमिनीचा तावा जाईल आपला.'

'अन् मग ?' शिवरामने अधीरतेने विचारलें.

'तलाटी गांवांत नाही तो गेलाय सरकारी कामाला इथून वीस मैलावर. तो कांही येणार नाही. पण मी गोविंदाला आल्याबरोबर पिटाळलाय् सायकलवर — गोविंदा आता येईलच घटकाभरांत—'

दाव्याचं काम उताऱ्यावर अवलंबून होतं. उतारा देणारा तलाठी वीस मैलांवर होता. साधा उतारा चटकन मिळण्यासाठीं तलाठी लोक किती खळखळ करतात हें बापलेकांना माहीत होतं. त्यामुळं गोविंद आतां काय निरोप घेऊन येतो, यावर दोघांचं लक्ष होतं. त्यामुळं दोघहि गप्पच बसले. म्हातारा शांत होता, पण शिवरामच्या अंगाची नुसती आग आग झाली होती.

थोडया वेळानं गोविंद आला. आजूबाजूला कोणी नाही, हें पाहून त्यानं सांगितलं, 'तलाठी म्हणाला, मी सरकारी कामासाठी इथं आलों आहें. अजून चार दिवस माझा मुक्काम इथंच आहे १०० रुपये देणार असाल तर रातोरात येऊन उतारा देऊन माघारी येईन नाहीतर तुम्ही आपलं पहा."

शिवरामचा एकदम भडका उडाला. तो वाटेल तें बोलू लागला. तेव्हा म्हातारा म्हणाला, 'इतकी डोक्यांत राख घालून चालणार कसं ? मोठ्या फायद्यासाठी आपल्याला फुकट पैसे दिले पाहिजेत.'

आणि मग म्हाताऱ्याने चार समजुतीच्या गोष्टी शिवरामला सांगितल्या. शंभर रुपये त्याच्या हातांत ठेवले आणि म्हातारा म्हणाला, 'तुम्ही दोघानी आतांच्या आतां सायकलवरून जा. त्याला म्होरं घेवून या. काईवी झालं तरी उतारा आपल्याला सकाळच्या आंत मिळाला पाहिजे–'

पहाटे साडेतीन वाजतां शिवरामाच्या हातांत सातबाराचा उतारा पडला आणि तलाठयाने शंभर रुपये आपल्या खिशांत टाकले. वरकरणी आभार मानून शिवरामने पैसे दिले तरी मनांतून ते पैसे देतांना तो अतिशय तळतळला. तलाठयाला त्याने मनांतून लाखोली वाहिली. तलाठयाने तें सारं ओळखलं होतं.

पण वेळेलाच अडलीं तर माणसं पैसे देतात हेंहि त्याला माहीत होतं. हेच दिवस आपले आहेत. हे दिवस फुकट घालवले तर आपल्याला साऱ्या आयुष्यांत पैसे मिळणार नाहीत अशी खूणगाठ त्यानं मनाशीं बांधली होती. मनाशीं तो वरच्या कमाईचा हिशेब करीत होता. आता ती रक्कम दोन हजाराच्या जवळपास होती.

—आणि मग एके दिवशीं तलाठयाच्या घरांत एकच धावपळ सुरू झाली. तलाठयाच्या तोंडचं पाणी पळालं. त्याच्या बायकोचं तिसरं बाळंतपण सुकर व्हावयास पाहिज होतं, पण कांही तरी घोटाळा झाला. त्याच्या बायकोचं पोट फार दुखू लागलं. खेडयांतल्या सुईणीनं हात टेकले. बैलगाडींतून तालुक्याच्या गांवीं नेतांना बायको मरते की काय असं त्याला वाटलं. तालुक्याच्या डॉक्टरनं अर्ध्यातासाच्या तपासणीनंतर त्याला सांगितलं 'मूल पोटांत मेलंय. तिला पुण्याला पळवा.' तलाठयानं धीर सोडला. पुण्याच्या मित्राला तार करून त्यानं टॅक्सी मागवली आणि खाजगी दवाखान्यांत बायकोला सोडली. त्या दिवशीं त्यानं पैशाची पिशवी रिकामी सोडली होती. तलाठी मनांत म्हणत होता, 'जाईना गेले तर पैसे. कुठं कष्ट करावे लागलेत, पण बायको जातां कामा नये. ती गेली तर लहान दोन पोरांचं कसं होणार—?'

दहा दिवसांनी डॉक्टरने तलाठयाच्या हातीं बिल दिलं, तेव्हा तलाठी बिलाचा आकडा पाहून सर्दच झाला. ३३२ रुपये कंपौंडरच्या हातांत देतांना तो मनांत म्हणत होता, नाहीं

तरी डॉक्टरने बिल जास्तच लावलेलं दिसतंय्, पण त्याला आतां इलाज नाही. पैसे हे दिलेच पाहिजे–'

–कंपौंडरने पाठमोऱ्या तलाठ्याकडे पाहिलं आणि तो मनांतल्या मनांत हसला. डॉक्टर वैद्यकीय शास्त्रांत निपुण होतेच. पण कोणत्या पेशंटला काय जास्त द्यावं, बिल किती जास्त सांगावं, याचं अचूक ज्ञान त्यांना कोठून आणि कसं मिळालं होतं, याचं त्याला राहून राहून कौतुक वाटत होतं. गेल्या दोन–तीन वर्षांत डॉक्टरने नुसता धडाका लावला होता. हीच परिस्थिति अजून चार-पांच वर्षे कायम राहिली तर डॉक्टर एक मोटार खरेदी करूं शकतील. इतकेंच काय, बंगलासुद्धा बांधूं शकतील अशी त्याची खात्री झाली होती. आतांच पहाना ! तो मनांत म्हणत होता, ' डॉक्टरने या तलाठ्याला बिल कितीतरी जास्त लावलें आहे !

दोन-चार महिन्याचा काळ असाच निघून गेला. आणि मग एके दिवशीं वर्तमानपत्रांत बातमी प्रसिद्ध झाली. त्याचा आशय असा होता.

पुण्यांतील मॅटर्निटीहोमचे शिखरे हे सपत्नीक नाटकाला गेले असतांना त्यांच्या घरांत चोरी झाली. चोरांनी एकूण २०-२५ हजारांचा ऐवज पळविला असावा. त्यांत सोन्याचे दागिने बरेच होते. पाळत राखून चोरी झाली असावी असा पोलीसखात्याचा अंदाज होता. पोलीस तपास जारीने चालू झाला होता.'

एका व्यापाऱ्याच्या दुकानासमोर लोकांची एकच गर्दी झाली होती. व्यापाऱ्याच्या दुकानासमोर एक पोलीस व्हॅन उभी होती. दुकानांत ड्रेसांतले, बिन ड्रेसांतले सातआठ पोलीस होते. त्यांची दुकानांत बरीच धावपळ चालू झाली होती. व्यापाऱ्याच्या दुकानांत पोलीसांची धावपळ पाहून लोकांना बरेंच कुतूहल वाटत होतें. जो तो दुकानासमोरच्या रस्त्यावर धावत होता. टाचा उंचावून पहात होता.' काय झालं ?' म्हणून दुसऱ्याला विचारीत होता. पण कुणाला कांहीच कळत नव्हतं. पोलीसांची धावपळ वाढत होती. बाहेर लोक हमरस्त्यावर उभे राहून उगीच ताटकळत होते.

रस्त्यावरच्या रहदारीला फारच अडथळा झाला तेव्हां दुकानांतले ड्रेस घातलेले पोलीस रस्त्यावर आले आणि त्यांनी दंडुक्याचा वापर करावयास सुरुवात केली. लोक पळूं लागले, तरी त्यांची जिज्ञासा कमी झाली नाही. बाहेरच्या गर्दीत पोलीसाचा एक दोस्त होता. मागं सरतां सरतां त्याने पोलीसाला विचारलें आणि नागरिकांना रेटतां रेटतां पोलीसाने सांगितलें, ' चोरीचा माल सापडलाय डॉ. शिखऱ्यांच्या चोरीवरुन तपास लागलाय. बराच मला सापडलाय–'

आणि मग ही बातमी वाऱ्यासारखी पसरूं लागली. लोकांचे जथेच्या जथे त्या अब्रूदार दुकानदाराकडे वळूं लागले, तेव्हा दुकानाच्या मालकाने शिंदे फौजदाराला माडीवर नेलें. आणि कांहीतरी सांगितलें.

शिंदे फौजदार खाली आले तेव्हा त्यांच्या वागणुकींत फरक पडला होता, पण गुन्ह्याचा तपास मात्र चालू होता. आता या परिस्थितीत तपास थांबवणं शक्य नव्हतं.

त्या रात्रीं फौजदार शिंदेच्या सहकाऱ्याने त्यांना मोठा खोचक प्रश्न विचारला, " डॉ, शिखऱ्यांच्या चोरीचा ' तपास ' लागला का ?–" फौजदार शिंदेने मोठ्या आढ्यतेने आणि बेरडपणें उत्तर दिलें, "गुन्ह्याचा ' तपास ' लावल्याशिवाय का मी राहाणार आहें ! मला शिंदे फौजदार म्हणतात–"

तपास करण्यांत तज्ञ असलेला फौजदार शिंदे नाहीतरी चांगलाच अक्राळ विक्राळ होता. शरीर चांगल भरभक्कम होतं. काळीज क्रूर अन् रानटी होतं. त्याला पाहून सर्व साधारण नागरिक चटकन घाबरे. त्याच्या जवळ सहसा कुणी ठरत नसे. त्याची कुणाशीं मैत्री नव्हतीं आणि तोहि कुणाशीं सलगीने बोलतांना आढळत नसे.

नाही म्हणायला त्याच्या चुलत भावाचें सखाराम अन् त्याचें जरासें मेतकूट होतें. महिन्यांतून एकदा फौजदार साहेब गांवीं जात किंवा त्यांना जमलें नाहीं तर त्यांचा तो चुलतभाऊ फौजदार साहेबांना भेटण्यासाठी ते साहेब ज्या ठिकाणीं असत त्या ठिकाणीं त्यांना भेटत. एवढं मात्र निश्चित की, त्या दोघांची भेट महिन्यांतून एकदा होत असे. भेट ही एक नित्याची आणि निसर्गनियमानुसार घडणारी गोष्टच होऊन बसली होती.

—तसा सखाराम फारसा चांगला नव्हता. गावांत त्याच्याबद्दल कुणी चांगलं बोलत नसे. त्याची तब्येतहि चांगली होती. चुलत भावापेक्षा तो जास्त भयंकर होता आणि त्याचीं कृत्यें तर त्याहूनहि भयंकर होतीं.

—आणि एक दिवस गांवाला सखारामाने चकित करून सोडलें. एका ब्राह्मणाची शेती २५ हजार रुपयांस सखारामाने खरेदी केली. ताब्याचा प्रश्न आला. तो कसा काय सुटणार असा गांवकऱ्यांना प्रश्न पडला. काय घडलं आणि कसं घडलं कोणास ठाऊक ! पण

( पान १३ वरून )

## ' डॉक्स '

बॉम्बच्या स्फोटाने उध्वस्त होईल. ' डी मार्टिनोने ही बातमी गुप्तपणें पोलिसांच्या कानांवर घातली. पैशांचें पुडकें गांवाबाहेरच्या एका पडक्या जागीं असलेल्या झाडाच्या ढोलींत ठेवायचें होतें. २८ ऑगस्टपूर्वीच कांहीं पोलिसांनी रस्ते-दुरुस्तीच्या मजुरांचें रूप घेऊन त्या झाडापासून कांही अंतरावर एक खड्डा खणून ठेवला व त्या खड्डयांत लपण्यासारखी जागा करून बाकीचा भाग कचऱ्याने भरून टाकला. पोलिसांची सारी भिस्त डॉक्सवर होती. त्यांनी त्याला डी मार्टिनो यांना आलेलें तें पत्र हुंगण्यास दिलें. तेवढ्याच वासावर तो माग काढील अशी पोलिसांना खात्री वाटत होती. २८ ऑगस्टला रात्रीं डॉक्स व मैनोने त्या खड्डयांत लपून बसले. बराच वेळ झाला तरी कोणीच उगवलें नाही व मैनोनेहि बसल्या जागीं पेंगू लागला शेवटीं अगदीं पहाटे पहाटे डॉक्सने आपल्या मालकाला ढुशा देऊन जागें केलें. मैनोनेने झरोक्यांतून समोर पाहिलें तर एक आकृति पहाटेच्या धूसर प्रकाशांत लपतछपत त्या झाडाकडे येतांना दिसली. त्याने डॉक्सला मोकळें केलें, काय होतेंय हें लक्षांत येण्यापूर्वीच डॉक्सने एका झेपेंतच त्या माणसाला खाली पाडलें होतें. मग त्या माणसाला कैद करायला मैनोनेला कांहीच श्रम पडले नाहीत. कारण तो माणूस थरथर कांपत म्हणत होता, "मी सारें कांही कबूल करतों, पण प्रथम या कुत्र्याला आवरा."

कुळानं सखारामाला कांही न बोलतां तावा दिला.

मात्र या घटनेनं त्या गांवाला धक्का बसला नाही. धक्का बसला तो दुसऱ्या घटनेनं.

—एके दिवशीं फौजदारसाहेब गांवाहून आले. आल्याबरोबर त्यांच्या बरोबर सखारामाची बाचाबाची सुरू झाली. ती बाचाबाची शेवटीं भयंकर थराला गेली. शेवटीं सखाराम उसळून म्हणाला, "अरे जा. तुला काय करायचे तें कर. बाजीराव असशील तर तुझ्या घरचा. माझं नांव सखाराम आहे." गांवकरी मध्यें पडले नसते तर काय घडलें असतें कुणास माहीत.

पण गांवकऱ्याना लवकरच त्या गोष्टीचा सुगावा लागला. सारं गांव आपसांत कुजबुजूं लागलं की, फौजदार साहेबांनी कांही पैसे ठेवण्यासाठी म्हणून सखारामाजवळ दिले होते तो आतां 'नाही' म्हणून पडला; म्हणून भावाभावांत भांडणं झालीं.

—त्या भावाभावामधील तेढ विकोपाला गेली. तसं गांवकऱ्यांनी फौजदार साहेबांची बाजू घेतली. गांवाला काय तेंच पाहिजे होतें. सखारामाजवळ एवढा पैसा झाला ही गोष्ट गांवाला बरी वाटली नाही. गांवकऱ्यांचे त्याच्या कुळाच्या घरीं खेटे सुरू झाले.

एके दिवशीं 'कुळ' ओरडून उठलं. त्यानं कोर्टांत दावा दाखल केला. मी ती जमीन घेण्यास तयार असतांना सखारामाच्या नांवाने कागदपत्र कां झालें? जमिनीचा-तावा मी सोडलाच नाही, असें ते आग्रहानें म्हणूं लागले.

--आता सखारामहि इरेला पेटला.

तालुक्याच्या गांवाला एक चांगला भारी वकील गांठला. पहिल्या फटक्यालाच सखारामानं सांगून टाकलं, "किती बी पैसा लागला तरी हरकत नाही, पण केस आपल्या बाजूची झाली पाहिजे—"

—केसमध्ये कांही दम नाही हें वकिलाला माहीत होतं, पण तसं अशीलाजवळ बोलण्याचं कांही कारण नव्हतं. असं चांगलं अशील हाताशीं असतांना माघार घेण्यांत काय अर्थ होता?- मुळांतच चौपटींत फी वाढवून सांगितली. सखारामानं सारे पैसे लगेच मोजले.

—वकील गालांत हंसला.

--निवडणुकीचे वारे वाहूं लागले. जो तो आपआपल्या पक्षातर्फे उभा राहण्याची कोशीस करूं लागला, पण वकील साहेबांना तिकीट मिळालें नाही. ते चिडले. त्यांनी 'स्वतंत्र' उभे राहाण्याचा निर्णय घेतला.

--पण त्यासाठी 'लोकसंग्रहाची जरुरी होती. वकिलांनी आपल्या विश्वासू अशीलांना बोलावलें. त्यांत शिवराम होता.

--गांवीं परत येत असतांना शिवराम मनाशीं म्हणत होता. वकील साहेबांनी निवडणुकीसाठी-खर्चासाठी तीनशे रुपये आपल्या जवळ दिलेत. ही गोष्ट कुणालाच माहीत नाही. त्यांत आपण दोनशेच खर्च केले तर? १०० रुपये मधल्या मधी गडप केले तर काय बिघडलं?


--हा त्यांचा निश्चिय कायम झाल्यानंतर त्याचीं पावलं झपाट्याने पडूं लागलीं.

--त्याला वाटत होतं, आज आयत्याला १०० रुपये फुकट मिळाले.

--आणि विधाता हसून म्हणत होता' "वडच्या तलाठ्याला दिलेले शंभर रुपये तुला आज परत मिळाले आहेत-"

● ●

स्वादिष्ट मिठाईके लिये!
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदीरके पास, मार्केट रोड, पूना २.




★ रूपा इंजिन्स वापरा ★
उत्पादक : रूपा इंजिनियरिंग कॉर्पोरेशन
१४१, शिवाजी उद्यम नगर, कोल्हापूर.

मालकीहक्काचें विसर्जन न करतांहि सहकारी शेती कशी अंमलांत आणतां येते, सहकारी शेतीचे चार प्रकार कोणते या संबंधीचें विवेचन पहिल्या लेखांकांत आलें आहे.

इस्त्रायल, मेक्सिको या देशांच्या अनुभवांचा विचार करून आपल्याकडे सहकारी शेती आणतांना कोणती दृष्टि बाळगली पाहिजे यासंबंधीचे लेखकाचे विचार या दुसऱ्या व शेवटच्या लेखांकांत दिले आहेत.



लेखांक–दुसरा

विलास पाटील

# सहकारी शेती अनिवार्य कां ?

विदेशीय सहकारी शेतीचे प्रयोगाकडे पाहत असतांना आपणास साम्यवादी देशांतील सहकारी शेतीचे अनुभवांचा विचार करणेचे कांहीच कारण नाही. साम्यवादी देशांतील सहकारी शेती ही सक्तीच्या स्वरूपाची आहे व स्वेच्छा वगैरेस तेथे कांहींहि स्थान नाही, पण एक अनुभव मात्र त्यांच्यापासूनहि घेण्यासारखा आहे. पोलंड, युगोस्लाव्हिया इत्यादि देशांतून सक्तीच्या सहकारी सोसयटीस गळती सुरू झाली आहे आणि लवचिक व इच्छाधिष्ठित सहकारी सोसायट्या स्थापन करण्याकडे कल झुकत आहे. आपल्या देशास अनुभव म्हणून दोनच देशांचे सहकारी शेतीचे प्रयोग उपयोगी आहेत. कारण मेक्सिको व इस्त्रायल हे देश लोकशाहीप्रधान व अविकसित होते व आहेत. त्यांच्या परिस्थितींत व आपल्यांत बरेंचसें साम्य आहे. इस्त्रायलमध्ये थोडयाफार प्रमाणांत सहकारी शेती यशस्वी झाली आहे, पण त्या ठिकाणची परिस्थिति अगदी वेगळी होती. इस्त्रायल हें राष्ट्र १९४८ सालीं स्थापन झालें. ज्यू लोकांना त्याआधी कोठे थारा नव्हता. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत ह्या लोकांचे फार हाल झाले. म्हणून त्यांचे ठिकाणीं राष्ट्रप्रेमाची उर्मि उसळली व राष्ट्रनिर्मितीसाठी वैयक्तिक भाव विसरून ते कामास लागले व सहकारी शेतीचा प्रयोग प्रथमतः येथे यशस्वी झाला तो या राष्ट्रीय जागृतीमुळे याबरोबर हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे की, ज्यू लोक हे अशिक्षित, अडाणी व रूढिप्रिय शेतकरी नव्हते, तर आधुनिक विद्येची उपासक अशी ती एक सुशिक्षित व बुद्धिमान जमात होती. दुसरें असें की, केवळ चळवळींतून त्यांना बरेंचसें शिक्षण मिळालें होतें, सहकारी जीवन कसें जगतात ह्याचा अनुभव मिळाला होता. राष्ट्रप्रेमाने ते भारावून गेले होते, अशी अनुकूल पार्श्वभूमि असूनहि पूर्वीचा 'किबुत्स' हा पोलादी सहकारी शेती प्रकार सोडून देऊन 'मोशाव्ह' हा अधिक लवचिक शेती प्रकार त्यांनी अनुभवांतीं निवडला आहे. तेव्हा सहकारी शेती–यशस्वितेसाठी अधिक धोरणाची, शिक्षणाची राष्ट्रप्रेमाची अत्यंत आवश्यकता आहे हें आपणास पटतें.

### मेक्सिकोंतील प्रयोग

याउलट मेक्सिको हा देश मागासलेला आहे; लोक अशिक्षित व आधुनिक विद्या, यंत्रतंत्र यांचा गंधहि नसलेले, त्याचप्रमाणे सहकारी शेती कांही लोकांनीं स्वयंस्फूर्तीनेहि सुरू केलेली नाही वा सरकारने लादलेलीहि नाही. त्यामुळे आमच्या स्थितींत व त्यांच्यांत बरेचसें साम्य आहे. सहकारी शेती सुरू होऊन त्यांच्याकडे ते प्रयोग तितकेसे यशस्वी झालेले नाहीत. त्यांच्या प्रयोगावरून दोन गोष्टी ठळक दिसून येतात- आधुनिक यंत्राचें ज्ञान असणारे लोक सोसायट्यांस पुरेशा प्रमाणांत मिळत नाहीत, हें एक व दुसरें असें की, नेतृत्वाची वाण भासते व 'संघटनेची शिस्त' दिसून येत नाही. त्या कारणाने उत्पादन वाढण्या ऐवजी घटतेंच असा त्यांचा अनुभव आहे. 'एजिअन्' सोसायट्यांकडे आपण पाहिलें तर हेंच दिसून येतें. तेव्हा सोसायट्या चालविण्यासाठी आधुनिक विद्या पारंगत असे शेतकी तंत्रज्ञ पाहिजेत, नेतृत्व पाहिजे व संघटनेची शिस्तहि पाळली गेली पाहिजे. ह्या तीन गोष्टी सहकारी शेती यशस्वितेसाठी आवश्यक आहेत हें आपणास मेक्झिको–प्रयोगापासून शिकतां येण्याजोगें आहे. मेक्सिकोंत सहकारी शेती प्रयोग अयशस्वी होत असले तरी त्यांना पर्याय नाही म्हणून ते तसेच चालू आहेत ही गोष्टहि आपण येथे नमूद केली पाहिजे.

सहकारीशेती विषयक आपले अनुभवहि पाहण्यासारखे आहेत. गुजराथेंत कांहीं प्रयोग यशस्वी झाले आहेत. पण बहुतेक सर्व प्रयोग अयशस्वी झाले आहेत, पण त्याच्यापाठीमागे काय कारणें आहेत ? प्रामुख्याने सर्व प्रयोग आदिवासी विभागांत झाले, त्या कारणानेच ते अयशस्वी झाले. कारण ह्या लोकांना शेतीची, सहकाराची कांही अेक कल्पना नव्हती व अशांकडून एकदम यशस्वितेची अपेक्षा

करणे चूक होय. आपल्या व विदेशीय अनुभवांवरून आपणास हेंच पटते कीं, आपली शेती सुधारण्यासाठी सहकारी शेती हा रामबाण अुपाय आहे हें खरें ; पण त्यासाठी अनेक पथ्यें पाळलीं पाहिजेत व पार्श्वभूमि निर्माण केली पाहिजे. नाहीतर अगदी हिरिरीने प्रयोग सुरू करून ते अयशस्वी होण्याची शक्यता आहे.

### शिक्षणाचें महत्त्व

सहकारी शेती नुसत्या सरकारी प्रयत्नाने यशस्वी होणार नाही तर त्यासाठी लोकांचें अुत्स्फूर्त सहकार्य अवश्य आहे. शिक्षणाचें महत्त्व येथेच आपणास पटतें. शेतकऱ्यांना शेतीचें आधुनिक शिक्षण व प्रामुख्यानें सहकारी संघटनेचें शिक्षण असलें पाहिजे. आर्थिक संस्थांची अशी कांहीं अंगभूत शिस्त असते, कांही तत्त्वें असतात. त्यांचें आकलन व काटेकोर पालन केल्यानेच सहकार यशस्वी होऊं शकेल. सहकारी संस्था आज केवळ लाभैक दृष्टीने चालविणाऱ्या खाजगी संस्थांहून भिन्न मानाव्या लागतील. सहकारी संस्था ही समाजाच्या निकट जाऊं शकते, त्यामुळेच तिच्यावरील जबाबदाऱ्या वाढतात. व्यवहारवाद व ध्येयवाद यांचा सुंदर समन्वय सहकारी संस्थेला घालावयाचा असतो. यासाठी सहकारी संस्थाचा सभासद-वर्ग, नोकरवर्ग जागृत असावा लागतो. या सर्वांसाठी शिक्षणाचें किती महत्त्व आहे हें वेगळे सांगावयास नकोच. शिक्षणाची व्याप्ति सहकारी संस्थांतील नोकरांना व सभासदांना सहकारी क्षेत्राची संभवशक्ति आकलतां आली पाहिजे अितकी असावी. त्याचप्रमाणे वरीष्ठ नोकरांनाच एकत्रित व केन्द्रीय अशा ठिकाणीं शिक्षण द्यावे व त्यांनी तें शिक्षण स्थानिक परिस्थितीस धरून खालच्या नोकर-वर्गास व सभासदांना द्यावें, कारण शेवटी शिक्षण हें ज्या परिस्थितींत मुरवावयाचें त्यासच फार महत्व आहे व त्या ठिकाणीं शिकल्याने शिक्षण व कृति यांचा मेळ बसूं शकेल. शिक्षणामुळे संघटनेला लागणारी शिस्त व नेतृत्व यांचा प्रश्न मिटेल उत्तम व्यवस्थापनाचाहि प्रश्न मिटेल. पण हे सर्व कांही चूटकीसारखें होणार नाही त्यासाठी हळूहळू वाटचाल केली पाहिजे.

शिक्षणामुळे सहकारी शेतीमधील बऱ्याच प्रश्नांचा निकाल लागेल. पण सहकारी वृत्ति निर्माण झाल्यानंतर सहकारी शेती सोसायटयांनी सहकार ही पद्धति आहे हें ओळखून स्वतःच्या पायावर अुभे राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे, सरकारकडे सहाय्या-साठी तोंड करणें हें कुमकुवतपणाचें व असहाय्यतेचें लक्षण होय. त्याचप्रमाणे सहकारी संस्थामधून कार्यक्षमतेवरहि जास्त भर दिला पाहिजे. सहकारी संस्था ही कांही अंशीं व्यापारी तत्त्वांनी चालविली पाहिजे, नाहीतर फायद्याऐवजी तोटेच जास्त होण्याचा संभव आहे.

### तात्कालिक उपाययोजना

१) सरकारने आपलें धोरण निश्चित ठरविलें पाहिजे. त्यांत होणारी धरसोड थांबविली पाहिजे. कारण ह्या गोष्टीच्या लोकांच्या मनांवर वेगळाच परिणाम होतो व सरकारच्या चांगल्या धोरणाचें देखील हसें होते, अडाणी लोक त्याची कुचेष्टा करतात. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणून जुन्या मुंबई राज्याचा कूळकायदा होय.

२) सरकारनें पंचवार्षिक योजनांतून अनेक प्रकारें शेती सुधारण्या-साठी प्रयत्न चालविले आहेत. अनेक प्रकारें सरकार शेतकऱ्याला मदत करूं इच्छित आहे. पण ती मदत शेतकऱ्याला योग्य वेळीं व योग्य स्थानीं मिळतांना दिसत नाहीं, असें खेदाने म्हणावे लागते. विलंब व अनाठायी खर्च शेतकऱ्यास सहन करावा लागतो. नोकर वर्गांकडून विनाकरण त्रास अडाणी शेतकऱ्यास होतो व सुधारणांचा फायदाच नको अशी त्यांची वृत्ति बनूं लागते. ह्या सर्वांचें उत्तम उदाहरण–सरकारकडून देण्यात येणारी तगाई व पुरवण्यांत येणारीं खतें हें होय.

३) सरकारकडे जी जमीन असते ती सरकारनें भूदासांना न वाटतां तेथे सहकारी शेती करावी. भूदासांना सहकारी सोसायटीचे सभासद करावे, त्यांना नेतृत्वाची संधि द्यावी व आत्मीयता निर्माण करावी. त्या सोसायटयांना सरकारने आधुनिक तंत्र, मंत्र व यंत्र यांचे फायदे पुरवावेत.त्याचबरोबर खाजगी कुशल शेतकऱ्यांच्या अनुभवांचाहीं फायदा घ्यावा. त्यांना संचालकमंडळावरहि घ्यावे. त्यामुळें आपणांस भूदास सभासद व कांही खाजगी व्यवहारतज्ञ शेतकरी यांचे अनुभ-वांचा फायदा घेतां येईल. व्यवहारवाद व आधुनिक ज्ञान यांचा ह्या सोसायटयांतून सुंदर मिलाफ आपणांस बसवितां येईल. अशा सोसायटया आदर्श सहकारी सोसायटया होतील व ह्यांचा आदर्श पुढें ठऊन अनेक शेतकरी सहकारी शेतीकडे प्रवृत्त होतील.

आपण सहकारी शेती ही आपल्या देशाची विशिष्ट आर्थिक गरज आहे हें ओळखून लवचिक धोरण स्वीकारून सहकारी शेतीकडे मार्गक्रमण केल्यास यशाची खात्री आहे. संक्रमणावस्थेंत कांहीं काळ अपयशाचे काळे टिपके दिसतील; पण ते क्षणभरच ! कारण सहकारी शेतीसाठी गरज आहे ती एकीच्या भावतेने काम करण्याची व चिकाटी टिकविण्याची. भारताच्या विकासासाठी सहकारी शेती ही राष्ट्रीय गरज आहे. त्यासाठीं 'विना सहकार नहीं उद्धार' हें तत्त्व पुढें ठेऊन 'जोडी एकी निष्ठा' युक्त प्रयत्न केले तर न भूतो भविष्यति असा प्रयोग आपणांस यशस्वी करतां येईल व त्यांच्यांतून उद्यांचा संपन्न, समृद्ध व विकसित भारत निर्माण करतां येईल.

( समाप्त )


आपल्या इंजिन्ससाठी उत्कृष्ट दर्जाचें लायनर्स व पिस्टन्स् तयार करणारे कोल्हापूरांतील एकमेव कारखानदार.....

**श्री दत्त इंजिनियरिंग कार्पोरेशन**

**लायनर्स व पिस्टन्सचे उत्पादक**

६४, शिवाजी उद्यमनगर,

कोल्हापूर





जयाजी आबाजी वाघ
मेहुणबारा

## फौंडेशनची पूर्वतयारी


लेखांक–तिसरा

### पूर्वतयारी

ऑंजिनबरोबर फाऊंडेशन प्लॅन आलेला असतो. 'त्याप्रमाणे फाऊंडेशन केलें की झालें काम' असें आपण सहज म्हणून जातों. परंतु प्रत्यक्ष फाऊंडेशन करीत असतांना अनेक अडचणी येतात. फाऊंडेशनसाठी खोदलेला खड्डाच एखादे वेळीं अपुरा असतो. तर एखादे वेळीं कॉंक्रिटचें मिश्रणच खटून जातें आणि वेळेवर धावाधाव होते. असें होऊं नये म्हणून अगोदरच तयारींत असलेले बरें. फाऊंडेशन प्लॅनबरहुकूम फाऊंडेशन करणें केव्हांहि चांगलेंच; पण त्याच बरोबर अगोदर हें पडताळून पाहा की, ऑंजिनबरोबर आलेला प्लॅन आपल्याच ऑंजिनचा आहे का ? प्लॅनमध्ये दिलेलीं मापें आपल्या ऑंजिनला बरोबर लागू पडतात का ? माझ्या पाहाण्यांत प्रत्यक्ष घडलेली एक सत्य घटना आहे. आमच्या गांवापासून दोन मैलांवर असलेल्या **जामदे** या खेड्यांतील एका शेतकऱ्यानें नवीन ऑंजिन मागविलें. ऑंजिनबरोबर फाऊंडेशन प्लॅन आलेला होता. मेकॅनिक साहेबांनी कांहींएक शंका मनांत न आणतां प्लॅनबरहुकूम फाऊंडेशन केलें. १५।२० दिवसांनी ऑंजिन फाऊंडेशनवर बसवायला गेलें. परंतु ऑंजिन फाऊंडेशनवर बसेना. मेकॅनिकनें आपलीं फाऊंडेशन प्लॅनबरहुकूम फाऊंडेशन केलें होतें. दोष मेकॅनिककडे नव्हता. परंतु कंपनीच्या माणसांनी नजरचुकीनें ऑंजिनबरोबर दुसऱ्याच एका ऑंजिनचा फाऊंडेशन प्लॅन पाठविला होता. त्यामुळे हा सर्व घोटाळा झाला. परंतु मेकॅनिकनें फाऊंडेशन करायचे अगोदरच जर प्लॅन आपल्या ऑंजिनचाच असल्याबद्दलची खात्री करून घेतली असती तर हा घोटाळा झाला नसता. यासाठीं प्लॅनमधील मापें व ऑंजिनचीं मापें यांतील पडताळा अगोदर पहाच; नाहींतर पश्चात्ताप करायची पाळी येईल. त्यानंतरची दुसरी गोष्ट म्हणजे कोणीहि कोणत्याहि परिस्थितींत ऑंजिनसाठी बैठक म्हणून एक लाकडी चौकट अवश्य करून घ्यावी. कारण फाऊंडेशनच्या ज्या भागावर ऑंजिन बसतें तो भाग अगदीं सपाट (प्लेन येईलच असें नाहीं. तो भाग सपाट नसला व त्या भागास मध्येच थोडाफार उंचवटा असला तर फाऊंडेशनवर ऑंजिन बसवितांना ऑंजिनबेसला सर्व ठिकाणी सारखी बैठक मिळत नाही. जेथे उंचवट असतो तेथें ऑंजिनबेस टेकली जाते व इतर भागावर टेकली जात नाही जेथे उंचवटा असतो त्या भागाचा टेकू निर्माण होतो व ज्यावेळीं आपण बोल्ट आवळतों त्यावेळीं टेकू मिळालेल्या ठिकाणीं सर्व जोर एकवटला जातो व तेथेच ऑंजिन क्रॅक होतें. बसवितांना जरी ऑंजिन क्रॅक झालें नाही तरी कांही दिवसांनी ऑंजिनच्या हादऱ्यामुळें क्रॅक होतेंच चौकट न वापरल्यामुळे काय नुकसान होतें याची कल्पना यावी म्हणून एक प्रत्यक्ष पाहिलेली घटना सांगतों. आमच्या गांवाजवळच एक खेडें आहे. इरिगेशन सोसायटीने १८ हॉर्स पॉवरच्या ऑंजिनसाठीं मेकॅनिककडून फाऊंडेशन करून घेतलें. फाऊंडेशन बरेंच मोठें होतें. त्यामुळे ऑंजिन ज्या भागावर बसणार होतें तो भाग अगदीं प्लेन आला नाहीं. मध्येंच थोडा उंचवटा होता ही गोष्ट मेकॅनिकच्या लक्षांत आली नाही. त्यांनी फाऊंडेशन सुकल्यावर फाऊंडेशनवर ऑंजिन बसविलें. फाऊंडेशन बोल्ट आवळले. परंतु जेथे उंचवटा होता तेथे बेस टेकला गेल्यामुळे बेसला मध्येच टेकू निर्माण होवून त्या भागावर सर्व ताण पडला व नेमकें तेथेच ऑंजन क्रॅक झालें. ऑंजिन कामांतून गेलें, म्हणजे चौकटीच्या क्षुल्लक काटकसरीमुळे व आळसामुळे केवढें नुकसान होऊं शकतें त्याचा हा प्रत्यक्ष दाखला आहे यासाठी आपण आपल्या ऑंजिनसाठी लाकडी चौकट अवश्य तयार करून घ्यावी. चौकट मात्र चांगल्यापैकी सागवानी लाकडाची करावी त्याचप्रमाणे सर्व बाजू गुळगुळीत व गुण्यांत असणें केव्हांहि चांगलें असतें. आणि उभ्या आडव्या सांध्यावरच बोल्टसाठी छिद्रें येतील अशीच गनावट असावी. (आकृती नं. १ पहा)




ह्यानंतर लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे फाऊंडेशनसाठी खोदलेला खड्डा. कांहीं लोक ॲंजिनच्या मानानें फारच ॲसरॅंस खड्डा खोदतात, तर कांही अगदी लहान म्हणजे जेमतेम ॲंजिन बेस इतक्याच लांबी रुंदीचा व फाऊंडेशन बोल्टच्या लांबी इतका खोल खड्डा खोदतात. मोठ्या खड्ड्यामुळे वाजवीपेक्षा जास्त मटेरिअल लागतें आणि लहान खड्ड्यामुळे पाहिजे तसें भक्कम फाऊंडेशन येत नाही. खड्डा खोदतांना खालील गोष्टी लक्षांत घेतल्यास खड्डा किती लांब, रुंद व खोल खोदावा लागेल हें समजण्यास मदत होईल. काळीची, तांबडी अगर पांढरी मातीची जमीन असेल तर ही दलदलणारी असते. अशा जमिनीत फाऊंडेशन करावयाचें असल्यास त्यासाठी खड्डा थोडा मोठाच घ्या. बोल्टपासून खाली बाजूला १ फूट अंतर राहील या हिशेबाने खड्डा खोदावा म्हणजे फाऊंडेशन बोल्टमधील आडवें अंतर तीन फूट असल्यास खड्ड्याची लांबी ३ अधिक दोहोंबाजूस एक एक फूट, अशी एकूण पांच फूट येईल. जमीन जर खडकाळ खडीची असेल तर फाऊंडेशन बोल्टपासून खालीं बाजूला ७-८ इंच अंतर असलें तरी चालतें. मात्र खड्ड्याचा पाया भरण्यासाठी खोली ६-७ इंच जास्त ठेवावी. (आकृती नं. २ पहा)



खड्ड्याचा पाया

## सिमेंट, वाळू, खडी

वरीलप्रमाणें सर्व झाल्यावर आपण प्रत्यक्ष मिश्रणासाठी लागणाऱ्या मटेरिअलकडे वळूं. मिश्रणासाठी सिमेंट, वाळू व खडी वापरतात सिमेंट चांगल्या प्रतीचें आहे का हें अगोदर पहा. पुष्कळदां बाजारांत पावसामुळे ज्याचे गोळे बनलेले आहेत व तेच गोळे परत कुटून ज्याची पावडर केली आहे असें सिमेंट येतें. असे सिमेंट ताबडतोब ओळखायला येतें. चांगलें सिमेंट हातांत घेतल्याबरोबर बोरिक पावडर सारखें चिकण लागतें व त्याचा रंग थोडा हिरवट असतो; तर पावसामुळे खराब झालेलें व कुटून तयार केलेलें सिमेंट भरभरीत, करकरीत लागतें व त्याचा रंग पांढरट भुरका असतो. असें मेलेलें सिमेंट मिश्रणाच्या कामास अत्यंत निरुपयोगी, म्हणज मातीच्या लायकीचें असतें. दुसरी गोष्ट म्हणजे वाळू. आपण जी वाळू वापरूं ती अत्यंत जाड अगर बारीकहि असून उपयोगी नाही. मध्यम प्रतीची वाळ वापरावी. त्याचप्रमाणे वाळूंत मातीचें थोडेंसुद्धा प्रमाण असतां कामाचें नाही, खडी १ इंच ते १॥ इंच आकाराची वापरावी. मात्र खडी चांगल्या काळ्याशार दगडापासून तयार केलेली असावी. भुरकट, तांबडे, पांढरे ठिपके असलेल्या दगडापासून तयार केलेली खडी वापरूं नये. सिमेंट, खडी व वाळू यांच्या मिश्रणाचें प्रमाण सर्वसाधारणपणें खालील प्रमाणांत असतें. ४ भाग खडी + २ भाग वाळू + १ भाग सिमेंट, म्हणजे ४ तगाऱ्या खडीच्या असल्यास त्यास दोन तगाऱ्या वाळू व तगारी सिमेंट घ्यावें.


साधारणत: ४॥ फूट लांब, ३ फूट रुंद, ३ फूट खोल असलेल्या खड्ड्यास ४० चौ. फूट एकूण मिश्रण लागेल असें आपण ठरवितो; परंतु प्रत्यक्ष मिश्रण मात्र सवाईने लागतें. कारण खडीच्यामध्यें जी जागा असते त्यांत वाळू व सिमेंट जाऊन बसते. त्यामुळें इतका फरक पडतो म्हणजे वरील मापाच्या खड्ड्यासाठी एकूण ५० ते ५५ चौ. फूट मिश्रण लागेल. म्हणजे जवळजवळ ७ चौ. फूट सिमेंट, १४ चौ. फूट वाळू व २४ चौ. फूट खडी लागेल. आपली तगारी १ चौ. फूट माल मावणारी असेल तर ७ तगाऱ्या सिमेंट, १४ तगाऱ्या वाळू व २८ तगाऱ्या खडी लागेल.

## इतर गोष्टी

खोका-फाऊंडेशन सर्वस्वी जमिनीच्या लेव्हलबरोबर असूं नये. जमिनीच्या पातळीच्या वर ८–९ इंच फाऊंडेशन असावें. त्यामुळें फाऊंडेशन चांगलें आकर्षक दिसतें. स्टार्ट करायचे वेळीं हॅंडल फिरवायला सोपें जातें. खोलतांना अगर फिटिंग करतांना विशेष त्रास होत नाही व जमिनीच्या पातळीच्या वर ८-९ इंच असल्यामुळें खालील घाणीचा संपर्क ॲंजिनशी होत नाही. जमिनींत खड्ड्याच्या बाजूमुळे मिश्रणाला अनायासेच खोका तयार मिळतो व मिश्रण दुसरीकडे पसरत नाही. परंतु जमिनीच्या वरील भागासाठी आपणास योग्य लांबी, रुंदी व उंचीचा खोका तयार करून घ्यावा लागतो. ह्या खोक्याचा तात्पुरता १०–१२ तासच उपयोग असतो. म्हणून यासाठीं चहाच्या खोक्याचा अगर देवदारी फळ्यांचा

**उपयोग** करावा. खोक्याची उंची अॅजिनच्या मानाने जास्तींत जास्त ९–१० इंच व कमीत कमी ६ इंच उंच ठेवावी. अॅजिन बैठकीच्या चौकटीपासून चोहोंबाजूस १ इंच अंतर राहील अशा प्रमाणांत खोका तयार करावा. चौकटीची लांबी ३।। फूट असल्यास दोहो बाजूस एक एक इंच सोडून म्हणजे ३ फूट १० इंच खोक्याची आंतून लांबी येईल व चौकटीची रुंदी दोन फूट असल्यास दोन फूट दोन इंच खोक्याची आंतून रुंदी येईल. (आकृती नं. १ पहा)

**नळचा**–कांही अॅजिनांना फाऊंडेशन बोल्टसाठीं केलेलीं छिद्रें बेस प्लेटलाच असतात. परंतु कांही अॅजिनांचीं फाऊंडेशन बोल्ट अडकविण्यासाठीं केलेलीं छिद्रें बॉडीच्या मध्यें असतात. सहाजिकच अशा प्रकारच्या अॅजिनच्या फाऊंडेशनसाठीं फाऊंडेशन बोल्ट त्या मानानें चौकटीच्या वर ठेवावे लागतात. अशा प्रकारच्या फाऊंडेशनच्या वेळीं फाऊंडेशन बोल्ट जेवढे वर ठेवावे लागतील तेवढला मापाच्या वांबूच्या अगर एरंडाच्या नळचा कापून घ्याव्या. अगोदर चौकटीच्या छिद्रांत गज घालावा नंतर पाहिजे असलेल्या उंचीची नळी घालावी, नंतर वॉशर व शेवटीं बोल्ट लावावा म्हणजे फाऊंडेशनच्या वर योग्य उंचीचे फाऊंडेशन बोल्ट रहातील. (आकृति न. ३ पहा)



१ बॉडीमधील फाँडेशन बोल्टची छिद्रें २


**किरकोळ साधनें**–ज्याप्रमाणे वरील गोष्टींची अगोदर तरतूद करून ठेवणें महत्त्वाचें आहे त्याचप्रमाणें फाऊंडेशन करतांना लागणाऱ्या वस्तु, म्हणजे गुण्या, लाइनदोरी, लेव्हल बाटली इत्यादि वस्तु हाताशी असणें केव्हाहि चांगलें. त्याच प्रमाणें मिश्रण पसरविण्यासाठी करणी, मिश्रण ठोकण्यासाठी सळई अगर ठोके, खोक्याला आधार देण्यासाठी दोन पहारी, चौकटीला आधार देण्यासाठी दोन गज, मोजमाप करण्यासाठी पट्टी इत्यादि किरकोळ, परंतु फाऊंडेशन करतांना अत्यंत आवश्यक असणाऱ्या वस्तु अगोदरच आणून ठेवाव्यांत.

● ●

( पुढील अंकीं—फाऊंडेशनची प्रत्यक्ष मांडणी )


तार ] ● जयश्री हरयेनमः ● [हरीकृपा

महाराष्ट्राची २५ वर्षांची अखंड इंजिनियरिंग सेवा म्हणजे...



जय भारत

ऑईल इंजिन्स

☆

* ५/६ व ८/९ हॉ. पॉ. ची उभी व आडवी इंजिन्स * रोलिंग शटर्स् उभी व आडवी * रोलिंग ग्रिल्स् उभी व आडवी * ट्रेलर्स व ट्रॉलीज् फायर फायटर्स * सी आय. गेटस् इत्यादी

अिरेक्शन व फॅब्रिकेशन् कॉन्ट्रॅक्टर्स


: उत्पादक :

से. आर. के. पातोळे आणि कंपनी

शिवाजी उद्यम नगर, कोल्हापूर.



भरघोस विक्रीसाठी शेतकऱ्यांनी वाखाणलेलीं




स र्जा

डिझेल ऑईल इंजिनें

उभी व मजबूत बांधणीची

* स्लो स्पीड * कोल्ड स्टार्ट

* चार स्ट्रोक्स् * सिंगल सिलींडर * डबल फ्लॉय व्हील *

★ सदैव वापरा ★

● सुटे भाग हजर स्टॉकमधून केव्हाहि भरपूर मिळतील ●

उत्पादक :—

मे. अनिल इंजिनियरिंग वर्क्स

शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.

# सुंदर पत्रें !

पत्रलिहिणें ही एक कला आहे. अंतःकरणाचा हळुवारपणा असला तर ती लवकर साध्या होतें असा अनुभव आहे.

कांहीं नमुनेदार पत्रें ' माणूस ' मधून यापुढें उद्धृत करणार आहोंत वाचकांना तीं खासच आवडतील व अनुकरणीय वाटतील असा विश्वास आहे.

हीं पत्रें **श्री. श्री. बा. काळे** यांनी आपल्या संग्रहांतून निवडून दिलेलीं आहेत.

## : १ :

**माझ्या बाळाला अनेक आशीर्वाद,**

बाळ, तुझा जन्म झाला त्या दिवशीं आम्हांला स्वर्गीय ठेवा मिळाल्याचा आनंद झाला. श्यामवर्णीय व गुटगुटीत अशा त्या इवल्याशा तुझ्या मूर्तीला पाहून माझ्या मतांत भविष्यकालाचीं उज्वल चित्रें डोळ्यापुढें येत होती. तूं आमचा कुलदीपक म्हणूनच आम्ही मोठ्या आवडीने. उत्साहाने तूं सदैव प्रकाशित रहावेस म्हणूनच ' दीपक ' असें तुझें नांव ठेवलें. तूं शुक्लेंदुप्रमाणे हळूहळू वाढत होतास. तुझ्या बाललीला पाहून माझें मातृहृदय उचंबळून येत होतें. तुझ्या जीवनास आवश्यक असलेले रस देऊन, प्रेमाची ऊब देऊन, मायेचे पांघरूण घालून, तुझ्याबद्दलच्या भावी मनोराज्यांचीं अंगाई गीतें गाऊन तुला लहानाचा मोठा केला. बाळा, तुझा वर्षाचा व द्वि-दिवस साजरा करतांना आमचा आनंद उचंबळून आला होता. प्रतिवर्षी तुझा वाढदिवस आम्हीं आनंदाने साजरा करीत आलों. तूं शैशवातून बाल्यावस्थेंत पदार्पण केलेंस. तुला श्रीगणेशाचा पहिला धडा मीच दिला. माता ह्या दृष्टीनें मी तुझें संगोपन करीत होतें, त्यांतच तुझा गुरु ह्यादृष्टीनें माझ्यावर नवी जबाबदारी पडली.

तुझा सहा वर्षांचा वाढदिवस झाला. तुझी निकोप प्रकृति, सांगितलेल्या गोष्टींचें आकलन आणि मुलांना साजेशीच दांडगी वृत्ति पाहून माझ्या मनाचें समाधान झालें. त्याच वाढदिवशीं 'बाळ तूं मोठा हो !' हा शुभाशीर्वाद मी तुला दिला होता. तेव्हापासून प्रतिवर्षी तुझ्या वाढदिवसाला मी हाच आशीर्वाद तुला देत आलेली आहें. बाळ, चार शब्दांचाच हा आशिर्वाद, पण त्यांत सारं कांहीं सांठविलेलें आहे.

तुला अभ्यासाचे धडे देतांना रामलक्ष्मणाप्रमाणें आदर्श भावांचें प्रेम, त्यांनीं एकमेकांसाठीं केलेला त्याग, श्रावण बाळासारखा आईवडिलांची सेवा करणारा लौकिक मुलगा; पांच पांडवांतील शूर असा अर्जुन व बलवान् असूनहि आपली शक्ति, अनाठायीं खर्च न करणारा भीम; शिवाजीसारखा धर्माभिमानी राजा आणि आपल्या टिळक, गांधीजी यांच्यासारखे अलौकिक देशसेवक ह्या सर्वांच्या कितीतरी गोष्टी सांगत आलेली आहें. हेतु हाच कीं ह्या सर्व गोष्टींतील चांगल्या भूमिका तूं स्वीकाराव्यास. आणि ' **बाळ तूं मोठा हो !** ' हा माझा आशीर्वाद सार्थ करावास.

तुझं शालेय जीवन बघितलं तर असं दिसतं कीं तुझ्याजवळ बुद्धि असूनहि तूं अभ्यासासाठीं श्रम घेत नाहींस. खालच्या इयत्तांत बेताचा अभ्यास असल्यामुळें विशेष अभ्यास केला नाहींस तरी पास होत जातो आहेस. पण हें तुझं सुयश समजूं नकोस. दीपक, तुला मोठा व्हायचं आहे ना, मग त्याकरिता शालेय जीवनांत, अभ्यासांत हिऱ्याप्रमाणं चमकायला हवं. बालपणापासून नियमित अभ्यास, एकाग्रता आणि अभ्यासासाठीं घ्यायचे श्रम ह्या सर्वांची गांठ पडली पाहिजे, अन् मग आदर्श विद्यार्थी होणं अवघड नाहीं. दीपा, तुला एकदम कोणाच्याहि पगाराचा मोठा आकडा मात्र दिसतो, पण त्यासाठीं त्यांनीं केलेली तपश्चर्या मात्र दिसत नाहीं ! तूं एखादी गोष्ट करायची मनांत आणलीस तर एकाग्रतेनं, एकचित्तानं पार पाडतोस नव्हे तसं करण्याची धमक तुझ्या अंगांत आहे आकाशकंदिल करण्याच्या बाबतीतच पहा ना ! तूं दोन दिवस श्रम घेऊन तो व्यवस्थित तयार केलास. दीपा, हीच तळमळ, हीच एकाग्रता, हीच चिकाटी तूं अभ्यासांत जतन कर. बघ किती तरी फायदा होतो तुझा ! चार ठिकाणीं लक्ष ठेवून केलेल्या दोन तासाच्या अभ्यासापेक्षा अर्धाच तास एकाग्रतेनं केलेला अभ्यासच फायदेशीर असतो. बाळ, तुला मोठ्ठं व्हायचं आहे. तुला वाटतं, आपण मिलिटरींत जावं, खूप मोठं काम करावं. लहानपणीं तर तूं म्हणायचास–" मी मोटचचा कालखाना कालनाल आहे मोठा झाल्यावल–" तुझे हे बोबडे बोल ऐकून किती आनंद व्हायचा मला !

दीपक, तूं मोठा हो, पण त्यासाठींच विद्यार्थीदशेंत तूं ताऱ्यासारखा चमक हं ! तुझा स्वभाव गोड आहे, प्रेमळ आहे. आपलंसं करून घेण्याची बोलभांड वृत्ति, चौकसपणा, चेहऱ्यावरील मोहकता, गुटगुटीत निरोगी शरीर, सारं कांहीं चांगल आहे. पण कांहींवेळां एकदम उसळणार राग, थोडासा अविवेकीपणा आणि असमंजसपणा हे गुण तुझ्या इतर गुणांना गालबोटाप्रमाणे दिसतात. बाळ, तूं सोडून दे ना हें ! तुला मोठं ना व्हायचंय् ? तुझ्या अंगांतली शक्ति लहान भावंडांशीं, मित्रांबरोबर भांडून वाया घालविणार का तूं ? अन्यायासाठी झगड, मग ठोशास ठोसा दिलास तरी हरकत नाहीं !

माझा ' बाळ ' मोठा व्हावा हीच माझी इच्छा. त्यासाठीं मी माझ्या बाळाच्या हौशी पुरवितें, त्यास लागेल तें देतें. बाळा, सध्याच्या जगांत निकोप प्रकृति. कर्तबगारी आणि बुद्धिचातुर्य हेंच आपलं भांडवल आहे हें लक्षांत ठेव.

माझ्या साऱ्या इच्छा. आशा–आकांक्षा, भावना. सार कांहीं ' बाळ तू मोठा हो. ह्या चार शब्दांत सांठविल्या आहेत' तुझ्या प्रेमळ आईचा हा आशीर्वाद पुरा करण्यासाठी, आईच्या डोळ्याचें पारणें फेडण्यासाठीं, बाळ, तूं मोठा होणार ना ? तुझ्या अकराव्या वाढदिवशीं पुन्हां हाच शुभाशीर्वाद देतें मी–

**" बाळ, तूं मोठा हो ना ! "**

तुझी
आई

## : २ :

ती. आईस शिरसाष्टांग नमस्कार—

आई, अखेर कालपर्यंत मीं तुझी वाट पाहिली, पण शेवटीं निराशाच केलीस तूं ! तुला पुण्यांत येऊन जवळजवळ दीड महिना झाला, पण इतक्या दिवसांत तुला इकडे येण्यास वेळ कां झाला नाहीं ? तूं आली नाहींस, वाईट वाटलं मला. लक्ष्मणानें पाठ फिरविली म्हणून जन्मदेनें सुद्धा आपल्याकडे पाठ फिरवावी ह्याचा विषाद वाटतो मनाला. आई, लहानपणीं तीन वर्षांचा असतांना मी तुझ्यापासून दूर झालों, त्यामुळे सहवास कमी असल्याने तुझा पहिल्या-पासून माझ्याकडे ओढा कमी होता. परंतु पुढें मोठा झाल्यावर मी तुझ्याजवळ राहूं लागलों माझ्या जीवनाच्या भरभराटीच्या कालांत तूं आनंदानें माझ्या घरीं रहायला येत होतीस, माझ्या जीवनाशीं तूं समरस होत होतीस. आपल्या प्रेमळ आईवडिलांना कशाची उणीव पडूं नये म्हणून मी नेहमी दक्ष रहात होतों. मला जी जी मदत करतां येणं शक्य होतं ती मी करीत होतों. ह्यांत माझ्या पत्नीचं नेहेमीच सहकार्य असायचं. तूं तुझ्या सुनेबद्दल कौतुकाचे उद्गार काढायचीस, ते ऐकून मला माझ्या जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटायचं. तुला तुझ्या हुषार नातीचा अभिमान वाटायचा. 'माझ्या सुनेनं तिला तसं चांगलं वळण लावलंच आहे' म्हणून तूं सुनेचं आणि नातीचं कौतुक, स्तुति करायचीस, मग आज असं कां ? परिस्थितीच्या तडाक्यांत सांपडलेली तुझी सून अन् मी किती आतुरतेनं तुझी वाट पहात होतो. सुस्थितींत असलेल्याला तुझ्या मुलाचा संसार विस्कटून जाण्याचा क्षण आला होता, परिस्थितीचा फटकारा बसलेला तुझा मुलगा अन् सून कसा त्यांनीं धीर धरला असेल, आल्या गोष्टींना तोंड दिलं असेल ! अशा परिस्थितींत सांपडलेल्या तुझ्या निकटच्या माणसांना तुझे सहानुभूतीचे दोन शब्द म्हणजे वाळवंटांत सांपडलेल्या निर्झराइतके मूल्यवान् वाटले असते. पण आई, तूं आली नाहींस, आपली प्रेमाची पाखर कां दूर केलीस ? आई, तुला जिथें सुख, आनंद, समाधान वाटत असेल, तिथें तूं रहा. तुझ्या लाडक्या मुलाकडे तूं ऐश्वर्यात रहात असशील, तुझ्या जिवाला आराम वाटत असेल. परिस्थितीच्या तडाक्यांत हेलकावे खात तुझ्या मुलाची जीवन-नौका जात आहे. पण तरीहि लहानपणापासून ज्यांच्या मनावर भारतीय संस्कृतीचे संस्कार झालेले आहेत, तो तुझा मुलगा अन् सून आतिथ्याचें पालन अजूनहि करीत आहेत अन् तूं का कोणी परकी आहेस ? तुझ्या मनाला पूर्ण आराम मिळावा म्हणून आम्हीं खबर-दारी नसती का घेतली ?

तुझ्या मुलाच्या घरांत आज लक्ष्मीचें वास्तव्य नाहीं, पण आज माझ्या घरांत सरस्वतीचा निवास आहे. ज्ञानज्योति माझ्या घरांत पाजळत आहेत, मन कठोर करून आपल्या जीवनासाठी आम्हीं धडपडत आहोंत. एका मोठ्या वृक्षावर घरटीं करून रहाणाऱ्या पांखरांच्यावर वादळ कोसळावं, पांखरांनीं चारी दिशांना उडून जावं, तसंच झालं आहे इथें रहाणाऱ्या लोकांचं. तुझ्या मुलाचं एक घरटं शिल्लक आहे आणि तें सुद्धां परिस्थितिरूपी झंझावाताचे आघात सोसत ! चारी बाजूस पडझड झालेली जमीन, सभोंवार उगवलेलें हिरवेंगार गवत, जवळ ना सोबत ना कांहीं सोई, अशा स्थितींत तुझा मुलगा नि सून तीन मुलं घेऊन कसे रहात असतील, परिस्थितीशीं झुंझत तग धरून कशी रहात असतील, हें पहाण्यासाठी चार दिवसांसाठीच का होईना, तूं येथें येऊन माझ्या जीवनाशीं समरस होशील, असं फार वाटलं होतं मला. माझ्या जीवनांतील पितृछाया नष्ट झाली आहे, मातृछाया असूनहि दूर दूर जाऊं पहाते आहे ! आई, जगांत धन श्रेष्ठ असतें आणि प्रेमाचा झरा सुद्धां धनाच्या बाजूसच वळतो ह्याची प्रचीति आली आहे मला.

तुला सांसर्गिक रोग झाला असतांना आपल्या लहान मुलांना दूर ठेऊन सांसर्गिक रोग्यांच्या त्या हॉस्पिटलमध्यें, त्या नरकांत तुझी मनापासून सेवा करणारी तुझी सून, परीक्षेंत उत्तम यश मिळवून विश्वविद्यालयीन क्षेत्रांत पाऊल टेवणारी, अन् कुणी जवळचे नाते-वाईक नसल्यासारखं, तिनं कुठें रहावं ह्या निर्माण झालेल्या प्रश्नाची आंच पोंचलेली तुझी नात, बाल्यावस्थेंत आहे त्या स्थितींत आनंद मानणारे तुझे नातू, शरीर अन् मनःस्वास्थ्य गमावलेला तुझा मुलगा, सगळ्यांना कशी विसरलीस तूं ? संपत्तीप्रमाणें तें कौतुक, ती स्तुति वाफेप्रमाणे विरून जाणारी होती तर !

**आई, सांग ना, कां आली नाहीस तूं ?**

तुझा
सुधीर—

महाराष्ट्र सरकारने तगईवर मंजूर केलेलीं, टिकाऊ, मजबूत व कमींत कमी तेलखर्चात चालणारीं.....

**ऑगस्ट**

**क्रूड ऑईल इंजिन्स**

● ५।६, १०×११ हॉ. पॉ. चीं ● स्लो स्पीड ● कोल्ड स्टार्ट ●

उत्पादक

**ऑगस्ट इंजिनियरिंग वर्क्स**

रविवार पेठ, कोल्हापूर.

अहमदनगरमध्ये नव्यानेच सुरू झालेलें पेन-दुरुस्तीचें विश्वसनीय केंद्र म्हणजे....

**सुजाता पेन सर्व्हिस**

● पेन-दुरुस्ती ● नवीन पेन्स ● सुटी शाई

**सेंट्रल बँक रोड, अहमदनगर.**

# बलाढ्य ऑस्ट्रेलिया शह देणारे
# वेस्ट इंडिजचे खेळाडू

—विद्याधर

१९६०–६१ सालीं ऑस्ट्रेलियाचा दौरा करून क्रिकेट खेळाला एक प्रकारचें खिलाडू आणि उत्साही वातावरण निर्माण करून देणारा वेस्ट इंडीजचा संघ म्हणजे सध्या एक कौतुकाचा आणि चर्चेचा विषय झाला आहे. तसेंच एम्. सी. सी. चा पराभव करून भारतानेदेखील कौतुकास पात्र होईल अशी कामगिरी केली आहे. तोच भारताचा संघ आतां त्या "मजेदार" वेस्ट इंडीजच्या संघाशीं लढत द्यायला त्यांच्या भूमीवर गेला आहे. अशा वेळीं वेस्ट इंडीज संघांतील खेळाडू आहेत तरी कशा प्रकारचे हें पाहणें मोठें मनोरंजक ठरेल.

**१) कॉन्राड हंट** :—हंट आणि होल्ट ही पूर्वी वेस्ट इंडीजची आघाडीची जोडी होती. पैकी हंट हाच काय तो संघांत आपलें स्थान पक्कें करून बसला आहे. त्याला कारणहि तसेंच आहे. त्याच्याइतका तडफदार व शास्त्रशुद्ध खेळ खेळणारा व वेळ प्रसंगीं जबाबदारीने खेळणारा खेळाडू सध्यातरी वेस्ट इंडीजजवळ नाही. क्षेत्ररक्षणाबद्दल तर बोलणेंच नको ! गेल्या वर्षी ब्रिस्बेन येथें एकमेवाद्वितीय असा जो (Tie) कसोटी सामना झाला, त्यांत शेवटच्या गड्याला धांवबाद करतांना हंटने जो पराक्रम गाजविला त्याची सर्व वृत्तपत्रकारांनी मनसोक्त स्तुति केली आहे. मिडविकेटच्या चौकाररेषेकडे जाणारा चेंडू त्याने मिडऑनवरून हरणाच्या गतीने धांवत जाऊन अडविला व त्याच गतीनें यष्टिरक्षकाकडे अचूक फेकला व ऑस्ट्रेलियाचा शेवटचा गडी धावबाद झाला. आणि या वेळी या फटक्याला ऑस्ट्रेलियाला किती धांवा पाहिजे होत्या ? एक ! म्हणजे जेथे चार धांवा मिळायच्या तेथे एकहि धाव न मिळतां धावबाद व्हावयाची पाळी त्या खेळाडूवर आली.

**२) कॅमी स्मिथ** :—रे रॉबिन्सन् या क्रिकेट-लेखकाने ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यांतील एका सामन्याच्या वेळीं स्वतः स्मिथला प्रश्न केला "तुम्ही तुमच्या स्वतःच्या खेळाचें वर्णन कसें कराल ?" त्यावर मनसोक्त हसून स्मिथने उत्तर दिलें. "बेजबाबदार" (Reckless) आणि खरोखरच तें तसें आहे; फक्त तो 'जबाबदार बेजबाबदारपणें' खेळतो. याचा अर्थ असा की, आघाडीच्या फलंदाजाची चेंडूची चकाकी घालविण्याची कामगिरी तो कमीत कमी वेळांत करतो. तो फक्त ३०–३५ मिनिटेंच खेळेल परंतु तेवढ्यांत ४०–४५ धावा करील. त्याचा खेळ मात्र सुसूत्र आहे. उगीच नाही निशनच्या नव्या चेंडूच्या पहिल्याच षटकाच्या पहिल्याच चेंडूला त्यानें षटकार मारला. आमच्या देसाईने यापासून धडा घेतला पाहीजे. नाहींतर मारायचा 'वार' आणि चेंडू आणायला बोटी पाठवायला लागायच्या !

**३) रोहन कन्हाई** :—सध्यांच्या खेळाडूंत उत्कृष्ट खेळाडू निवडावयाचे झाल्यास त्यांत रोहन कन्हाईचा फारच वरचा नंबर लागेल. आम्हा भारतीयांना त्यांत अभिमान वाटतो. कारण, रोहन कन्हाई हा भारतीय आहे. त्याचें खरें नांव 'बाबुलाल' आहे. तो एक उत्कृष्ट यष्टीरक्षक आहे व 'कव्हरला' अत्युत्कृष्ट क्षेत्ररक्षण पण करतो गेल्याच वर्षी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यांत तिसऱ्या कसोटी सामन्यांत दोन्ही डावांत शतकें काढून त्याने आपलें नांव हटन, ब्रॅडमन या अलौकिक लोकांच्या यादींत नोंदवून घेतलें. सध्या 'बॅकफूट' पद्धतीचा खेळ फक्त ऑस्ट्रेलियन्स व वेस्ट इंडीयन्सच खेळतात. ओनील हा या प्रकारच्या खेळाचा 'दादा' समजला जातो. परंतु गेल्यावर्षी कन्हाईने आपल्या सातत्याने आणि सर्वांगीण नैपुण्याने त्याला मागे सारलें.

**४) गारफिल्ड सोबर्स.**—याच्याबद्दल कांहीही सांगणें न लगे. १९५७-५८ च्या पाकिस्तानच्या वेस्टइंडीज दौऱ्यांत यानें हटनचा कसोटी सामन्यांतील वैयक्तिक धावांचा (३६४ धावा) उच्चांक मोडून तो विक्रम स्वतःच्या नांवावर लिहून घेतला (नाबाद ३६५ धावा). जागतिक क्रिकेटक्षेत्रांत सध्या जें कांहीं थोडे 'ऑल राऊंडर्स' आहेत त्यांत सोबर्सचें नांव आहे. तो जेव्हा फलंदाजींत अयशस्वी होतो तेव्हा आपल्या डावखोऱ्या फिरक्या गोलंदाजीने प्रतिपक्षाला धूळ चारतो. जेव्हा फिरकी गोलंदाजी यशस्वी होत नाही असें दिसतें, तेव्हा तो नव्या चेंडूने पटापट बळी घेतो. शॉर्ट फाईन लेगला तर त्याच्या तोडीचा क्षेत्ररक्षक सध्यातरी कोणी नाही. गेल्या वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यांत १२५ मिनिटांत आपलें शतक पूर्ण केलें. त्यावेळीं टीकाकारांनी त्यांचें भयंकर कौतुक केलें. "ज्यांना ज्यांना तो खेळ बघावयाला मिळाला ते धन्य झाले !" असें त्यांनी वर्णन केलें.

**५) फ्रँक वॉरेल.**—वेस्ट इंडीज संघाचा जॉर्ज हेटली नंतरचा हाच पहिला कृष्णवर्णीय संघनायक. एकेकाळीं वीक्स्, वॉलकॉट व वॉरेल या तीन 'डब्ल्यू'नी क्रिकेट क्षेत्रांत भयंकर दरारा निर्माण केला होता. त्यातील पहिले दोघे सेवानिवृत्त झाले आहेत. परंतु वॉरेल मात्र अजून चमकत आहे. बेनोची त्याच्या नेतृत्वाबद्दल अफाट स्तुति करतात. परंतु त्याच बेनोच्या विरुद्ध गेल्या वर्षी वॉरेलने आपणहि कांही कमी नाही हें दाखवून दिलें कदाचित् वॉरेल किंचित् सरसहि ठरला आहे. तो एक अत्यंत खिलाडू वृत्तीचा गृहस्थ आहे असें सगळेजण म्हणतात. आपल्या भारतीय संघनायकानेदेखील येथून निघण्यापूर्वी म्हटलेंच आहे की, 'वॉरेल दुसऱ्या संघाचें नेतृत्व

करीत असतांना खेळींत येणारी मजा आता आम्हाला चाखावयाला मिळेल. वॉरेलची फलंदाजी आणि आवाडीची गोलंदाजी याबद्दल पूर्वी फार दवदवा होता. परंतु आता इतकें वय झालें असलें तरी या दोन्हींतील त्याचें कौशल्य किंचित्देखील कमी झालेलें नाही. त्यामुळे आता या दौऱ्यांत आमच्या विरुद्ध तो कोणकोणत्या कल्पना योजतो तें पहाणें मोठें मनोरंजक ठरेल. कॉंट्रॅक्टरला-देखील नेतृत्वाबद्दल एकदोन चांगले धडे मिळतील व तो अधिक धडाकेबाज संघनायक होईल अशी आशा वाटते.

६) **जो सालोमन.**—वेस्ट इंडीज संघाच्या कण्यांतील एक महत्त्वाचा खेळाडू. फलंदाजी करतांना तो कधीहि बचावात्मक खेळ खेळत नाही. त्यामुळे त्याचा खेळ पाहावयास मजा वाटते. भारतांत वेस्टइंडीज संघाबरोबर प्रथम आला. त्यावेळीं आपल्या फलंदाजींतील नैपुण्य त्याने दाखविलें. तो गेल्या वर्षी फलंदाजीपेक्षा क्षेत्ररक्षणांत अधिक चमकला. 'विकेट ब्रेकर' असें नामाभिधान त्याला दिलें गेलें. कोठूनहि त्याने चेंडू टाकला तरी तो सरळ यष्टीवर जाऊन आदळतो. याचप्रमाणे त्याने दोन गडी धावबाद करून ब्रिस्बेनचा सामना 'टाय' व्हायला मदत केली.

७) **सेमोर नर्स.**—हाहि मधल्या क्रमांकाचा खेळाडू आहे. फलंदाजींत अत्यंत उत्कृष्ट व भरवशाचा खेळाडू. वेळ पडेल तेव्हा बचावाचा व नाही तेव्हा आक्रमक खेळ खेळण्याबद्दल त्याची प्रसिद्धि आहे.

८) **बेसील बुचर.**—'बुचर' या शब्दाचा अर्थ इंग्लिशमध्ये 'खाटीक' असा आहे. आणि बुचर हा जेव्हा गोलंदाजीला फोडून काढतो तेव्हा हें नांव त्याला योग्यच आहे हें भारतीय गोलंदाजांनी वेस्टइंडीज संघ भारतांत आला होता त्यावेळीं अनुभवलें. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाला गेलेल्या संघांत जरी याचा समावेश झालेला नव्हता तरी यंदाच्या वर्षी तो पुन्हा 'फॉर्म' मध्ये असल्याने वेस्ट-इंडीजची फलंदाजी तो बळकट करूं शकेल.

९) **वेस्ले हॉल.**—सध्या जागतिक कीर्तीचे जे द्रुतगति गोलंदाज आहेत त्यांत हॉलचा दुसरा तरी क्रमांक लागेल. वेगाच्या बाबतींत तर त्याचा पहिला क्रमांक लागेल. भारतांत आलेल्या वेस्ट इंडीज संघांतील हॉल–गिलख्रिस्ट या वेगव्यापाऱ्यांनी भारतीय फलंदाजांची जी केविलवाणी स्थिति केली, त्याचा अनुभव गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी घेतला. त्यांच्या नशिबाने हॉलच्या जोडीला गिलख्रिस्ट नव्हता. परंतु हॉलने एकट्यानेच इतका दबदबा निर्माण केला होता की, प्रेक्षक केवळ हॉलची गोलंदाजी पाहण्याकरिता गर्दी करीत. एखाद्या दौऱ्यांत एका गोलंदाजाने एवढी लोकप्रियता मिळविल्याचें हें पहिलेंच उदाहरण. हॉल सुरुवातीला अत्यंत वेडीवाकडी व बेताल गोलंदाजी करीत असे, परंतु तो जसजसा अधिक कसोटी सामने खेळत आहे तसतसा त्याचा वेग व अचुकपणा वाढत आहे. त्याला आपल्या २५ यार्डांच्या खुणेपासून धावत येतांना पाहून फलंदाजाच्या पोटांत गोळाच उभा राहतो, परंतु भारताचे संघनायक नरी कॉन्ट्रॅक्टर यांनी म्हटल्या


गृहणीशिवाय घर नाही...असें पूर्वी म्हणत असत...पण आज मात्र रेडिओशिवाय घरास शोभा नाही...

'नॅशनल रेडिओ'

आपली ही गरज पूर्ण करील

● नगर जिल्ह्याचे अधिकृत विक्रेते ●

मे. आहेर ॲण्ड सन्स

म. गांधी पथ, अहमदनगर.

मॉडेल नं. ME ३५४ AC | M. B ३५४ Dry. B. | ५ व्हॉल्वस्; ३ बॅन्डस्

किंमत २८५ रुपये फक्त



पी १६६१] जय सहकार [स्थापना १९४५

भारताचा आर्थिक पाया बळकट करण्यासाठी हातमाग कापड वापरून आपला संसार सुखी व समृद्ध करा...

मध्यवर्ति सहकारी हातमाग

विणकर संघ लि.

इचलकरंजी

रंगाची, पोतफणीची, लांबीरुंदीची खात्री व सरकारी रिबेटची सवलत असणारीं खालील प्रकारचीं पातळें मिळण्याचें प्रमुख ठिकाण....

८०×८०, ८०×६०; ६०×६० व ६०×४० ची ९वारी, ५ वारी व ६ वारी अद्यावत् नमुन्यांचीं व आकर्षक डिझाईन्सचीं पातळें.

विक्री केन्द्रें: — ✠ इचलकरंजी ✠ कोल्हापूर

फोन ] [ ६५

प्रमाणे जर खरोखर मोन्हिडसन, वाकीफ व स्वत: हॉल आणि गिलख्रिस्ट यांची गोलंदाजी खेळल्यामुळे 'भारतीय फलंदाजांत आत्म-विश्वास निर्माण झाला असेल तर तें उत्कृष्टच ठरेल.

१०) लॉन्स गिब्ज:–एखाद्या उदयोन्मुख खेळाडुला जर सुयोग्य वेळीं संधि दिली गेली तर तो किती चांगली कामगिरी करूं शकतो हें गिब्जने गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दाखवून दिलें. व्हॅलेंटाईन आणि रामाधीन या जोडगोळीने १९४७ ते १९५७ या दरम्यानच्या काळांत समस्त क्रिकेट जगांत हाहा:कार माजविला होता. परंतु गेल्या वर्षी रामाधीननें ऐन दौऱ्यांत सेवानिवृत्त होऊन गिब्जला संधि दिली आणि त्यानेदेखील दुसऱ्याच सामन्यांत म्हणजे चौथ्या कसोटी सामन्यांत दुसऱ्या डावांत पांच ऑस्ट्रेलियन खेळाडू बाद करून वेस्ट इंडीजला विजयश्री मिळवून दिली. या पाच बळींत एक 'हॅटट्रिक' होती. गेल्या दहा वर्षांतील कसोटी सामन्यांतील हीच पहिली 'हॅटट्रिक' होती.

११) आल्फ व्हॅलेंटाईन:– १९५०–५१ सालीं वेस्ट इंडीजचा संघ जेव्हा इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता, तेव्हा त्या संघांत दोन 'पोरगे' फिरके गोलंदाज घेतले होते. आल्फ व्हॅलेंटाईन व सोनी रामाधीन! या दोघांची गोलंदाजी पाहून इंग्लिश टीकाकारांनी त्यांची मनसोक्त टिंगल केली होती. परंतु दुसऱ्याच कसोटी सामन्यांत लॉर्ड्सवर व्हॅलेंटाईनने ३४ धावांत सहा बळी घेऊन इंग्लंडला पराभव पत्करावयास लावला. तेव्हापासून व्हॅलेंटाईन म्हणजे फलंदाजांना एक भयच निर्माण झालें आहे तो कोणत्या प्रकारचा चेंडू टाकत आहे हें ओळखणें एकाहि पट्टीच्या फलंदाजाला अद्याप शक्य झालेलें नाही. हल्लीं जलद पदरचनेने फलंदाज त्याला तोंड देऊं शकतात. परंतु त्याची गोलंदाजी आत्मसात् करणें त्यांना कठीण जातें. वेस्ट इंडीजच्या टणक विकेटवर तो प्रभावी ठरत नसला, तरी त्याला कमी लेखणें धोक्याचें आहे.

१२) चेस्टर वॉटसन:– गेल्यावर्षी ऑस्ट्रेलियाविरूद्ध याने कसोटी सामन्यांत प्रथम प्रवेश केला. तो अतिशय वेगवान आहे. परंतु गोलंदाजींत अचुकपणा नसल्याने कसोटी-सामन्यांत समावेश केला जात नाही. वॉरेलच आवडीला गोलंदाजी करतो परंतु शेपटाकडील फलंदाजाची वडवाबडवी करून धांवा गोळा करण्याची कामगिरी उत्तमपणें पार पाडतो. गिलख्रिस्टचा जागा घ्यायला अगदी योग्य खेळाडू. फक्त प्रथमश्रेणीच्या सामन्याचा पुरेसा अनुभव मिळाला पाहिजे.

१३) डॉ. जॅकी हेन्ड्रीक्स–ॲलेक्झांडर कसोटी व प्रथमश्रेणीच्या सामन्यांतून निवृत्त झाल्यामुळे यष्टिरक्षणाची जबाबदारी याला उचलावी लागेल. प्रथमश्रेणीच्या सामन्याचा अनुभव नसला तरी त्याचें यष्टिरक्षण शास्त्र-शुद्ध असल्याने तो ॲलेक्झांडरची उणीव भासूं देणार नाही. याला शह द्यायला कन्हाई आहे, परंतु त्याच्यावर फलंदाजीची जबाबदारी फार मोठी असल्याने त्याची यष्टिरक्षणांतून सुटका करणेंच शहाणपणाचें ठरणार आहे. आणि म्हणूनच हेन्ड्रीक्सला कसोटी सामन्यांत प्रवेश सहज शक्य आहे.

१४) चार्लस् स्टेअर्स:– हा आणखी एक द्रुतगति गोलंदाजी याचा द्रुततम चेंडू गिलख्रिस्टच्या द्रुततम चेंडूपेक्षा द्रुततर असल्याचें सांगतात. परंतु सध्यातरी त्याला संघांत संधि मिळणें कठीण आहे. कारण अद्याप त्याला अचुकपणा नाही.

१५) चरनसिंह:– भारतीय खेळाडू आहे गेल्या वर्षी वेस्टइंडीजचा संघ ऑस्ट्रेलियाला रवाना व्हावयाच्या वेळेस याचें नांव घेतलें जात होतें. कारण त्या काळीं वेस्ट इंडीजमध्ये याने आपल्या फिरक्या गोलंदाजीनें हाहा:कार माजवून सगळ्यांत जास्त बळी घेण्याचा मान मिळविला होता. परंतु कमी अनुभवामुळे त्याला नेलें नव्हतें. यंदा एक तरी सामन्यांत त्याला खेळण्याची संधि देण्याची शक्यता आहे.

असा आहे वेस्ट इंडीजचा संघ. सर्व बाजूनें समबल. आणि कोठल्याहि संघाला त्याच्या घरीं हरविणें कठीणच! तशांतच ऑस्ट्रेलियाला शह देणाऱ्यांना आम्ही हरवूं असें म्हणणें मोठें धरिष्ट्याचें होईल. परंतु आम्हीहि कांही कमी नाही हें नुकत्याच संपलेल्या कसोटी सामन्यावरून दिसेल. तेव्हा कोणत्याहि गोष्टीचा अंदाज न सांगतां प्रत्यक्षांत काय होतें हेंच पाहावें!

## 'इंडिअन्स' नी दुसऱ्यांदा शिकविलेला धडा

नुकताच एम्. सी. सी. ने आपला भारत दौरा (East India) संपविला व या दौऱ्यांत त्यांचा दोन विरुद्ध शून्य असा पराभव झाला. या वेळीं एम्. सी. सी. ने संघ निवडतांना नेहमीचे उच्च दर्जाचे खेळाडू न निवडतां दुय्यम दर्जाचे खेळाडू निवडले. या वेळेस मे, कौड्री हे उत्कृष्ट फलंदाज व स्टॅथम, ट्रुमन हे उत्कृष्ट गोलदाज त्यांनी पाठविले नाहीत.

अगदी हीच घोडचूक एम्. सी. सी. ने १९४७–४८ सालच्या दौऱ्यांत केली होती. परंतु तो दौरा भारताचा (East India) नव्हता तर वेस्ट इंडीजचा होता. त्या दौऱ्यांस पाठविलेल्या संघांत त्या वेळचे प्रथम दर्जाचे खेळाडू, एड्रीच, कॉम्प्टन हे फलंजाद व बेडसर, राईट हे गोलंदाज, तसेंच यार्डली व हटनसुद्धा त्यांनी पाठविले नव्हते. हटनला नंतर त्यांनी विमानाने रवाना केले. या दौऱ्यांतदेखील इंग्लंडचा दोन विरुद्ध शून्य सामन्यांनी पराभव झाला होता. त्या दौऱ्याबद्दल गॉर्डन रॉस (क्रिकेट खेळ बद्दल अधिकारी व्यक्ति) यानें आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे की, 'आम्ही त्या वेळेस वेस्ट इंडीज संघाला कनिष्ठ दर्जाचा संघ ठरवून दौरा चालू केला ही एक घोडचूक केली आणि तिचीं पुरेपुर फळें आम्हाला मिळाली' अगदीं हेच उद्गार लंडनच्या 'डेली मिरर' चा बातमीदार ॲलेक्स बॅनिस्टर याने यंदाच्या या एम्. सी. सी. च्या दौऱ्यानंतर काढले.




# मराठी नाट्यसृष्टीचे मानकरी १९६२

( आमच्या प्रतिनिधीकडून )

सरकारी नाटयस्पर्धेमुळे अनेक नवे नट पुढे येत आहेत, नव्या संस्था उदयास येत आहेत, नवीं नाटकें व नाटककार यांचा रसिकांना लाभ होत आहे!

यंदाच्या नाटयस्पर्धांतून पुढे आलेल्या नट, नाटककार व अन्यकलावंत यांची ही धावती ओळख..........



'ससा आणि कासव'

★

चाळींतील खोलीच्या दर्शनाचे पार्श्वभूमीवर उषा ( सौ. देशपांडे ) आणि श्रीधर (माधव वाटवे)

★

**श्रीधर**:–उषा ! मुकुंदाने तुला जवळजवळ पसंत केलीच आहे ! आतां फक्त विवाह व्हायचाच काय तो बाकी ! !

## हौशी पण मेहनती – रंगायन

यंदाच्या सरकारी स्पर्धेत सर्वांत मोठें यश मुंबईच्या रंगायन या संस्थेला आणि या सस्थेने सादर केलेल्या 'ससा आणि कासव' या कांहीशा फार्सवजा नाटकाला लाभलें हें निर्विवाद. वर्षापूर्वी ज्या संस्थेचें नांवहि मुंबईत किंवा इतरत्र कुणाला माहीत नव्हतें ती ही हौशी कलाकारांची संस्था स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक मिळाल्यापासून सर्वत्र एकदम मानमान्यता पावली आहे.

रंगायन या संस्थेचें वैशिष्टय एकच आहे व तें म्हणजे यांत एकत्र झालेले कलाकार हे नव्याचे प्रेमी आहेत. रंगभूमीवर कांही नवें तंत्र अवलंबावें, नवीं माणसें, नवें नाटक पुढें आणावें अशा जिद्दीचे हे कलाकार आहेत. यांतील प्रमुख कलाकार मुंबईच्या नाटयरसिकांस अपरिचित नाहीत भारतीय विद्याभवन, इंडियन स्कूल ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट, ललितकलाकेन्द्र, साहित्यसंघ, इ. संस्थांतून या कलावंतांनी बरींच कामें केलेलीं आहेत. प्रत्येक संस्थेत कांही नवीन विचारांचीं माणसं असतात. त्यांना दुसऱ्याच्या तंत्राने वागण्याऐवजी स्वतःच्या नव्या विचारांनी कांही करावेंसें वाटतें आणि असे लोक साहजिक वेगळे होऊन स्वतःचें वैशिष्टय प्रगट करूं लागतात. त्याचप्रमाणे वरील संस्थांमधील स्वतंत्र वृत्तीचीं माणसं एकत्र येऊन त्यामधून 'रंगमंच' नांवाची सस्था उभी राहिली. अरविंद देशपांडे, माधव वाटवे, अरुण काकडे, शितूत, सौ. विजया (जयवंत) खोटे, ही मंडळी तिची प्रमुख सूत्रधार बनली. सस्थेने विजय तेंडूलकर यांचें "चिमणीचं घर होतं मेणाचं" हें नवें नाटक हातीं घेतलें. अनेक नव्या गोष्टींचीं भर घालून, विजयाबाईच्या प्रभावी दिग्दर्शनाखाली नाटक उभें राहिलें. प्रयोगाच्या दृष्टीने पाहातां नाटक फारच अप्रतिम होत असे. पण नाटयलेखनाच्या नवतंत्रामुळे प्रेक्षकांवर परिणाम करण्यात तें कमकुवत ठरलें. संस्थेचे श्रम मनाठायी गेले. अफाट पैसा खर्च झाला. पण योग्य तो प्रतिसाद मिळेना. गतवर्षीच्या सरकारी नाटयस्पर्धेत हेंच नाटक केलें होतें, पण यश मिळलें नाही. मेणाचे घर वितळूं लागलें आणि एक दिवस पार लोप पावलें. संस्थेचें आसन अस्थिर झालें आणि मोठ्या ईर्षेने पुढे आलेले हे हौशी कलावंत दिग्मूढ होऊन संस्था बंद पडली.

पुढे १९६१ सालीं पुन्हा एकवार प्रयत्न करून पहावा म्हणून त्यांनी उचल खाल्ली. 'रगमंच ऐवजीं रंगायन' या नांवाने तीच मंडळी एकत्र आली आणि त्यांनी टागोर शताब्दीमध्ये 'राजाचें पत्र' ही नाटिका सादर केली नाटिका पुष्कळच बरी झाली. पुढे सरकारी स्पर्धेसाठी नव्या नाटकाची शोधाशोध सुरू झाली. प्रत्येक वेळी नव्याची जिद्दीने मागणी करणाऱ्या या लोकांना या वेळीं नवें नाटक आणि नवा नाटककार भेटला. नव तंत्रांनी युक्त असें 'ससा आणि कासव' स्पर्धेला पाठविलें. अखेरीस मंडळींची जिद्द फळाला आली. संस्था एकदम नांवारूपास चढली. प्रथम पारितोषिकामुळे बराच पैसा हातीं आला आणि प्रयोग पुन्हा पुन्हा करण्यास सामर्थ्य आलें. आता नांव कमावण्यास त्यांना योग्य संधी आली आहे त्याचा ते पुरेपूर उपयोगही करतील याची खात्री वाटते.

रंगायनचें दुसरें एक वैशिष्टय आहे व तें म्हणजे त्यांच्याकडे जसा उत्कृष्ट नटसंच आहे, तशीच पडद्यामागील तितकींच महत्त्वाचीं कामें करणारे मेहनती लोक आहेत. त्यांचा एक मुरब्बी संचच या लोकांकडे तयार आहे. रंगभूमीवरील पात्रावर जेवढी जबाबदारी असते तेवढीच, किंबहुना कित्येकवेळां जास्तच जबाबदारी या पडद्यामागील लोकांवर असते आणि त्या बाबतीत रंगायन भाग्यवान आहे कल्पक लोकांची तर त्यांना वाणच नाही. 'ससा आणि कासव' यामधील वास्तवपूर्ण देखावा त्याचेंच द्योतक आहे.

अशा या 'रंगायन' संस्थेचे अध्यक्षपदीं प्रा. श्री. पु. भागवत असून श्री. विजय तेंडूलकर उपाध्यक्ष आहेत. विजयाबाई आणि अरविंद देशपांडे चिटणीस आहेत. भविष्यकाळीं या संस्थेकडून कोणतें कार्य होतें याबद्दल नाटयरसिकांस नक्कीच कुतूहल आहे.

## अभ्यासू दिग्दर्शिका–सौ. विजया खोटे

मुंबईमध्ये जे कांही नांवाजलेले दिग्दर्शक आहेत त्यामध्ये सौ. विजया (जयवंत) खोटे यांचें नांव प्रामुख्याने घेतलें जातें आणि हें मानाचें स्थान विजयाबाईंनी अल्पावधींत प्राप्त करून घेतलें आहे हें विशेष. त्यांच्या दिग्दर्शनाचें प्रमुख वैशिष्टय म्हणजे, त्यांनी केलेला नाटयाचा अभ्यास हा शास्त्रशुद्ध असतो हें होय. नाटक शिकविण्यापूर्वीं त्यांनी केलेलें मनन हेंच त्यांच्या कुशल दिग्दर्शनाला उपकारक ठरतें. येईल तें नाटक घाईगर्दीने शिकवायचें हा मुळी त्यांचा बाणाच नाही. प्रत्येक नाटयवस्तूचा वाङ्मयीन अभ्यास करून त्याला वास्तववादी करणें हा यांचा विशेष रंगमंचावरील Composition हेंदेखील चित्ताकर्षक असावें असा त्यांचा कटाक्ष असतो. यामुळे त्यांनी दिग्दर्शित केलेला प्रयोग हा नाटय दृष्टीने हिणकस ठरला तरी त्याचें प्रायोगिक मूल्य नेहमीच उच्च असतें 'चिमणीचं घर होतं मेणाचं' हें नाटक याचेंच द्योतक आहे. याखेरीज आजच्या प्रमुख दिग्दर्शकांमध्ये अल्पांशाने सापडणारें एक वैशिष्टय त्यांचेकडे आहे आणि तें म्हणजे रंगभूमीवरील पात्रांच्या होणाऱ्या हलचाली! वरवर पहातां हा विषय सामान्य वाटेल. परंतु विजयाबाईंनी या सामान्यांत अर्थ भरला आहे. त्यांच्या दिग्दर्शित नाटकांतून नटांच्या हालचाली इतक्या सुयोग्य होतात की, त्यामुळे प्रयोगाची रंगत अधिकच वाढते. विजयाबाई केवळ दिग्दर्शिकाच आहेत असें नसून त्या एक कुशल अभिनेत्री आहेत. त्यांची अभिनय क्षेत्रांतील ओळख नाटयरसिकांस नवीन नाही. 'रंगायन' या संस्थेच्या तर विजयाबाई आधारस्तंभच आहेत. त्यांचें नेतृत्व हा त्या संस्थेचा एक अभिमान आहे.

## यशस्वी नाटयलेखक-शं. गो. साठे !

'ससा आणि कासव' या नव्या फार्सवजा नाटकाचे लेखक श्री. शं. गो. साठे हे नाटककार म्हणून मराठी रंगभूमीस मुळीच अपरिचित नाहीत. त्यांचीं 'छापील संसार' 'स्वप्नीचें हें धन' 'पहाटेची चाहूल' हीं नाटकें सर्वज्ञात आहेतच. या नव्या नाटकाने मात्र त्यांनी आपल्या एका विशेष मान्यवर अशा नाटयविषयास हात घातला आहे आणि पहिल्याच नाटकाने त्यांना पुढे अधिक यशश्री मिळेल

असें सूचित केलें गेलें आहे. फार्समध्ये केवळ विनोदच हवा! कथानक नको!! या अर्थाचा समज साठे यांनी या नाटयाद्वारें दूर केला आहे. त्यांनीं फार्स आणि कथानक यांची सुरेख सांगड घातली आहे असें या नाटकांतून दृष्टीस पडतें.

## गायन आणि अभिनय–सौ. वाबगांवकर

गोवा हिंदु असोसिअेशनने सादर केलेल्या मृच्छकटिक या नाटकांत वसंतसेनेचें काम करणाऱ्या सौ. आशालता वाबगांवकर या पूर्वाश्रमींच्या आशालता नाईक या नांवाने सर्वांना परिचित आहेतच. १९५६ सालीं गोवा हिंदू असोसिअेशनने सरकारी स्पर्धेत केलेल्या संशयकल्लोळमध्ये त्यांना रेवतीच्या भूमिकेबद्दल प्रथम पारितोषिक मिळालें होतें. गोड आवाजाबरोबरच अभिनयाची जोडहि त्याचे ठिकाणीं असल्यानें त्यांची भूमिका सदैव स्मरणीय ठरते. १९५७ सालीं शारदेच्या भूमिकेबद्दल त्यांना सरकारी स्पर्धेत पारितोषिक मिळालेलें आहे. त्यांचें गाण्याचें शिक्षण गोविंदराव अग्नि यांचेकडे झालें असून अभिनयाचे धडे गोपिनाथ सावकार यांनी दिलेले आहेत. गोवा हिंदु असोसिएशनने केलेल्या 'होनाजीबाळा' मध्ये त्या गुणवतीची भूमिकाहि सुंदर वठवतात. यंदाच्या स्पर्धेत त्यांनी वसंतसेनेचीं पदें तल्लीनतेने म्हटलीं. त्यांच्या अभिनयाचें आणि गोड गळ्याचें योग्य चीज झालें असें म्हटलें पाहिजे.



## नवी अभिनेत्री–सौ. मालती देव

पुण्याच्या कलाभारतीने सादर केलेल्या 'शितू' या नाटकाद्वारे एका नव्या अभिनेत्रीचा लाभ मराठी रंगभूमीला झाला आहे. शितूची भूमिका सादर करणें हें कांही वाटेल त्याचें काम नव्हे. त्यासाठीं कमालीचे परिश्रम आणि अभिनयाचे श्रेष्ठ गुण आवश्यक आहेत. परंतु सौ. मालती देव यांनी ती अवघड भूमिका मोठ्या सहजतेनें सादर केली आणि त्यांच्या परिश्रमांचें योग्य चीज म्हणूनच की काय, त्यांना सर्वश्रेष्ठ अभिनयाचें पारितोषिक मिळालें आहे. सौ देव यांनी आजवर प्रमुख व्यक्तिरेखात्मक भूमिका केलेलीच नव्हती. त्यामुळे त्या दृष्टीनें या नाटकांत त्यांच्यावरील जबाबदारी फारच मोठी होती. पण ही जबाबदारी त्यांनी मोठ्या कुशलतेनें पार पाडली. सौ. देव यांना गायनाचें अंग असून त्यांनी मंबईच्या सुरेश हळदणकर यांचेकडे गाण्याचें शिक्षण घेतलें आहे. आजपर्यंत त्यांनीं फारशा संगीत भूमिका केल्या नसल्या, तरी आता यापुढे त्यांनी संगीत भूमिका करून यापेक्षा श्रेष्ठ दर्जाचें यश प्राप्त करून घ्यावें, अशी त्यांच्या चहात्यांची साहजिकच इच्छा राहणार.

## शहरी कलाकारांवर मात

पुण्या–मुंबईमधील प्रसिद्ध संस्थांमधील अन्य स्त्री कलाकारांवर मात करून अंबरनाथच्या सौ. सुमती आपटे यांनी अभिनयनैपुण्याचें बक्षीस मिळवावें ही गोष्ट खरोखरच मोठी कौतुकास्पद आहे. पुण्या–मुंबईत कलाकारांना अभिनयाचे धडे देण्यास नामवंत दिग्दर्शक भेटूं शकतात. पण अंबरनाथसारख्या छोटेखानी गांवात दिग्दर्शकाची उणीव प्रामुख्यानें आढळते. तरीदेखील सौ. आपटे यांना आपलें नैपुण्य सिद्ध केलें ही गोष्ट खचितच त्यांच्या श्रेष्ठ अभिनयगुणांचें द्योतकच म्हटली पाहिजे. अंतिम स्पर्धेसाठी 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकाचे प्रयोग एकूण तीन संस्थांनी केले. परंतु प्रियंवदाबाईंची भूमिका सर्वांत सरस वठली ती सौ. आपटे यांचीच! सौ. आपटे यांनी केवळ अंबरनाथ येथे होणाऱ्या नाटकाव्यतिरिक्त कुठे बाहेर काम केलेलीं नाहींत. अंबरनाथमधील नाट्य मंडळांतून मात्र त्या कामें करतात. स्पर्धेतून पारख झालेल्या या गुणी स्त्री अभिनेत्रीस बाहेरच्या प्रमुख मंडळांतून कामाची संधि मिळाल्यास त्यांचेकडून कांही मोठी कामगिरी होण्याची शक्यता दिसते आहे.



सौ. सुमती आपटे

## अनेकभाषी स्त्री कलाकार

गेल्यावर्षीच्या स्पर्धेत आणि या वर्षीच्या स्पर्धेत सातत्याने दोन वर्षे अभिनयाचें पारितोषिक मिळविणाऱ्या स्त्रीकलाकार म्हणून कु. नलिनी शर्मा यांचा उल्लेख करावा लागेल, सबंध नाटकांत (काळी माती, खारे पाणी) त्यांची भूमिका अत्यंत छोटी होती.




कु. नलिनी शर्मा

परंतु त्यांतहि त्यांनी आपलें कौशल्य पुरेपूर दाखविलें याबद्दल संदेह नाही. मुखियाच्या करारी व्यक्तिमत्त्वाची भूमिका त्यांनी बहारदार वठविली. कन्नड ही त्यांची मातृभाषा आहे. असें असूनहि मराठी नाटकांतून कामें करून त्यांत त्या पारितोषिक मिळवीत आहेत ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांना आजवर हिंदी, मराठी, कन्नड, नाटकांतून केलेली प्रत्येक भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडलेली आहे. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांनी मराठी रंगभूमीवर आणलेल्या या अभिनेत्रीकडून भावी काळांत कोणते विशेष प्रयत्न होतील याची उत्सुकता वाटावी, असें आपलें आगळेंच व्यक्तिमत्त्व त्यांनी निर्माण केलें आहे.

## माधव वाटवे

नाट्यस्पर्धेतील अन्य कोणत्या भूमिकेपेक्षा वृत्तपत्रें, प्रेक्षक आणि परीक्षकवर्ग या सर्वांनी एकमुखाने ज्या भूमिकेची स्तुति केली ती म्हणजे 'ससा आणि कासव' या नाटकांतील श्रीधरची भूमिका! माधव वाटवे या गुणी कलावंताने ही प्रमुख मध्यवर्ती भूमिका खरोखरच दृष्ट लागावी इतकी सुव्यवस्थित वठविली. सर्वांनी त्यांचें केलेलें वारेमाप कौतुक हें उगीच झालेलें नाही. वाटवे यांनी दबलेल्या मनोवृत्तीचा भावडा श्रीधर अत्यंत



विश्वास काळे



अरुण नाईक



आनंद ढवळे



माधव वाटवे

प्रभावीपणें उभा केला होता. मुंबईसारख्या अफाट शहरीं त्यांच्या कलागुणांचें चीज होण्यासारखें असून वाटवे केवळ आपल्या रंगायन या संस्थेवरील अनन्य लोभामुळेंच बाहेर कामें करीत नाहीत. परंतु त्याचें क्षेत्र यामुळे मर्यादित होत आहे. नाट्यगुणिक एका कसदार कलावंतास मुकत आहेत आजपर्यंत वाटवे यांनी कांही निवडकच भूमिका केल्या आहेत. 'चिमणीचं घर होतं मेणाचं 'मधील त्यांची गोविंदाची भूमिकाहि अतीच उतम होत असे. या कलाकारास पुढें आणणें ही गोष्ट मराठी रंगभूमीच्या हिताची ठरणार आहे.

### दुय्यम भूमिकेंत अभिनय नैपुण्य

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदीर या संस्थेने सादर केलेल्या 'श्रीमंत' नाटकांत 'भाऊ'ची दुय्यम भूमिका करणारे श्री. अरुण नाईक यांना उत्कृष्ट अभिनेता म्हणून मान्यता मिळाली आहे. यावरून दुय्यम भूमिकाहि उत्कृष्ट सादर केली तर ती सर्वमान्य होते या गोष्टीस जणु पुष्टी मिळाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रथम नाट्यमहोत्सवांत त्यांना 'जग काय म्हणेल!' या नाटकांत दिवाकरांच्या भूमिकेबद्दल प्रशस्तिपत्रक मिळालें होतें सांगलीमधील एक हरहुन्नरी कलाकार म्हणून त्यांना सांगलीकर ओळखतात. आजपर्यंत विविध प्रकारच्या भमिका—नायक, खलनायक, दुय्यम भूमिका —त्यांनी आपल्या अभिनयगुणाचे जोरावर यथायोग्य साकार केलेल्या आहेत. भूमिकेचा वाङ्मयीनदृष्ट्या अभ्यास करून आणि तसेच अन्य जाणकर लोकांशीं चर्चा करून भूमिका सादर करण्याकडे त्यांचा विशेष कल आहे.

### भूमिकेशीं तद्रुप होणारे विश्वास काळे

नागपूरच्या रंजन कला मंदिराने सादर केलेल्या 'काळी माती खारें पाणी' या नाटकांत मनाने सरळ, प्रेमळ परंतु तापट आणि हिंस्या वृत्तीच्या 'लहानु' या प्रमुख व्यक्तिरेखेची भूमिका करणारे श्री. विश्वास काळे यांचें सर्वत्र अमाप कौतुक होत आहे श्री. काळे यांचा विशेष हाच कीं, पूर्ण तीन तासांचे मिश्र नाटकांतून यांनी काम केलेलें हें पहिलेंच काम आहे यापूर्वी त्यांनी छोट्या छोट्या नाटिकेंतूनच कामें केली होतीं. त्यांना एकदम एवढी प्रमुख भूमिका देऊन दिग्दर्शकाने मोठेंच साहस केलें असेंच म्हटलें पाहिजे. परंतु श्री. काळे यांची आपली निवड किती यथार्थ होती हें पटवून स्वतःच्या अभिनयाचा कस आणि दिग्दर्शकाचें कौशल्य या दोन्ही गोष्टी सिद्ध केल्या आहेत. 'काळी माती खारें पाणी' नाटक संपूर्णतया भावनाधिष्ठित आहे. आणि लहानची भूमिका तर विशेषच भावनाप्रधान आहे. परंतु श्री. काळे आपल्या भूमिकेशीं कमालीचे तद्रूप झाले होते. त्यांचें आवाजावरील प्रभुत्व खरोखरच असामान्य होतें. भावी काळांत या नटाकडून कांही भरघोस कामगिरी व्हावी हीच इच्छा!

### अस्सल कोकणी व्यक्तिरेखा—

कोकणच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या श्री. गो. नि. दांडेकरकृत 'शितू' नाटकांत प्रेक्षकांना पसंत पडणाऱ्या दोनच भूमिका आहेत. एक 'शितू' आणि दुसरी पक्क्या कोंकणी वातावरणांत वाढलेला 'सदू'! ही सदूची भूमिका करणाऱ्या पुण्याच्या श्री. आनंद ढवळे यांनाही अभिनयनैपुण्याचें पारितोषिक मिळालें आहे. श्री. ढवळे यांनी उभा केलेला सदू खरोखरच यथातथ्य कोंकणी वाटत होता. त्यांच्या आवाजाची वेगळी लकब आणि अभिनयनैपुण्य खरोखरच नावीन्यपूर्ण आणि अभिनंदनीय आहे. स्पर्धेतील नाटकांतून त्यांचें हें पहिलेंच काम असून त्यांनी मानकऱ्यांमध्ये स्थान मिळवावें ही गोष्ट त्यांना भूषणावह नाही का?


### वास्तवपूर्ण नेपथ्याचे जादूगार—

ससा आणि कासव या रंगायनच्या नाटकाचें नेपथ्य कमालीचें वास्तववादी होतें चाळीमधील एका खोलीचें हुबेहूब दर्शन त्यांत घडविण्यांत आलें होतें पडदा उघडल्यावर आपण रंगभूमीवरील देखावा पाहात नसून जणु प्रत्यक्ष खोलीतच वावरत आहोंत असा प्रेक्षकांचा समज होतो. आणि म्हणूनच या नाटकाचें नेपथ्य बक्षिसास पात्र ठरलें अन्य कांहीं नाटकांतून जरी नेपथ्य नयनरम्य होतें तरी त्यानी तांत्रिक सजावटीची मदत घेतली होती. येथे मात्र अन्य कोणतीहि मदत न स्वीकारतां चाळीचें हुबेहूब दर्शन घडविलें होतें. ही किमया करणाऱ्याचें नांव आहे प्रकाश मळकर्णेकर! यांच्या बाबतींत एका गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. तीन अंकी संपूर्ण नाटकास त्यांनी केलेलें हें पहिलेंच नेपथ्य होय. कॉलेजमधील एकांकिकांना ते जुजबी नेपथ्य करीत असत परंतु या स्पर्धेमध्ये अशा प्रकारे जिवंत चित्र उभें करून त्यानी स्वतःबद्दल कांही अपेक्षा निर्माण करून ठेवल्या आहेत आणि पुढील काळांत पुऱ्या करतील असा विश्वास वाटतो.

### कल्पक प्रकाश—नियंत्रक—

या वर्षी प्रकाशयोजनेसाठीं एक नवें पारितोषिक ठेवण्यात आलें होतें. पुण्यामधील कला भारती या संस्थेचे प्रकाशयोजक श्री. राजा-

भाऊ नातू यांनी तो मान मिळविला. वास्तविक पुण्यासारख्या शहरी मुंबईप्रमाणे प्रकाशयोजनेबाबत नाना तऱ्हेचे प्रयोग करून पाहण्यास पुरेशी संधि नाही. साधनसामुग्री नाहीं, तरीदेखील पुणेकरांनी अशा सामुग्रीवर इतरांवर मात करावी ही गोष्ट राजाभाऊंच्या कल्पकतेचे द्योतक आहे. प्रकाश योजनेचें प्रयोगाच्या दृष्टीने असणारें महत्त्व अद्याप पुण्यांत व्हावें त्याप्रमाणांत प्रसृत झालेलें नाही. त्यामुळे पुण्यांतील प्रयोगांत प्रकाशयोजनेबाबत नवे प्रयोग करणे ही गोष्ट मोठी धोक्याची आहे. कित्येक वेळां पुण्यांत उपेक्षणीय ठरलेली त्यांची प्रकाशयोजना मुंबई किंवा अन्य शहरीं मान्यता पावली आहे. तरी अशा परस्थितींत राजाभाऊ आपलें प्रकाशयोजनेचें तंत्र साकार करीत आले आहेत.



प्रकाश मळकर्णेकर




वसन्त कानेटकर

**नाटचलेखनाचें पहिलें बक्षिस–**

प्रा. वसंत कानेटकर हे आपल्या समाजांतील लोकप्रिय नाटककार आहेत. केवळ तीनच नाटकें लिहून त्यांनी एक उत्तम नाटककार म्हणून मान्यता मिळविलेली आहे. त्यांच्या तीन नाटकांपैकीं 'वेड्याचं घर उन्हांत' आणि 'प्रेमा तुझा रंग कसा ?' या दोन नाटकांना सरकारी पारितोषिकें मिळालीं आहेत यांतच त्यांच्या लेखणीचा प्रभाव व्यक्त होतो. 'प्रेमा तुझा रंग कसा ?' हें फार्सिकल नाटक आजकाल सर्वत्र लोकप्रिय होत आहे. अंतिम स्पर्धेसाठी आलेल्या चौदा नाटकांत हेंच नाटक तीन संस्थांनी केलें होतें, याहून याच्या लोकप्रियतेचें आणि नाटकाच्या प्रायोगिक यशाचें दुसरें गमक कोणतें ?

**गायक नट–रामदास कामत**

या स्पर्धेमध्ये यंदाचे वर्षी उत्कृष्ट संगीताचें पारितोषिक ठेवण्याचा एक नवा परिपाठ सरकारने चालू केला असून गोवा हिंदू असो. च्या मृच्छकटिक नाटकांत चारुदत्ताची भूमिका करणाऱ्या रामदास कामत यांना तो बहुमान मिळाला आहे. त्यांनी आपल्या गोड पण तितक्याच दमदार आवाजांत चारुदत्ताचें म्हटलेलें प्रत्येक पद प्रेक्षकांच्या सदैव स्मरणांत राहावें इतकें उत्कृष्ट वठलें होतें. विशेषतः "रजनीनाथ हा नभीं उगवला" ह्या पदाचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. १९१६ सालीहि गोवा हिं. असो.च्या 'शारदा' नाटकातील कोदंडाच्या भूमिकेबद्दल त्यांना पारितोषिक मिळालें आहे. श्री. कामत यांची शास्त्रीय गाण्याची तयारी उत्तम असून त्यांचें वडील बंधु श्री. उपेन्द्र कामत यांच्या हाताखालीच ते संगीताचें शिक्षण घेत असतात. मृच्छकटिकमधील चालींचें विशेष मार्गदर्शन त्यांना श्री. प्रभाकर भालेकर यांनी केलें होतें. भावी कालांतील एक तरुण तडफदार गायक म्हणून त्यांच्याकडे आशेने पाहण्यास हरकत नाहीं.



रामदास कामत

शेतीच्या वैभवासाठी महाराष्ट्र सरकारने तगईवर मंजूर केलेले

वैभव
इंजिन
सदैव वापरा

* ६/६।।, ८/९, १०/११ हॉ. पॉ. चें * मजबूत बांधणी
* आडवे * कोल्ड स्टार्ट * कमी तेलखर्च

उत्पादक :— वैभव इंजिनियरिंग वर्क्स
शिवाजी उद्यमनगर कोल्हापूर

लेखक : वि. गो. खोदरेकर
गुजरातेतील मराठी राजवट
—: राजहंस प्रकाशन :—
आगामी प्रकाशन
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ पुरस्कृत ग्रंथ

# मराठी चित्रपटसृष्टि

## महामाहीची वाटचाल

पंडित मांडके

चित्राला कथा प्रभावी असावी लागते· आटोपशीर पटकथा हा चित्रपटाचा पाया आहे ही जाणीव असणारे पटकथालेखक असावे लागतात. या दोहोंचाहि समन्वय स्वतःच्या कल्पनाशक्तीने व तंत्राच्या साहाय्याने रजतपटावर साकार करणारा दिग्दर्शक ही 'त्रिमूर्ति' आज मराठी चित्रपटसृष्टींत हवी आहे. ती नाही तोंपर्यंत अशीच घसरगुंडी ......

काहीं वर्षांपूर्वीचा काळ असा होता की, मराठी चित्रपट वर्षाकांठीं जास्तींत जास्त २-३ च निघत होते ! व त्यांपैकी एखाद–दुसरा चित्रपट बराहि निघे. रसिक–पण वेडे प्रेक्षक त्यांवरच समाधान मानत असत. मराठी प्रेक्षक हा पहिल्यापासूनच अल्पसंतुष्ट आहे. सबंध चित्रपटच्या चित्रपट चांगलाच असला पाहिजे असा फारसा आग्रहहि तो सहसा धरीत नसे. त्याच्या समाधानाच्या कक्षेंत एखाद दुसरी बाब जरी संपूर्णपणें मिळाली तरी त्यावर तो संतोष मानून वेळप्रसंगीं एकच चित्रपट दुसऱ्यांदासुद्धा पाहात असे. फक्त चांगलें संगीत आहे म्हणून चाले! कथा संवाद बरे आहेत म्हणून चित्रपट चालत. एखाद्याच्या नशिबीं कलावंतांचीं कामेंसुद्धा चांगलीं असण्याचें भाग्य लाभे व तोहि चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरे······काळ बदलला, मराठी चित्रपटसृष्टीला बरे दिवस आल्यासारखे वाटूं लागले. मराठी चित्रपट डझनावारीं येऊं लागले व म्हणूनच की काय प्रेक्षक कंटाळूं लागल्यासारखे झाले.

गेल्या सहा महिन्यांत जे चित्रपट निघाले त्यांतल्या एकाहि चित्रपटाने प्रेक्षकाला भारावून टाकलें किंवा त्याच्यावर मोहिनी घातली–असा एकहि चित्रपट पहावयास मिळाला नाही व यापुढीलहि सहा महिन्यांत असा एखादा चित्रपट निघूं शकेल असा अंदाज बांधणेंसुद्धा अनाठायीं होईल. म्हणूनच या गोष्टीचीं कारणमीमांसा करणें उचित होईल. चित्रपटसृष्टीच्या एकेका प्रांतांत ज्यांचा दरारा जबर, ज्यांची पूर्व पुण्याई मोठी व ज्यांच्या एकेकट्याच्या नांवावरसुद्धा चित्रपट निघून चालूं शकले किंवा लोकांना आवडूं शकले त्या नांवांबद्दल आतां जणूं धसका बसल्यासारखें वाटत आहे व प्रेक्षक आता त्या एखाद्याच आकर्षणामागे धावावयास तयार नाहीत हें त्यांनी सप्रमाण दाखवून दिलें आहे.

### चित्रपटांची वर्गवारी

स्थूल मानाने विचार करतां ह्या कालावधींत जे चित्रपट निघाले त्यांची वर्गवारी दोन प्रकारें करतां येईल. जुन्या व जाणत्या दिग्दर्शकांचीं चित्रें व एक–दोनच, परंतु नवीन दिग्दर्शकांचीं चित्रें. या वर्गवारीची तुलनाच करावयाची ठरली तर नाइलाजास्तव असेंच म्हणणें भाग पडेल–तराजूच्या काट्यांत फारसा फरक पडलेला नाही. या ठिकाणी कोणत्याहि चित्रपटाचें सविस्तर परीक्षण करण्याचा हेतु नाही व त्यांत स्वारस्यहि नाही. परंतु ज्या तऱ्हेने हे ८–१० चित्रपट निघाले व गेले वा जाण्याच्या पंथाला इतक्या त्वरेने लागले त्याची चर्चा करणें हें जास्त युक्त ठरेल. सर्व चित्रपटांच्या बाबतींत प्रामुख्येंकरून एक दोष निर्विवादपणें दाखवून देतां येईल–हे चित्रपट चित्रपट नव्हते तर बोलपटच होते. कथाचित्र हें घटनांतून उलगडून दाखविण्याऐवजी आमचे सारे रथी–महारथी बोलीभाषेंत तुटपुंजी कथा प्रेक्षकांच्या गळीं उतरवूं पाहात आहेत व या एका घातुक दोषांतूनच ही घसरगुंडी निर्माण होत आहे.

नवीन व होतकरू दिग्दर्शकांकडून आलेले पहिलें चित्र म्हणजे बोलकी बाहुली. राजा बारगीर यांचें हें दुसरें चित्र. 'सुखाचे सोबती' ह्या पहिल्या चित्रानंतर बऱ्याच काळानंतर त्यांचेकडून आलेलें हें दुसरें चित्र. त्यांत वाखाणण्यांसारखें कांहीहि नाही. थोडयाफार कथासूत्राशीं जास्तीत जास्त प्रामाणिक राहून जें कांहीं करतां येणें त्यांच्या ताकदीवर शक्य होतें तें त्यांनीं केलें. त्यांत थोडे भाग मनोरंजक होता, बाल कलाकारांचीं कामें छान होतीं, बराचसा भाग कंटाळवाणा होता व एकंदर सारीच कथा अंतिरंजित वाटल्यामुळे–ठीक आहे, वेळ तितका वाईट गेला नाहीं एवढी एकच भावना मनांत ठेवून प्रेक्षक निघून गेले. प्रेक्षकानें हें चित्र दुसऱ्याला वाखाणलें नाही. पण त्याचबरोबर हें पाहूं नका असें सांगण्याचा त्याला धीरहि झाला नाही.

त्यानंतर जो चित्रपट येण्याआगोदरच गाजला तो म्हणजे मधुकर पाठक ह्या तरुण दिग्दर्शकाचा 'प्रपंच' हा. या चित्रपटाबद्दल फार अपेक्षा उंचावल्या गेल्या होत्या. वास्तववादी व अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न ज्यांत अत्यंत तळमळीने हाताळला आहे इ. इ. अवडंबरानेच ज्याचें स्वागत केलें गेलें तें हें चित्र ग. दि. माडगुळकरांची कादंबरी–कथा, कुटुंब-नियोजन ह्या अत्यंत नाजुक विषयाला हात घातलेला. ज्याच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेला सुलोचनेसारख्या असामान्य अभिनेत्रीनें साथ दिली–तें चित्र वास्तवतेंत फक्त एक स्वच्छ

ग्रामीण कथा, किंचित् दुःखी कहाणी, नेहमीच्याच अवास्तवतेने रंगविलेली व शेवटीं घाईघाईंत तात्पर्य सांगायलाच पाहिजे—नाही तर लोक काय म्हणतील या भीतीने जणूं जातां जातां कथासूत्र सांगून टाकलें की काम संपलें अशा गर्दीगर्दीत संपूर्ण वाया गेलेलें एक फार मोठें कथानक. जातांना प्रेक्षक समाधान करून घेत होते. एक–दोन गाणीं बरीं होतीं. मुलोचनेचें काम छान होतें ( हें वाक्य मराठी प्रेक्षक आतापर्यंत वर्षांतून एकदा तरी नियमितपणें म्हणत आला आहे )—किती विचारीचे हाल झाले, नाही—! बस्स एवढेंच. या चित्रांतील वास्तववादी भाग फक्त जाहिरातींतच गाजला. अर्थात नव्यानेच दिग्दर्शनासाठी उतरलेल्या दिग्दर्शकाच्या आवाक्याबाहेरचेंच हें काम होतें व पटकथाच पोकळ निघाल्याने नवखा दिग्दर्शक तरी काय करूं शकला असता हाहि एक प्रश्नच आहे. पहिलाच प्रयत्न म्हणून जेवढें श्रेय द्यावयाचें तेवढेंच देऊन टाकूं त्याला.

त्यानंतर आलेलें चित्र तें माधव भोईटे या आणखी एका नव्या दिग्दर्शकाचें. बायकोचा भाऊ हें. प्रेक्षकाला या नांवांत कांही स्वारस्य नाही. त्याला या चित्रपटाचें अकर्षण वाटण्याचें प्रमुख कारण म्हणजे राजा परांजपे या महाराष्ट्राच्या पॉल म्युनीची प्रमुख भूमिका हें ! व त्यानंतर अपेक्षेची एक बाजू म्हणजे नाटककार म्हणून प्रसिद्धीस पावलेल्या बाळ कोल्हटकरांची कथा-पटकथा संवाद इ. हें एक. पहिल्याच प्रयत्नांत कोल्हटकरांना कळून चुकावें की, छे, छे, हें तंत्रचि वेगळें ! महाराष्ट्राच्या या पॉल म्युनिची पुण्याईसुद्धा हें चित्र सावरूं शकली नाहीं. कांहीतरी गंमत आहे झालं–एवढीच फसवणूक करून घरीं जातो प्रेक्षक. इतकेंच याचें मूल्यमापन.

## ग्रामीण चित्रांचा सांचा

'सांगत्ये ऐका'च्या अभूतपूर्व यशानंतर अनंत माने यांचेकडून आलेलीं चित्रें म्हणजे रंगपंचमी व मानिनी. ग्रामीण कथेच्या साच्याला प्रेक्षक तर कंटाळलेलेच आहेत. पण एखादे वेळेस समस्त ग्रामीण जनता व त्यांतल्या त्यांत पाटील मंडळीनीच चिडून इतका हा कथाप्रपंच वेचव झालेला आहे व म्हणूनच त्यांत रंग भरण्यासाठी हिंदी सिनेमांतील कामुक हावभावांची भ्रष्ट नक्कल करून पंचमी साजरी करावयाची एवढेंच भांडवल. तीन तास चित्रगृहांत बसणारा प्रेक्षक विचार करीत नाही तोंपर्यन्तच त्याची दखल घ्यावयाची, यापेक्षा त्याला जास्त महत्त्व नाही.

पुनरुक्ति न करतां 'मानिनी'बद्दल एवढेंच म्हणतां येईल की, केवळ गाणीं व स्त्रीजातीबद्दल वाटणारा जिव्हाळा या एका उदार भावनेनेच फक्त भगिनीवर्गांत थोडी फार मान्यता मिळविलेला एक अतिसामान्य चित्रपट.

फार वर्षांनी दत्ता धर्माधिकारी पुनः एकदा पूर्वीच्याच थाटांत 'एक धागा सुखाचा' घेऊन आले. फार दिवस झाले म्हणूनच की काय लोक थोडे फार नादी लागले. कलावंतांचीं नामावळ चांगली, कारेलकरांची त्याच त्या धाटणीची कृत्रिम कथा व त्याहीपेक्षा अधिक अतिरंजित असा दिग्दर्शनाचा नमुना—लोकांना वेगळेपणाने तात्पुरता रिझवूं शकला. पण तरीदेखील बाल कलाकारांचेंच काम चांगले झालें हा शेरा देऊन प्रेक्षक चित्र विसरून गेला.

ज्यांच्या पटकथा–संवादाला एके काळीं लोकांनी टाळ्यासुद्धा दिल्या ते दिनकर पाटीलआगळा विषय घेऊन आले. सुधीर फडकेसारख्या मातबर संगीत-दिग्दर्शकाची साथ त्याला लाभली. जाणिते कलावंतहि मिळाले पण मिळाले नाहीत ते प्रेक्षकच ! सहनशक्ति संपत आली की, प्रेक्षक काय करूं शकतो याची रसिकांनीं दिलेली, पहिली विचारांत घेण्याची सलामी.

परांजप्यांच्या 'राजा'खेरीज दुसऱ्या एका 'राजा' वर मराठी प्रेक्षकांची थोडी फार भिस्त होती. ते म्हणजे 'राजा ठाकूर', ह्या दिग्दर्शकाबद्दल खूप आशा आहेत. त्यांचा 'पुत्र व्हावा ऐसा' हा चित्रपट नुकताच आला आहे. कथावस्तु नसतांनासुद्धा चित्रपट जास्तींत जास्त किती सुसह्य करतां येतो हें दाखविण्यांत जें काही यश त्यांना मिळालें यांतच त्यांचें वैशिष्टय ! लहान मुलांचीं कामें किती छान झालींत नाही ! या एका वाक्यावरच चित्रपट विसरला जातो. बाकी आले गेले ते विचारांत न घेण्याजोगें !

## प्रचंड घसरगुंडी कां ?

मराठी चित्रपटांच्या बाबतींतली ही प्रचंड घरगुंडी पाहिल्यानंतर मन विषण्ण होतें व म्हणूनच विचार करावासा वाटतो की, हें असें कां ?

मूळ कथा काय आहे हें नीट मांडूं न शकणारे पटकथा लेखक, लेखकाला काय म्हणावयाचें आहे व तें नीट सुसूत्र पद्धतीने चित्रण करून कसें मांडावें हें न समजणार दिग्दर्शक, तेच तेच चेहरे आलटून पालटून प्रेक्षकांच्या माथीं मारण्याचा अट्टाहास करणारे निर्माते व कसाहि अभिनय केला तरी प्रेक्षक नांवावरच येत आहेत या भ्रमांत असणारे आपले कलावंत–हे सारेच्या सारेच फक्त या अनिष्टाला कारणीभूत आहेत–प्रेक्षक नव्हेत !

चित्राला कथा प्रभावी असावी लागते. त्याची पटकथाहि तितकीच आटोपशीर मांडण्यांत चित्रपटाचा पाया आहे याची जाणीव असणारे पटकथालेखक असावे लागतात व या दोघांचाहि समन्वय स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या जोरावर प्रथम व मग तंत्राचें सहाय्य घेऊन पडद्यावर आणाणारा दिग्दर्शक ही त्रिमूर्ति आज मराठी चित्रपटसृष्टींत हवी आहे. ती जोंपर्यंत वास्तवांत दिसून येत नाही तोंपर्यंत हिंदी सिनेमाला तिकीट नाही मिळालें तरच मराठी चित्रपटाकडे वळावयाचें ही वृत्ती बाळगणारा प्रेक्षक व निर्माते यांच्यांतलें अंतर कमी होणार नाही. त्यांतील विरोधाभास तर पुढेच आहे. कांहीएक विचार न करतां स्वच्छ मनाने जावयाचें व तितक्याच स्वच्छ मनाने परत यावयाचें एवढ्याच दृष्टीने हिंदी सिनेमाला जाणारा प्रेक्षकवर्ग केवळ मराठी चित्रपट अपेक्षाभंग करणारे असतात म्हणून हिंदी चित्रपटाबद्दल जास्त समाधान मानतो. हें अत्यंत धोक्याचें आहे.


## पायाभूत गोष्टींचा विचार

वर परामर्श घेतल्या गेलेल्या चित्रपट नव्हे बोलपटांपैकी, बऱ्याच बोलपटांच्या मुळाशीं उत्कृष्ट कथा कल्पना आहेत, पण त्यांचें संयमित व हळुवार दिग्दर्शन नसल्यामुळेच त्या संपूर्ण वाया गेल्या आहेत. इतकेंच काय, 'सुवासिनी' सारखी कथा सुद्धा, कथेसाठी प्रेक्षकाच्या स्मरणांत राहूं शकली नाही. मानिनी, प्रपंच, पुत्र व्हावा ऐसा इ. चें काय झालें ? तर त्यांतला एखाददुसरा भाग बरा आहे याचाच उल्लेख समाधानासाठी करून घ्यावा लागला व चित्रकथा विसरावी लागली. वास्तविक पाहातां या कलाखंडांत २–३ तरी अप्रतिम असे चित्रपट निघण्याइतक्या ह्या दोन–तीन कथा प्रभावी होत्या व इतक्या प्रभावी कथा हातांत मिळूनदेखील जर आमच्यातील अनुभवी व जाणत्या दिग्दर्शकांकडून जर अशीच हेळसांड होणार असेल तर त्यांच्याकडून जास्तीच्या अपेक्षा करणें म्हणजेच पदरीं मूर्खपणा घेण्यासारखें आहे.

प्रेक्षकाला कांहीहि दिलें तरी चालते या भावनेतून या समस्त जबाबदार मंडळींनी सावध व्हावयास पाहिजे; नाहीपेक्षा भवितव्य


अत्यंत बिकट आहे. चित्रपट निघतील, चालतील वा न चालतील. परंतु प्रेक्षक मनाने मात्र मराठी चित्रपटांबाबत फार निराश राहील. फार झालें तर थोडे फार प्रेक्षक कर्तव्यबुद्धीनेच फक्त मराठी चित्रपटांकडे वळतील–नाहीपेक्षा निदान करमणुकीच्या बाबतींत तरी हिंदी चित्रपट सरस असतात–म्हणून बहुसंख्य तिकडे वळतील.

ही समस्या तितकीशी अवघड नाही. कथालेखक व पटकथालेखक व जोडीचा दिग्दर्शक यांच्यांत वैचारिक एकमत झालें व त्यांतून बेबनाव न होतां एखादा प्रयत्न करावयाचा म्हटला तरी चित्रपट हा खऱ्याखुऱ्या अर्थाने चित्रपट बनूं शकेल व नंतर त्याची इतर अंगोपांगें त्याला पूरक ठरूं शकतील. एरवी नाही. नाही तर या चित्रांत लहान मुलामुलींचीं कामें चांगलीं आहेत, त्या चित्रांत काय तर म्हणे एक दोन गाणींच बरीं आहेत, त्याचें बाह्य छायाचित्रणच बरें आहे किंवा मध्यंतरापर्यंतच चित्र बरें आहे, किंवा एखाद दुसऱ्या कलाकाराचें काम बरें आहे असलाच युक्तिवाद करून चित्रपट टाकावू कसा नाही असलें लंगडें समर्थन करीत राहण्याची वेळ येणार आहे. कथा बरी असली व ती कुशलतेने मांडली गेली तर संगीत, छायालेखन इतकेंच काय अभिनयसुद्धा बेतास बात असला तरी चालूं शकतो. चित्रपटाच्या या मूळ अंगाचा विचार आम्ही यापुढे अधिक काळजीपूर्वक करण्यावरच मराठी चित्रपटसृष्टीचें भवितव्य अवलंबून आहे.



न्हावी :– “ वकीलसाहेब, आपण माझी केस अर्धवटच सोडून दिली होती, तें आठवतं का तुम्हाला ? ”


वालचंद कॉलेज ऑफ् इंजिनियरिंग, सांगली यांच्या चाचणीस संपूर्ण उतरलेलें......



डायमंड

५ हॉ. पॉ. चें उभें इंजिन

* सिंगल सिलींडर
* कोल्ड स्टार्ट
* चार स्ट्रोक्स्
* मिनिटास १५०० फेरे *

सदैव वापरा


अधिकृत विक्रेते : मे. एम. एच. हुदली ॲण्ड सन्स
शाहुपुरी, कोल्हापूर.

उत्पादक : डायमंड इंजिनियरिंग वर्क्स
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.



★ भारतीय कारागिरीचा उत्कृष्ट नमुना ★

अल्पकाळांत शेतकऱ्यांच्या व कारखानदारांच्या पसंतीस उतरलेलीं, मजबूत बांधणीचीं व चालविण्यास अत्यंत सोपीं...



मेनन डिझेल इंजिन्स

* व्हर्टिकल * ६ हॉर्स पॉवरचीं * मिनिटास ६५० फेऱ्यांचीं *

सदैव वापरा

उत्पादक : मेसर्स मेनन ॲण्ड मेनन
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.



# बुद्धिबळाच्या पटावर

श्रीकृष्ण साखळकर

लेखांक–सहावा

आता आपण बुद्धिबळाच्या मूलभूत आठ तत्त्वांचा विचार करावयास घेणार आहोंत ! हीं तत्त्वें जर्मन खेळाडू 'अरेन निमझोविच्' याने प्रतिपादिलीं. त्यानें प्रथमच स्वतः या तत्त्वांच्या आधारें तोपर्यंत खेळला जात असलेल्या डावाच्या बैठकींत आमूलाग्र बदल घडविला. तो जागतिक नेता होऊं शकला नाही याचें कारण त्याच्याचबरोबर खेळणारा 'कापाब्लांका' हा खेळाडू उपजतच कुशाग्र बुद्धीचा होता व हीं सगळीं तत्त्वें त्याला न शिकतांच अवगत होतीं. किंबहुना तीं वापरण्यांत तो 'निमझोविच' पेक्षाहि सफाई दाखवीत असे !

पहिलें तत्त्व विचारांत घ्यावयाचें तें 'पटाचा मध्य'

पटाचा विचार केल्यास राजा व वजीराच्या रांगांमध्यें चौथे व पांचवे चौकोन हे पटानें मध्यावरील चौकोन ठरतात. या चौकोनांना जें युद्धामध्यें मोक्याच्या ठिकाणांना महत्त्व असते, तसे खेळांत महत्त्व आहे. किंबहुना ज्याच्या ताब्यांत हे चौकोन त्याचा डावांत वरचष्मा हें नक्की. तेव्हा डावाच्या सुरुवातीपासून खेळाडूंचे या चार चौकोनांच्या ताब्याबद्दल लक्ष हवें !

चौकोनांचा ताबा म्हणजे काय ? एक तर आपलीं मोहरीं त्या चौकोनांवर खेळावयाचीं किंवा ते चौकोन अशा प्रकारें आपल्या मोहोऱ्यांच्या माऱ्याखाली ठेवावयाचें की, प्रतिपक्षाला तेथे त्याची मोहरीं खेळतां येणार नाहीत व आपली मोहरीं मात्र सहजात हवीं तेथें खेळतां येतील.

या चौकोनांचें महत्त्व जर वाचकाला तावडतोब जाणून घ्यावयाचें असेल तर त्याला एक मार्ग आहे. प्रत्येक मोहरें मोकळ्या पटावर त्याने या कोणत्याहि चौकोनांत ठेवावें व तेथून किती व कोठें गति घेतें याचा विचार करावा. विशेषतः घोडा या ठिकाणीं ठेवून, तो जातो तीं घरें मोजा. मग पटाच्या एका कोपऱ्यावरील घरांत ठेवून तो कोठे जातो तें पाहा. या अभ्यासाने सहज लक्षांत येईल कीं, पटाच्या मध्यावर मोहरें जास्तींत जास्त मारा करूं शकतें. म्हणजेच मोहोऱ्यांचें सामर्थ्य पटाच्या अग्रभागीं जास्त असते. तेव्हा जर खेळाडूला आपल्या मोहोऱ्यांचा उपयोग भरपूर करून घ्यावयाचा असेल तर त्याने ती डावाच्या सुरुवातीलाच अशी खेळायला हवीं की, त्यांचा पटाच्या मध्याशी सतत संबंध राहील.

पटाचा मध्य ताब्यांत ठेवण्याचें दुसरें एक कारण म्हणजे डावाच्या सुरुवातीला प्रतिपक्षाच्या डावावर कोठे हल्ला करावयाचा हें आपल्याला ठरवतां येत नाही. त्यांनी एखादा पवित्रा घेतल्यानंतर तो कसा नेस्तनाबूत करावयाचा तें ठरविणें शक्य होतें किंवा जर आपणच एखाद्या प्रतिपक्षाच्या मोहऱ्यावर हल्ला करावयाचें ठरविलें तरीहि आपल्याला मोहरीं जेवढीं अधिक मिळतील तेवढीं हवीत. या दोन्ही कारणांसाठी मध्यावर खेळलेलीं मोहरीं झटपट उपयोगांत आणतां येतात. कल्पना करा की, आपल्याला प्रतिपक्षाच्या राजाच्या फळीवर चढाई करावयाची आहे. आणि आपण आपला घोडा वजीराच्या हत्तीच्या तिसऱ्या घरांत खेळलेले आहांत. आता त्या घोड्याची हल्ल्यांत जरुरी आहे. धरून चालू या की, घोड्याने आपल्याला राजाच्या उंटाच्या सहाव्या घरावर मारा करावयाचा आहे. आपण तो घोडा खेळाल तर वघो –५, व–उं–३, व–५ आणि रा उं–६ या दोन खेळांतच तो नियोजित जागीं येईल. यावरून पटाच्या मध्याचें महत्त्व सहजच ध्यानांत येतें.

पटाच्या मध्याच्या अनुषंगाने अर्थातच् जो एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो त्याच्याकडे आपण वळूं या. तो मुद्दा म्हणजे डावाच्या सुरुवातीला मोहोरीं खेळावयाची पद्धति तीं पटाच्या मध्यावर लक्ष ठेवून खेळावयाचीं हें ठरलें, परंतु आपण हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जशी आपण आपलीं मोहोरीं पटाच्या मध्याच्या दिशेने खेळणार तशी आपला प्रतिपक्ष पण खेळणार. तेव्हा पटाच्या मध्याचा ताबा मिळविण्यासाठी आपल्याला केवळ आपलीं मोहोरीं खेळून भागण्यासारखें नाही. तर प्रतिपक्षाचीं मोहोरीं मध्यावरून हुसकावून लावण्याची जबाबदारीसुद्धा आपणावर येणार.

तीं मोहोरीं कशीं हुसकवायचीं ? त्याचें एक शास्त्र आहे. त्या शास्त्रांत अस्त्र म्हणून प्यादीं वापरायचीं असा सिद्धांत आहे. पटाच्या मध्यावर प्यादीं वापरणें म्हणजे काय ? तीं प्रतिपक्षाचा पाडाव कशी करणार ? आपल्याच मोहोऱ्यांना अडथळा करणार नाहीत कां ? या व अशाच महत्त्वाच्या मुद्यांचा या शास्त्रांत ऊहापोह आहे· आपण त्याचा अभ्यास पुढील अंकीं करूं !

जातां जातां आपण मोहोऱ्यांची दुसऱ्या मोहोऱ्यांच्याबरोबर तौलनिक किंमत काय आहे ती पाहूं या. सगळ्यांत प्रबळ मोहोरें वजीर = दोन हत्ती. उंट + प्यादें = एक हत्ती. घोडा व उंट हे तीन प्याद्यांच्या बरोबरीचे समजले जातात. घोडा व उंट यांना जरी समान दर्जा असला तरी मोकळ्या डावांत उंट व बंद डावांत घोडा प्रभावी ठरतो. ज्या डावांत प्याद्यांची मारामारी होऊन मोहोऱ्यांना लांब लांब पल्ल्याच्या गति घेतां येतात तो डाव मोकळा व ज्या डावांत प्याद्यांच्या खिटया बसून मोहोऱ्यांच्या लांब पल्ल्याच्या गति प्यादीं अडवतात तो बंद डाव.

# ३७१/२ टक्के सवलतीची अपूर्व योजना

केवळ साहित्य, केवळ ललितकला, केवळ करमणूक हा आजच्या मासिकसृष्टीचा एकतर्फी
सांचा सोडून जीवनाच्या सर्वांगिण विकासाची दृष्टि देणारा,
राजकारण, समाजकारण, संस्कृति, साहित्य, शिक्षण, उद्योगधंदे, शेती, क्रीडा, रंगभूमि,
चित्रपट इत्यादि समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करणारा,

विधायक वृत्तीचा, जबाबदार जाणीवेचा

# माणूस

जून १९६२ पासून दुसऱ्या वर्षांत पदार्पण करीत आहे.

★

वाचकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी

**जूनपासून अंकाच्या पृष्ठसंख्येंत वाढ करावी लागत आहे.**

जूनपासून वार्षिक वर्गणी आठ रुपये; किरकोळ अंक एक रुपया. मे १९६२ अखेर वर्गणीदार होणाऱ्यांस केवळ पांच रुपये वार्षिक वर्गणींत दिवाळीअंकासह सर्व अंक घरपोंच मिळतील.

**आजच पांच रुपये म. ऑ. ने पाठवून सवलतींचा लाभ घ्या.**


संपादक–मुद्रक–प्रकाशक : श्री. ग. माजगावकर : प्रकाशन स्थळ–राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव, पुणें २
मुद्रणस्थळ–साधना प्रेस, ४३०–३१ शनवार पेठ, पुणें २